रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २०० । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## तळोजात तीन कारखान्यांना आग

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीत भीषण आगीची घटना घडली. येथील तळोजा औद्योगिक वसाहतमधील तीन कारखान्यांना एकाच वेळी आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. रात्री साडेनऊच्या सुमारास लागलेली ही आग पहाटे साडेपाच वाजेपर्यंत आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला शर्थीचे प्रयत्न करावे लागले. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी कारखान्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक बी-४२ वरील विघ्नहर्ता कंपनीमध्ये अगरबत्ती निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांची सुमारे १५० पिंपे साठवण्यात आली होती. पान २ वर


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹


## कॉपी बहाद्दरांवर राहणार नजर

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा पूर्णपणे कॉपीमुक्त व्हाव्यात यासाठी ठोस योजना आखल्या आहेत. केंद्राबाहेर पोलीस गस्त बसवली जाईल. तसेच परीक्षा केंद्रांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील. शिवाय, प्रत्येक पर्यवेक्षकाचा मोबाईल फोन झूम ॲपद्वारे जिल्हा नियंत्रण कक्षाशी जोडला जाईल. बोर्ड सध्या परीक्षा केंद्रे निश्चित करण्याचे काम करत आहे. गेल्या वर्षी अस्तित्वात असलेल्या केंद्रांची संख्या कायम ठेवण्यात आली आहे. बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा २३ जानेवारीपासून सुरू होतील. याआधी प्रत्येक परीक्षा केंद्राची गटशिक्षण अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात येणार आहेत.

# खोपोलीत रक्तपात

## नगरसेविकेच्या पतीची निर्घृण हत्या

## राजकीय वादातून खून झाल्याचा संशय



मयत मंगेश काळोखे

। खोपोली । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे शिंदे गटाच्या शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे (४५) यांची शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी सकाळी सात वाजता निर्घृण हत्या करण्यात आली. मंगेश काळोखे हे आपल्या मुलींना शाळेत सोडून घरी परतत असताना खोपोलीतील साईबाबा नगर परिसरात जया बारजवळ तलवार आणि चॉपरने अज्ञातांनी त्यांच्या डोक्यावर कोयता, कुऱ्हाड आणि तलवारीने सपासप वार करुन अक्षरशः चिंधड्या उडवल्या. हल्ल्यानंतर आरोपी फरार झाले आहेत. राजकीय वैमनस्यातून ही हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. भरदिवसा घडलेल्या या हत्येच्या घटनेने खळबळ उडाली आहे. दरम्यान, मयत मंगेश काळोखे यांचा पुतण्या राज काळोखे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे रवींद्र देवकर यांची दोन मुले दर्शन आणि धनेश व त्यांचे अंगरक्षक तसेच खुनाच्या कटासाठी सहकार्य केल्याचा आरोप केल्याने राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, प्रवक्ता भरत भगत यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

- पोलीस ठाण्यासमोर महिलांचा आक्रोश
- महामार्ग अडवला, बाजारपेठ बंद
- सात आरोपींवर गुन्हा दाखल

> मंगेश काळोखे शिंदे गटाचे नेते आहेत. त्यांची सकाळी खोपोलीमध्ये विहारी परिसरात हत्या झाली आहे. एकूण सात जणांवर त्यांचा खून केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्याचा तपास सुरु असून, लवकरच यातील आरोपी पकडले जातील.
>
> – आचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड

मंगेश काळोखे हे आपल्या मुलींना शाळेत सोडून घरी परतत होते. यावेळी एका अज्ञात वाहनातून चार ते पाचजण उतरले. त्यांनी मंगेश यांच्या गाडीसमोर स्वतः ची गाडी आडवी घातली आणि त्यांच्यावर तलवारी व चॉपरने हल्ला केला. या भीषण हल्ल्यात मंगेश काळोखे यांचा जागीच मृत्यू झाला. या हत्येमागे राजकीय वादाची पार्श्वभूमी असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मानसी काळोखे या साईबाबा नगर प्रभागातून दुसऱ्यांदा निवडून आल्या आहेत. त्यांनी याच निवडणुकीत प्रतिस्पर्धी देवकर यांच्या पत्नीचा पराभव केला होता. काळोखे आणि देवकर या दोन कुटुंबांत आणि त्यांच्या पक्षांमध्ये गेल्या १५-२० वर्षांपासून वाद सुरू असल्याचे समजते. निकालादिवशीदेखील त्यांच्यात किरकोळ वाद झाला होता. काळोखे यांच्या नातेवाईकांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. पान २ वर

### सुधाकर घारेंसह तिघांवर खुनाच्या कटाचा आरोप

रवींद्र परशुराम देवकर यांच्यासह धनेश देवकर, सुधाकर परशुराम घारे व भरत भगत यांनी या खुनाचा कट रचला आहे. तरी रवींद्र परशुराम देवकर, दर्शन रवींद्र देवकर, धनेश रवींद्र देवकर, सचिन संदीप चव्हाण, १ ते ४ रा. साईबाबानगर, रहाटवडे, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, सुधाकर परशुराम धारे, रा.सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड, भरत भगत, रा. अवसरे, ता. कर्जत, जि. रायगड, रवींद्र देवकर याचा बाउंसर व इतर अनोळखी तीन इसमांनी पूर्ववैमनस्यातून व राजकीय वादातून माझे चुलते मंगेश सदाशिव काळोखे ऊर्फ आप्पा, वय-४५ वर्षे, रा. साईबाबानगर, रहाटवडे, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड यांना कट रचून, तलवार, कोयता व कुऱ्हाडीने वार करुन जिवे ठार मारल्याची तक्रार मंगेश काळोखे यांचा पुतण्या राज काळोखेने दिली आहे.

### रायगडात महायुतीतील वाद विकोपाला

रायगड जिल्ह्यात महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपासून शाब्दिक आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. दोन्ही पक्षाचे नेत्यांकडून जोरदार समाचार घेतला जात आहे. दोन्ही पक्षातील वाद विकोपाला गेले असून, या वादातूनच ही हत्या झाल्याचे बोलले जात आहे. खोपोलीत दोन्ही गटामध्ये धुसफूस होती. दोन दिवसांपूर्वी एकमेकांना स्टेटसच्या माध्यमातून आव्हान दिल्याने वाद विकोपाला गेले होते. त्यातूनच ही हत्या झाल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, सत्ताधारीच एकमेकांविरोधात ठाकल्याने रायगडातील जनतेतून संताप व्यक्त होत आहे.

## वेधक

### रसायनीत तरूणीचा विनयभंग

**रसायनी :** बावीस वर्षीय तरूणी बोटाला दुखापत झाल्याने औषधोपचाराकरिता हॉस्पिटलमध्ये गेली होती. त्या हॉस्पिटलमधून येत असताना एका दुकानाजवळ एका अनोळखी स्कूटी चालकाने स्कूटी थांबवून तिला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला. यानंतर आरोपी अनोळखी स्कूटी चालक त्याची ताब्यातील स्कुटी घेऊन निघून पळून गेला. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ७४ प्रमाणे नोंद करण्यात आली असून, रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पवार अधिक तपास करीत आहेत. आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात येत आहे.

### राज्यात १.३७ लाख मुले कुपोषित

**मुंबई :** मागील तीन वर्षांत कुपोषित मुलांची संख्या कमी झाल्याचा दावा सरकार करीत असले तरीही नुकत्याच मिळालेल्या आकडेवारीनुसार, राज्यात अद्याप एक लाख ३७ हजार ४०७ मुले कुपोषणग्रस्त असल्याची कबुली राज्य सरकारच्या वतीने नुकतीच उच्च न्यायालयात देण्यात आली. मागील अडीच वर्षांत राज्यभरात पाच वर्षांखालील ३२ हजार २२६ मुलांचा आणि दोन हजार ८६१ मातांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताची उच्च न्यायालयाने स्वतः हून दखल घेतली. कुपोषण हे या मृत्यूंमागील एक प्रमुख कारण असल्याचे वृत्तात म्हटले होते. त्यावर सरकारच्या संबंधित विभागांना नोटीस बजावली होती.

### ‘पश्चिम रेल्वेच्या २७७ ट्रेन रद्द

**मुंबई :** कांदिवली-बोरीवली सेक्शनवरील सहाव्या मार्गिकेचे काम पूर्ण करण्यासाठी पश्चिम रेल्वेने ३० दिवसांचा ब्लॉक घेतला आहे. हा ब्लॉक २०/२१ डिसेंबर २०२५ पासून सुरु झाला असून, १८ जानेवारी २०२६ पर्यंत चालणार आहे. याच ब्लॉकमध्ये २७ डिसेंबर (शनिवारी) सकाळी ४ ते रात्री ९ च्या दरम्यान तब्बल २७७ लोकल ट्रेन रद्द होणार आहेत. याशिवाय २६ आणि २७ डिसेंबरच्या मध्यरात्रीदेखील अनेक लोकल ट्रेन अंशत: रद्द होतील. काही मेल-एक्सप्रेसच्या आगमन आणि निर्गमनच्या वेळेतही बदल होणार आहे. ज्यामुळे प्रवाशांच्या मोठ्या अडचणीचा सामना करावा लागणार आहे. दरम्यान, बेस्टने पश्चिम उपनगरात अधिक फेऱ्या चालवण्याच्या निर्णय घेतला आहे. दरम्यान, प्रवाशांना होणाऱ्या त्रासाबद्दल पश्चिम रेल्वेने दिलगिरी व्यक्त केली आहे.

### कार घरावर आदळून अपघात

**महाड :** वरंडोली येथे अक्षय कन्स्ट्रक्शन रायगड रोड येथील ठेकेदाराच्या कारवरील चालकाचा ताबा सुटल्याने रस्त्यालगत असलेल्या सचिन परशुराम दळवी, रा. वरंडोली यांच्या घरावर कार आदळली. या अपघातात घराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रायगड रोडवरून वेगाने येणाऱ्या झायलो कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट घराच्या बाहेरील असलेल्या अंगणातील भिंतीवर आदळली. जोरदार धडकेत घराची भिंत, अंगणातील मंडप, दरवाजा तसेच घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.

# शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध

## नगराध्यक्षा अक्षया नाईक यांचा निर्धार



। रायगड । प्रतिनिधी ।

चार वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर आज आपण पुन्हा एकदा आपल्या नगरपालिकेत पाऊल ठेवत आहोत. हा क्षण आपल्या सर्वांसाठी अत्यंत आनंदाचा आणि उत्साहाचा आहे, अशा शब्दांत अलिबागच्या नवनियुक्त नगराध्यक्षा अक्षया नमिता प्रशांत नाईक यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी उपस्थितांना संबोधित करताना अलिबाग शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचा निर्धार व्यक्त करीत विकासाचा नवा संकल्प सोडला.

अलिबाग नगरपरिषदेच्या महाराष्ट्रभूषण नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात आयोजित समारंभात नगराध्यक्ष अक्षया नाईक आणि पान २ वर

### विकासपर्वाची सुरुवात : ॲड. मानसी म्हात्रे



आज आपल्या सर्वांच्या साक्षीने एका वेगळ्या विकास पर्वाची सुरुवात आम्ही करीत आहोत. प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या अध्यादेशानुसार आम्ही सर्वजण प्रशासनासोबत चांगला मेळ साधून अलिबाग शहराचा विकास करु, अशी ग्वाही नवनिर्वाचित नगरसेविका ॲड. मानसी म्हात्रे यांनी दिली. पान २ वर

### लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल येथे राहणाऱ्या एका ३९ वर्षीय व्यक्तीने त्याच भागात राहणाऱ्या घटस्फोटित महिलेला लग्नाचे वचन देऊन तिच्यासोबत वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवून तिच्याकडून सात लाख रुपये उकळून तिची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. राकेश लदबे असे या व्यक्तीचे नाव असून, वाशी पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्कार, फसवणुकीसह शिवीगाळ व धमकी देणे कलमांखाली पान २ वर

## हुक्का पार्लरवर छापा

- मॅनेजरसह दोघांना अटक

। पनवेल । प्रतिनिधी ।

तंबाखूजन्य पदार्थांचा वापर करून हुक्का पार्लर चालवण्यास कायद्याने बंदी असूनही खारघर येथील दि स्मोक कॅफेमध्ये सर्रासपणे बेकायदेशीर हुक्का पार्लर चालवले जात असल्याचे उघडकीस आले. खारघर पोलिसांनी या बेकायदेशीर हुक्का पार्लरवर छापा मारून मॅनेजरसह दोघांना अटक केली आहे. तसेच हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य व वेगवेगळ्या प्रकारचे फ्लेवर जप्त केले आहेत.

खारघर सेक्टर-३, बेलपाडा येथील दि स्मोक कॅफेमध्ये बेकायदेशीररीत्या हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती खारघर विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्तांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक सूरज जाधव व त्यांच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली. कॅफेचा मॅनेजर जियाद नासिर बहादुरकर आणि वेटर फहिम निजाम अहमद या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मोबाईल टॉर्चच्या उजेडात अल्पवयीन मुलांचा दफनविधी

### कळंबोली वसाहतीमधील हिंदू स्मशानभूमीतील प्रकार, नातेवाईकांचा संताप

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

‘विकसित शहर’ अशी बिरूदावली मिरवणाऱ्या कळंबोली वसाहतीमधील हिंदू स्मशानभूमीत रात्रीच्या वेळी ‘मोबाईल टॉर्च’च्या उजेडात लहान बाळांचे दफनविधी करावे लागत असल्याने मृताचे नातेवाईक संताप व्यक्त करत आहेत.

> संबंधित समस्यांबाबत पालिकेच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली आहे. सर्व समस्या सोडवण्याचे आश्वासन अधिकऱ्यांनी दिले आहे.
>
> – रवींद्र भगत, माजी नगरसेवक

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर १ मध्ये असलेल्या गुरु संकल्प रहिवासी संस्थेतील रहिवासी असलेल्या मानसी म्हामुणकर या सात वर्षीय अल्पवयीन मुलीचा आकस्मिक मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. २५) घडली. पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात मृतदेहाची वैद्यकीय तपासणी करण्यात आल्यानंतर रात्री साडेदहा ते अकराच्या सुमारास हिंदू रीतीरिवाजनुसार अंत्यविधी करण्यासाठी कळंबोली रोडपाली येथील हिंदू स्मशानभूमीत तिचा मृतदेह आणण्यात आला होता. मात्र, यावेळी हिंदू पान २ वर

## रस्त्याच्या कामामुळे पर्यटक त्रस्त

### प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

। चौल । प्रतिनिधी ।

नाताळपासून लागलेल्या सुट्ट्या, वर्षअखेर आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यभरातून नव्हे, देशविदेशातूनही हजारोंच्या संख्येने पर्यटक अलिबाग तालुक्यातील नागाव, आक्षी, रेवदंडा, तसेच मुरुड समुद्रकिनारी मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. परंतु, ऐन पर्यटन हंगामातच सुरू असलेल्या चौल परिसरातील रस्त्याच्या कामांमुळे



पर्यटकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मुख्य पर्यटन मार्गांवरील अर्धवट काम, खड्डे, धूळ आणि वाहतूक कोंडी यामुळे पर्यटकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, पर्यटकांची वाढती संख्या पाहता त्यांची पान २ वर

> ३१ डिसेंबरपर्यंत मोठ्या संख्येने पर्यटकांच्या वाहनांची या मार्गावरुन वर्दळ असणार आहे, त्यामुळे पर्यटन हंगाम संपल्यानंतरच अशी कामे हाती घ्यायला हवी होती.
>
> -शैलेश नाईक, चौलमळा, ग्रामस्थ

## विजयाची खुर्ची जनतेला अर्पण

### नगराध्यक्षा भावना घाणेकर यांचे प्रतिपादन




। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरणच्या नागरिकांनी महाविकास आघाडीला भरभरून यश दिले आहे. मलाही नगराध्यक्षपदाच्या उमेदवार म्हणून भरभरून यश दिले. त्यामुळे आज या खुर्चीवर विराजमान होताना नक्कीच उरणकरांच्या कामाचे दडपण आले आहे. मात्र, नगराध्यक्ष पदाच्या खुर्चीचा मान ठेवून, मी सगळ्यांच्या भावनांचा आदर कायम राखत, जनतेची कामे करत राहीन. करण, ज्या खुर्चीसाठी माझा विजय झाला. ती ही खुर्ची त्या विजयाच्या दिवसापासून मी जनतेला अर्पण केली आहे. ही खुर्ची म्हणजे तुमचे सर्वांचे ऋण आणि जबाबदारीची खुर्ची आहे. त्यामुळे उरणच्या विकासकामात कोणी अडथळा आणला, तर त्याला आडवा केल्याशिवाय राहणार नाही, असे वक्तव्य नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी व्यक्त केले.

प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा पदाच्या खुर्चीवर शुक्रवारी (दि.२६) नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर या विराजमान होऊन, त्यांनी पदभार स्वीकारला. त्यावेळी त्या आपल्या भावना व्यक्त करताना बोलत होत्या. यापुढे भावनाताई घाणेकर यांनी गर्व आणि अहंकार कोणाचा टिकला का? असा सवालही केला. जेव्हा जनता जनार्दनाच्या मनात येते, तेव्हा ही जनता कोणाला वरती आणि कोणाला खाली बसवायचे, हे सर्व काही जनताच ठरवते. आपण अनेक रथी महारथींच्या बोटी बुडविल्याचे पाहिले आहे. त्यामुळे अहंकार माझ्या मनामध्ये कधीच येणार नाही. पान २ वर




# विकास गोगावले अद्याप फरार

## ● अटकपूर्व जामीनही फेटाळला ●महाड हिंसाचार प्रकरण चिघळलं

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड नगरपरिषद निवडणुकी दरम्यान झालेल्या मारहाण प्रकरणात राज्याचे मंत्री भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले यांना मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात विकास गोगावले यांनी दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला असून, त्यामुळे त्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

मतदानाच्या दिवशी घडलेल्या हिंसाचारामुळे आधीच राजकीय वातावरण तापलेले असताना, आता न्यायालयाच्या या निर्णयामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही दोन वेगवेगळ्या न्यायालयांनी विकास गोगावले यांना दिलासा देण्यास नकार दिला होता.

महाड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान सुरू असताना प्रभाग क्रमांक २ मध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. याच दरम्यान शिंदे गटाचे पदाधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या मारहाणीत राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप विकास गोगावले आणि त्यांच्या समर्थकांवर करण्यात आला आहे. या घटनेनंतर महाड पोलिस ठाण्यात विकास गोगावले यांच्यासह एकूण २९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, गुन्हा दाखल होताच सर्व आरोपी भूमीगत झाले आणि आजपर्यंत ते पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत.



या प्रकरणात विकास गोगावले यांनी अटक टाळण्यासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. माणगाव न्यायालयात त्यांनी दोन वेळा अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला, मात्र दोन्ही वेळा न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळला. त्यानंतर त्यांनी मुंबई न्यायालयातही धाव घेतली, परंतु तिथेही त्यांना दिलासा मिळाला नाही. सलग तिसऱ्यांदा जामीन नाकारण्यात आल्याने विकास गोगावले यांच्यावर अटकेची टांगती तलवार कायम आहे. गेल्या २४ दिवसांपासून ते फरार असल्याची माहिती असून, पोलिसांकडून त्यांचा कसून शोध सुरू आहे. याच प्रकरणातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी नाना जगताप हेदेखील अद्याप फरार असल्याचं समोर आलं आहे.

या संपूर्ण प्रकरणामागे राजकीय वर्चस्वाची लढाई असल्याची चर्चा रंगली आहे. महाड नगरपालिका निवडणुकीदरम्यान विकास गोगावले आणि सुशांत जाबरे समर्थकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संघर्ष झाला होता. या राड्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात परस्पर तक्रारी दाखल करण्यात आल्या. मात्र, न्यायालयाने आरोपींच्या अटकपूर्व जामीन अर्जांना नकार दिल्यानंतर, संबंधित सर्व आरोपी भूमीगत झाल्याचं चित्र आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनावरही आरोपींना अटक करण्याचं मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

### राजकीय आघाड्यांवर वेगळं वळण

दरम्यान, या मारहाण प्रकरणाला राज्यातील सत्ताधारी महायुतीतील अंतर्गत संघर्षाचीही पार्श्वभूमी असल्याचं बोललं जात आहे. राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर पालकमंत्रीपदावरून मंत्री भरत गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे यांच्यात सातत्याने वाद सुरू आहेत. गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही नेते एकमेकांच्या गटातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी फोडण्याच्या प्रयत्नात असल्याचे आरोप होत आहेत. यामुळे दोन्ही नेत्यांमधील राजकीय वैर अधिक तीव्र झाले असून, त्याचाच स्फोट मतदानाच्या दिवशी हिंसाचाराच्या रूपात झाल्याचं राजकीय वर्तुळात बोललं जात आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर आता या प्रकरणाला कायदेशीर व राजकीय अशा दोन्ही आघाड्यांवर वेगळं वळण मिळणार असल्याचं स्पष्ट होत आहे.

# शेतकऱ्यांना मजुरांची वानवा

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

हिवाळी या ऋतूमध्ये काही शेतकरी शेतात कडधान्यांची लागवड करीत त्याचबरोबर भाजीपाल्यांची लागवड करीत आसतात. या उत्पन्नाच्या माध्यमातून घरचे सांभाळणे सोयीचे जात असते. मात्र, शेतात भाजीपाल्याची लागवड करण्यात आली असून, मजुरांच्या टंचाईची झळ शेतकऱ्यांना बसत असल्यामुळे घरातील सदस्य या व्यवसाकडे वळले आहे.

शेतात भाजीपाला लागवड करायची म्हटले की मजूर लागते. मात्र, मजुराच्या शोधात वणवण फिरावे लागत आहे. ही वस्तुस्थिती काही वर्षांमध्ये निर्माण झाली आहे. काही शेतकरी कालव्याच्या पाण्याची प्रतीक्षा न करता पावसाळ्यात येत असलेल्या छोट्या ओढ्यावर बंधारा बांधून पाणी अडवून भाजीपाल्याची लागवड करीत आहे. त्यातच हवामानात सातत्याने बद्दल घडत असल्यामुळे यांचा धोका या पिकांवर होत आहे. त्याचबरोबर खूप दूरवरुन पाणी घेऊन येत असताना, खर्चही मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यातच मजूर आणि इंधन, बियाणे, खते इत्यादीसाठी पैशांची आवश्यकता असते. शेतीच्या कामासाठी शेतमजुरांची आवश्यकता असते. ३०० ते ४०० रुपये मजुरी देऊनसुद्धा शेतमजूर मिळत नसल्याने आम्ही शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. शेतीच्या कामाला मजूर मिळेल



का? असे म्हणत शेतकऱ्यांची मजुरासाठी शोधमोहीम सुरू केली आहे. कोणतेही शेतीकाम करण्याची शेतमजुरांची मानसिकता नसून, त्याकरिता त्यांची मनधरणी करावी लागते, असे मत वयाळ येथील शेतकरी अतिष म्हात्रे यांनी सांगितले.



## पेणमध्ये बिबट्या आल्याची अफवा

**पेण :** गेली दोन दिवस पेणमध्ये नंदीमाळ नाक्यावर बिबट्या दिसल्याचा फोटो समाज माध्यमांवर फिरत असल्याने शहरात भीतीचे वातावरण पसरलेले आहे. सदरील फोटो कोणी काढला व तो कुणी समाज माध्यमांवर टाकला याबाबत कोणतीच माहिती उपलब्ध होत नाही. तसेच घटनास्थळावर जाऊन पाहणी केली असता, फोटो एडीट केल्याचे आढळून येत आहे. याबाबत पोलीस यंत्रणेकडे चौकशी केली असता त्यांच्याकडूनदेखील ही बाब अफवा असल्याचे समोर येत आहे. यदाकदाचित काही समाजकंटकांनी पेण शहरात भीतीचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून हा फोटो एडिट करून समाज माध्यमांवर टाकला असावा, अशी शक्यता नाकारता येत नाही. तरी, पेणमध्ये बिबट्या आला आहे ही अफवा असल्याचे संबंधित प्रशासनाने सांगितले आहे. पेणमध्ये बिबट्या आल्याची फक्त आणि फक्त अफवा आहे. बिबट्या पेणमध्ये कुणालाच दिसला नाही. समाज माध्यमांवर उगीचच भीतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी अफवा पसरवल्या जात आहेत. जर कुणाला खरंच बिबट्या दिसला तर त्यांनी वनक्षेत्र अधिकारी यांच्याशी संपर्क करावा, लोकांच्या मनात भीती निर्माण होईल अशा पोस्ट समाजमाध्यमावर पसरवू नये, असे आवाहन पेण वनक्षेत्र अधिकारी सपना सोनार यांनी केले आहे.

पान १ वरून

## खोपोलीत रक्तपात

गेल्या दोन दिवसांपासून मंगेश यांच्यावर पाळत ठेवली जात होती आणि एक संशयास्पद गाडी परिसरात फिरत होती. याबद्दल पोलिसांना कल्पना देऊनही त्यांनी दुर्लक्ष केले, असा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

मंगेश काळोखे यांच्या हत्येची बातमी वाऱ्यासारखी पसरल्याने मोठा जनसमुदाय खोपोली शहरात दाखल झाला. दरम्यान, आरोपींना तात्काळ अटक करा, अशी मागणी खोपोलीकररांनी करून मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला आहे. ही घटना घडत असताना काळोखे यांना वाचविण्यासाठी मारेकऱ्यांना घाबरून कोणीही पुढे न आल्याने एक तरुण कार्यकर्ता सर्वांच्या मदतीला जाणारा मंगेश काळोखेचा राजकरणात बळी गेला असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

या घटनेने खोपोली शहर हादरून गेले आहे. आतापर्यंतच्या इतिहासात खोपोलीचे राजकारण इतक्या खालच्या थराला कधीही गेले नव्हते. मात्र, या घडनेने बीड जिल्ह्यात घडणाऱ्या घटनांचीच प्रचिती खोपोलीतील जनतेला आली.

या घटनेमुळे पोलीस प्रशासनही हादरले असून, या घटनेनंतर पोलीस अधीक्षक आचल दलाल, उपअधीक्षक अभिजित शिवथरे, गुप्तहेर खात्याचे जिल्हा निरीक्षक मिलिंद खोपडे यांनी खोपोली गाठून त्यांच्या आदेशानुसार खालापूर पोलीस उपविभागीय अधिकारी विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला आहे. तपास यंत्रणेसाठी फॉरेन्सिक लॅबची टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. या घटनेला गावातील विरोधकच जबाबदार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे तपासाअंती या प्रकरणाचा उलगडा होणार आहे.

**राष्ट्रवादीकडून प्लॅनिंग मर्डर : आ. थोरवे**

मंगेश काळोखे हा निष्ठावान शिवसैनिक होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे सुधाकर घारे, भरत भगत, रवी देवकर यांनीच राजकीय वादातून सूडबुद्धीने प्लॅनिंग मर्डर केल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केला आहे. त्यांच्या आरोपामुळे खोपोलीसह रायगड जिल्ह्यातील राजकीय वातावरणात खळबळ उडाली असून, पोलीस या घटनेचा कशा पद्धतीने तपास करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या**

महिला आणि युवकांनी खोपोली पोलीस ठिय्या आंदोलन केल्याने पोलीस तपासात सहकार्य करण्याची विनंती पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी केली. मात्र, महिलांनी आक्रमक पवित्रा घेत दोन वेळा महामार्ग अडवला. यावेळी महिला पोलीस आणि आंदोलनकर्त्या महिलांमध्ये शाब्दिक वाद झाल्यावर वातावरण काहीकाळ ताणावपूर्व होते.

**पुतण्याने दिली तक्रार**

मयत मंगेश काळोखे यांचा पुतण्या राज काळोखे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मुलींना शिशुमंदिर स्कूल येथे सोडून परत येत असताना सकाळी सात वाजताच्या सुमारास जया बारसमोरील चौकात, विहारी खोपोली येथे आले. यावेळी दर्शन रवींद्र देवकर, सचिन संदीप चव्हाण व इतर तीन इसमांनी अगोदर माझे चुलते मंगेश काळोखे उर्फ आप्पा यांचा पाठलाग करुन त्यांना जमिनीवर खाली पाडले व त्यांच्यावर तलवार, कोयता व कुऱ्हाडीने वार करुन जिवे ठार मारले आहे.

## शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध

नगरसेवकांनी पदभार स्वीकारला. शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व नगरसेवक, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे, अन्य अधिकारी व कर्मचारी यांच्यासह अलिबाग शहरातील प्रतिष्ठित नागरिक, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्षया नाईक यांनी आपल्या भाषणादरम्यान एक अत्यंत वैयक्तिक आणि भावूक आठवण शेअर केली. त्या म्हणाल्या, आजपासून १४ वर्षांआधी माझी आई या साडीत इथे आली होती, ही साडी नेसून तिने यापूर्वी पालिकेची सेवा केली होती आणि आज तीच साडी नेसून मी इथे आली आहे. अलिबागच्या जनतेने माझ्या आईवर जेवढे प्रेम केले, तेवढेच प्रेम मलाही मिळेल, अशी मला खात्री आहे. या विधानामुळे उपस्थितांचे डोळे ओलावले आणि संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमले.

माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनाचा उल्लेख करत अक्षया नाईक यांनी स्पष्ट केले की, गेल्या चार वर्षांत जी कामे प्रलंबित राहिली आहेत, ती आता प्राधान्याने पूर्ण केली जातील. शहराच्या प्रगतीसाठी नव्या जोमाने कामाला सुरुवात करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि आपुलकी जपण्याचे आश्वासन देत त्या म्हणाल्या, आपण सर्वांनी मिळून सोबत काम करायचे आहे. काम करताना जर माझी कुठे चूक झाली, तर तुमची मुलगी समजून मला हक्काने सांगा. तुमच्या सूचनांनुसारच मी कारभार करेन. अक्षया नाईक यांच्या या आश्वासक भूमिकेमुळे अलिबाग शहराच्या विकासाला आता नवी गती मिळणार, अशी आशा व्यक्त होत आहे.

**विकासपर्वाची सुरुवात : ॲड. मानसी म्हात्रे**

त्या पुढे म्हणाल्या की, एका नव्या पर्वाची सुरुवात होतेय याची चाहूल शहराला लागली आहे. आणि शहराने ते पर्व स्वीकारुनच भरभरुन मतांनी थेट नगराध्यक्ष अक्षया नाईक यांना निवडून दिले आहे. एक वेगळी दिशा शहराला त्यांच्या रुपाने मिळणार आहे. विशेषतः तरुणांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अक्षया नाईक या आज या सभागृहात विराजमान झालेल्या आहेत. याचा आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. मी निश्चितपणे खात्री देऊ इच्छिते की, एक तरुण चेहरा नगराध्यक्षपदाच्या खुर्चीवर विराजमान झालेला आहे. परंतु, अवतीभोवती नवे-जुने चेहरे नगरसेवकांच्या रुपाने आम्ही आहेत. आमच्या अनुभवातून शहराचा विकास निश्चितच केला जाईल. प्रशांत नाईक यांनी गेली ३० ते ३५ वर्षे या शहराचे नेतृत्व केले आहे, त्यांच्या विकासाचा वेग आज संपूर्ण शहराला माहिती आहे. त्यांच्या टीममध्ये आम्ही बरीचशी लोक असून, त्यांच्याबरोबर काम करणारे आम्ही आहोत, असेही ॲड. म्हात्रे म्हणाल्या.

## लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार

गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील पीडित महिला पनवेल भागात आपल्या दोन मुलांसह राहण्यास असून, तिचा घटस्फोट झाला आहे. मार्च २०२३ मध्ये आरोपी राकेश लदबे याची पीडित महिलेसोबत ओळख झाली होती. या ओळखीतून त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्यानंतर आरोपी राकेश लदबे याने पीडित महिलेला लग्नाचे वचन देऊन तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने पीडित महिलेला वाशीतील जुहूगाव येथील सरस्वती बिल्डिंगमध्ये नेऊन तिच्यासोबत अनेक वेळा शरीरसंबंध प्रस्थापित केले. याच कालावधीत आरोपीने पीडित महिलेकडून वेगवेगळी कारणे सांगून सात लाख रुपये उकळले.

मागील तीन वर्षांपासून आरोपीने पीडित महिलेवर लैंगिक अत्याचार केले. दरम्यानच्या काळात पीडित महिलेने आरोपीकडे पैसे परत मागितले असता, त्याने पैसे परत करण्यास नकार दिला. तसेच पीडित महिलेला शिवीगाळ व मारहाण करीत तिला धमकावले. या प्रकारानंतर पीडित महिलेने दोन दिवसांपूर्वी खांदेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी आरोपी राकेश लदबे याच्याविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी वाशी पोलिसांकडे वर्ग केला त्यानुसार पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे.

## मोबाईल टॉर्चच्या उजेडात अल्पवयीन मुलांचा दफनविधी

स्मशानभूमीत लहान बाळांसाठी असलेल्या दफनभूमीत वीज नसल्याने तसेच दफनभूमी परिसरात झाडेझुडपे वाढली असल्याने मोबाईलच्या उजेडात दफन विधी उरकण्याची वेळ मृताच्या नातेवाईकांवर आली. त्याचप्रमाणे स्मशानभूमी परिसरात पाण्याची सोय उपलब्ध नसून, दफन विधी करण्यासाठी आवश्यक खड्डा खोदण्यासाठी पुरेसे मनुषबळ उपलब्ध नसल्याने मृताच्या नातेवाईकांनाच खड्डा खोदावा लागत असल्याने पालिकेच्या माध्यमातून नागरिकांना भेडसावणाऱ्या या समस्या दूर व्हाव्यात यासाठी प्रयत्न करण्यात येण्याची गरज असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## रस्त्याच्या कामामुळे पर्यटक त्रस्त

कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी पुढील चार दिवस रस्त्याची कामे बंद ठेवण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेषतः सुट्टीच्या काळात पर्यटकांची संख्या वाढलेली असताना रस्त्यांची दुरवस्था प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभाराचे दर्शन घडवत आहे. अनेक ठिकाणी काम सुरू आहे, मात्र ना योग्य सूचना फलक आहेत, ना वाहतुकीसाठी पर्यायी मार्गांची व्यवस्था करण्यात आली आहे. ३१ डिसेंबरपर्यंत ही कामे बंद ठेवल्यास वाहतुकीला कोणताही अडथळा होणार नाही, असे स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांचे मत आहे.

मुंबई, पुणे येथून मुरुडमध्ये फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांनी सांगितले की, प्रवासासाठी लागणारा वेळ दुपटीने वाढत असून, वाहनांचे नुकसान होत आहे. काही पर्यटकांनी तर पुन्हा या ठिकाणी न येण्याचा निर्णय घेतल्याचेही सांगितले आहे, त्यामुळे याचा थेट फटका स्थानिक पर्यटन व्यवसायावर बसण्याची शक्यता आहे.

मात्र, वारंवार तक्रारी करूनही एमएसआयडीसी प्रशासनाकडून कोणतीही ठोस पावले उचलली जात नसल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, ३१ डिसेंबरपर्यंत या मार्गावरील काम तात्काळ बंद करण्यात यावी, जेणेकरुन कामामुळे वाहतुकीस कोणताही अडथळा होणार नाही, अशी विनंतीवजा सूचना एमएसआयडीसीचे अभियंता बी.के. सिंग यांना करण्यात आली. यावर तात्काळ निर्णय घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना सांगून काम बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

## विजयाची खुर्ची जनतेला अर्पण

आणि आलाच तर मला माझी तुम्ही जागा दाखवून द्या. या खुर्चीचा मान ठेवून मी जनतेची कामे करीत राहीन, माझा संपूर्ण वेळ मी जनतेसाठी देईन. मी तुमची, या उरणची लेक म्हणून मी चुकले, तर तुम्ही माझे हक्काने कान पकडा. तुम्हाला तो अधिकार आहे. बायपास रस्ता, उरणच्या पाण्याचा प्रश्न, वाहतूक कोंडीचा प्रश्न रस्त्यांची दुरवस्था, असे अनेक समस्यांचे प्रश्न आहेत. त्याच्यावर भर दिला जाईल. बोरी गावातील ज्या काही समस्या आहेत, त्यांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. निवडणुकीच्या काळात इथल्या सत्ताधाऱ्यांनी नेत्यांवर आरोप केले, त्यांना मी सोडणार नाही. जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशी लढाई झाली, मात्र जनतेने चांगला कौल दिला. आणि महत्त्वाचे नगराध्यक्षपद आपल्याकडे आले. त्यामुळे महाविकास आघाडीने आपल्या पक्षाचे झेंडे बाजूला ठेवून आपण लोकसेवक म्हणून लोकांची सेवा करण्याला प्राधान्य देण्याचे कबूल केले.

सत्ताधाऱ्यांनी मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष केले. मात्र, या खुर्चीचा आदर राखत पंधरा दिवसांतून जनता दरबार भरविला जाईल, अशी ग्वाही दिली. हेल्पलाईन दिली जाईल. लोकांच्या मूलभूत गरजा सोडविण्यासाठी माझे दालन जनतेसाठी नेहमीच खुले राहील. ही खुर्ची जनतेला अर्पण केले आहे. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवकांसह आंतरराष्ट्रीय कामगार नेते तथा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, संतोष पवार, भूषण पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक कार्यकर्ते तसेच उरणच्या नागरिकांनी नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर यांना शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती.

## तळोजात तीन कारखान्यांना आग

या पिंपांमधील सॉल्व्हन्ट रसायनांनी अचानक पेट घेतल्याने भीषण स्फोट झाले आणि आगीने उग्र स्वरूप धारण केले. स्फोटाच्या तीव्रतेमुळे कारखान्यातील लोखंडी पत्रे तुटून थेट रस्त्यावर कोसळली. उडालेल्या रसायनांमुळे कंपनीसमोरील रस्ता व गटारांमधून आग पसरत गेली आणि लगतच्या आणखी बी-४१ आणि बी-४३ या दोन कारखान्यांनाही तिचा फटका बसला.

आगीचे लोण वाढत असल्याचे लक्षात येताच कारखान्यातील कामगारांनी प्रसंगावधान राखत तात्काळ बाहेर पळ काढला आणि आपले प्राण वाचवले. तळोजा एमआयडीसी अग्निशमन दलाचे अधिकारी रत्नाकर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री सव्वा दहा वाजता आगीची माहिती मिळताच वाहतूक कोंडी असूनही अवघ्या पाच मिनिटांत अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. आगीची तीव्रता पाहता अतिरिक्त बंब मागवण्यात आले. पहाटेपर्यंत सतत पाणी व फोमचा मारा करून अखेर आग नियंत्रणात आणण्यात यश आले. मात्र, रसायनांनी पेट घेतल्यामुळे आग अधिक पसरली असली तरी तिचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेनंतर औद्योगिक वसाहतीतील सुरक्षा व्यवस्था व रसायन साठवणीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# ८४ हजारांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

डेबिट कार्डद्वारे ८४ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

शशिकांत सोनवणे हे सेवानिवृत्त असून, खांदा कॉलनीत राहतात. ते बँकेच्या एटीएम सेंटरमध्ये रक्कम काढण्यासाठी गेले. त्यांनी एटीएम मशीनमध्ये टाकून पासवर्ड टाकला. मात्र, रक्कम आली नाही. यावेळी सेंटरच्या बाहेर उभा असणारा एक इसम एटीएम सेंटरमध्ये आला आणि तुमचे पैसे निघत नाहीत का, तुम्ही दुसरे कार्ड टाका असे बोलला. यावेळी सोनवणे यांनी दुसरे डेबिट कार्ड एटीएम मशीनमध्ये टाकून पासवर्ड टाकला. तरीदेखील पैसे आले नाहीत. यावेळी त्या इसमाने तुमची स्लिप खाली पडली, असे सांगितले. त्यांनी स्लिप उचलली आणि डेबिट कार्ड घेऊन घरी आले. रात्रीच्या सुमारास त्यांना त्यांच्या बँक खात्यातून ८४ हजार रुपये वजा झाल्याचे मेसेज आला. अनोळखी इसमाने स्लिप खाली पडली असे सांगून स्लीप उचलण्यासाठी सोनवणे वाकले असता हातचलाखिने त्याच्याकडील डेबिट कार्ड सोनवणे यांना देऊन त्यांचे कार्ड तो घेऊन गेला आणि त्याद्वारे ८४ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे त्यांच्या लक्षात आले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- प्रथम, पुर्नविवाह सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . वेटर, रिसेप्शनिस्ट, किचन मोरी, हाऊसकिपींग, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅपवर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २६ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- अलिबागमधील ऑफिस करीता खालील जागा भरणे आहे. ऑफिस क्लार्क व ऑटोकैड ड्राफ्ट्समन मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- पाहिजेत -अलिबाग येथे ऑफिसमध्ये कॉम्पुटर ऑपरेटर/ ऑफिस असिस्टंट पाहिजे. संपर्क - श्री.मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- मंगल ग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ अलिबागमध्ये कामासाठी मूले व मुली पाहिजेत संपर्क - ७८७५११००१२
- कामासाठी माणसे पाहिजेत - अलिबाग परिसरातील गरजुंनी वयोगट २८ ते ४० १) एस.टी. ने डिलेवरी २) मोटारसायकल डिलेवरी लायसन्स गरजेचे ३) पार्ट किंवा फूल टाईम ४) मोबाईल सेल्समन (बुकींगसाठी) मो.८८८८२२०२२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री श्रीधर तुकाराम पाटील व श्री. प्रल्हाद तुकाराम पाटील यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे बार्णे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ७/१/ड एकुण ०.३३.९० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २७/१२/२०२५

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### ग्रुप ग्रामपंचायत तिवरे

ता. कर्जत, जि. रायगड.

जा.क्र. दिनांक : २६/१२/२०२५

**जाहीर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत तिवरे मधून खालील काम २०२५/२६ या आर्थिक वर्षाकरिता ग्रुप ग्रामपंचायत तिवरे येथील श्री संजय तिखंडे यांच्या घरापासून ते योगेश पाटील यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे निविदा सूचना प्रसिद्ध केली आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्तीसाठी सदर प्रसिद्ध केलेल्या निविदा सूचना / जाहिराती पहाव्यात व विहित मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी | तरतूद | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| | ग्रुप ग्रामपंचायत तिवरे येथील श्री संजय तिखंडे यांच्या घरापासून ते योगेश पाटील यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे. | १.०० लक्ष | १५ वा वित्त आयोग निधी सन २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यानुसार | ६ महिने |
| | | १.०० लक्ष | | |

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत तिवरे**
**ता.कर्जत जि.रायगड**

# पर्यटक वाहतूक कोंडीच्या कचाट्यात

## ख्रिसमस-नववर्ष स्वागतापूर्वीच रखडलेल्या महामार्ग, बायपास कामांचा बसला फटका

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

ख्रिसमस, शनिवार-रविवारच्या सलग सुट्ट्या आणि त्यातच थर्टी फर्स्टचा मुहूर्त साधत पुणे, मुंबईसह मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातून कोकणाकडे जाणाऱ्या पर्यटकांची अक्षरशः लोंढा उसळला आहे. मात्र या पर्यटन गर्दीचे स्वागत करण्यास माणगावची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे अपयशी ठरत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

पुणे बाजूकडून ताम्हिणी घाट मार्गे माणगावकडे येणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तर मुंबई बाजूकडून कोकण व तळ कोकणात जाणाऱ्या वाहनांच्या रांगा सकाळपासूनच दोन ते तीन किलामीटर अंतरापर्यंत पोहोचल्या होत्या. परिणामी माणगाव शहर व परिसरात भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवताना माणगाव पोलीस स्टेशन व वाहतूक शाखेच्या पोलिसांची अक्षरशः दमछाक झाली.



माणगाव बस स्थानक, निजाम पूर रोड, कचेरी रोड, मोर्बा नाका या प्रमुख ठिकाणी विशेष पोलिस बंदोबस्त तैनात करून परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र वाहनांची संख्या इतकी मोठी होती की सर्व यंत्रणा अपुऱ्या पडताना दिसल्या. ख्रिसम सपासून थर्टी फर्स्टपर्यंत हीच स्थिती कायम राहणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असून पुढील काही दिवस माणगावकरांसाठी मोठी परीक्षा ठरणार आहे. मुंबई, पुणे, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातून येणारे हजारो पर्यटक दिवेआगार, श्रीवर्धन, बोर्ली, हरिहरेश्वर, मुरुड, जंजिरा यांसह कोकणातील विविध पर्यटनस्थळी मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. मात्र या पर्यटनाचा लाभ होण्याऐवजी माणगाव बाजारपेठ व अंतर्गत रस्त्यांवर वाहतुकीचा असह्य ताण पडत असून स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनाही प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दरवर्षी सणासुदीच्या काळात हीच परिस्थिती ओढवते, तरीही शासन व महामार्गाचे ठेकेदार अद्याप ढिम्म का? वेळेत काम पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांवर कोणतीही ठोस कारवाई का होत नाही? केवळ उद्घाटनांचे श्रेय घेण्यात व्यस्त असलेली यंत्रणा प्रत्यक्षात नागरिकांच्या त्रासाकडे डोळेझाक करत आहे का, असा संतप्त सवाल माणगावकर विचारत आहेत.

पर्यटनाच्या नकाशावर कोकण झळकत असताना, तेथे जाणारा प्रमुख प्रवेशद्वार असलेला माणगावच जर ठप्प झाला असेल, तर हे शासनाच्या अपयशाचे जिवंत उदाहरण ठरत आहे. वेळेत महामार्ग व बायपासची कामे पूर्ण झाली असती, तर ना नागरिकांना असा त्रास झाला असता, ना पोलिसांवर अतिरिक्त ताण आला असता. आता तरी शासनाने आणि संबंधित ठेकेदारांनी केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष कामाला गती द्यावी, अन्यथा सणासुदीच्या प्रत्येक सुट्टीत माणगावची वाहतूक कोंडी ही कायमची डोकेदुखी बनणार आहे.

### माणगावचा रस्ता बनला कोंडमार्ग

कोकणाकडे जाणारा माणगाव हा केवळ तालुक्याचा केंद्रबिंदू नाही, तर लाखो पर्यटकांसाठीचा प्रवेशद्वार आहे. मात्र आज हे प्रवेशद्वार विकासाचे नव्हे, तर अपयशाचे, निष्क्रियतेचे आणि बेजबाबदारपणाचे जिवंत उदाहरण बनले आहे. ख्रिसमस, शनिवार, रविवार आणि थर्टी फर्स्टच्या सुट्ट्यांमुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी ही अचानक आलेली आपत्ती नाही. ही कोंडी म्हणजे वर्षानुवर्षे रखडवलेल्या महामार्ग आणि बायपास कामांची थेट परिणती आहे. हे शासनाला माहीत होते, ठेकेदारांना माहीत होते आणि यंत्रणेलाही माहीत होते. तरीही वेळेत कामे पूर्ण झाली नाहीत, हेच सर्वात गंभीर सत्य आहे. पुणे,ताम्हिणी, माणगाव मार्गावर आणि मुंबईकडून येणाऱ्या महामार्गावर लागलेल्या दोन ते तीन किलोमीटर लांब वाहनांच्या रांगा पाहता एकच प्रश्न उभा राहतो. हा महामार्ग नेमका कुणासाठी आहे ? नागरिकांसाठी की ठेकेदारांच्या बिलांसाठी? माणगाव पोलीस व वाहतूक शाखेचे अधिकारी जीव तोडून कोंडी सोडवण्याचा प्रयत्न करत असताना, दुसरीकडे शासन व ठेकेदार मात्र निवांतपणे फाईलांवर सही करण्यापुरते मर्यादित दिसतात. पोलिसांची दमछाक होते, नागरिकांचे तासन्तास हाल होतात, पर्यटक वैतागतात पण जबाबदारी कुणाचीच नाही, हीच या व्यवस्थेची शोकांतिका आहे. महामार्गावरील अपूर्ण कामे, ठिकठिकाणी उखडलेले रस्ते, फुलाची ठेवलेली अर्धवट बांधकामे आणि केवळ नावापुरता दिलेला बायपास हे सर्व मिळून माणगाव आज वाहतूक कोंडीचे केंद्र बनले आहे.

---

# निवडक

## उमेश पाटील कर्जतचे पोलीस निरीक्षक

**कर्जत :** कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांची श्रीवर्धन पोलीस ठाण्यात बदली झाली असून त्यांच्या रिक्त जागेवर उमेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पाटील हे श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. ही खांदेपालट झाली असली तरी भोसले यांची सहा महिन्यातच बदली झाल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## गीता पाठशाळा मोफत दिनदर्शिका


**उरण :** उरण तालुक्यातील केगाव-विनायक येथील प्रजापिता ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळा वतीने सालाबाद प्रमाणे मोफतदिनदर्शिका वाटप करण्यात आले.अध्यात्मातून समाज सेवा या भावनेतून नियमितपणे सेवा केली जाते असे ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळाचे विश्वास यांनी सांगितले. सरकारी कार्यालय, शाळा व सार्वजनिक कार्यालयात तसेच मंदिर अशाा ठिकाणी दिनदर्शिकेचे मोफत वाटप केले जाते. त्यांना द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, ओम शांतीचे नेहमीच प्रचार करीत असतात. दरवर्षी उन्हाळी सुट्टी निमित्त ७ दिवसीय राजयोग शिबीर घेतले जातात. गरजू व गरीब मुलांना वह्या, व शालोपयोगी वस्तू वाटप,१० वी व १२ वी त ७५ टक्के हून जास्त मार्क्स मिळविलेल्या विद्यार्थांचा गुणगौरव सोहळा व मार्गदर्शन केले जाते. दरवर्षी आपला वाढदिवस विशेष मुलांच्या शाळेत व वृद्धाश्रम येथे जावून खाऊ वाटप करून भेटवस्तू व मदतकरून साजरा केला जातो असे ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळाचे विश्वास यांनी सांगितले.

## मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांचा सेवापूर्ती कार्यक्रम उत्साहात संपन्न

**माणगाव :** अभिनव ज्ञानमंदिर, उसर खुर्द विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ दत्तात्रय सुर्वे यांचा सेवापूर्ती कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जितेंद्र ढेगळे, विजयराज डोंगरे, एन.डी. खडके, किशोर शिंदे, नटे, कृष्णाजी महाडिक तसेच संगीता सुर्वे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किशोर आल्हाट होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक विनोद लाड यांनी केले. प्रमुख अतिथींचे शाळा व संस्थेच्या वतीने पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. छत्रपती शिक्षण मंडळ,कल्याण संस्थेच्या वतीने किशोर आल्हाट यांच्याहस्ते भगवान बिरसा मुंडा प्रतिमा, छत्रपती शिवाजी महाराज मोमेंटो, शाल, बुके व श्रीफळ देऊन नागनाथ सुर्वे यांचा गौरव करण्यात आला. तसेच मा. विजयराज डोंगरे यांच्या वतीने संपूर्ण पेहराव, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. उसर हायस्कूलच्या कर्मचारीवर्गाच्या वतीनेही संपूर्ण पेहराव, शिवराज्याभिषेक प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. मुंबईहून आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी तसेच पंचायत समिती व तळेगाव केंद्राच्या वतीने केंद्रप्रमुख जमदाडे यांनीही सुर्वेंचा सत्कार केला. दीर्घ शैक्षणिक सेवेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा यावेळी मान्यवरांनी गौरव केला. कृतज्ञतेची भावना,आठवणींचा उजाळा आणि सन्मानाच्या क्षणांनी हा सेवापूर्ती कार्यक्रम संस्मरणीय ठरला.उसर पंचक्रोशीतील ग्रामस्थ व महिला प्रचंड संख्येनी हजर होते.

## विधी स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षण

**वाघ्रण :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग यांच्या माध्यमातून विधी स्वयंसेवकांसाठी रिफ्रेशर ट्रेनिंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले विधी स्वयंसेवक सहभागी झाले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सृष्टी नीलकंठ , जिल्हा न्यायाधीश१, रायगड यांनी भूषवून उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, मनोगत व प्रशिक्षणाबाबतचे मार्गदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांनी केले. या प्रशिक्षण सत्रात ॲड. मनीषा नागावकर, ॲड. उषा पाटील, ॲड. हिना तांडेल, ॲड. तनुष्का पेडणेकर आदी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी कायद्याच्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन करून विधी स्वयंसेवकांना अद्ययावत माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पनवेल येथील विधी स्वयंसेवक सन्माननीय शैलेश कोंडसकर यांनी केले, तर कार्यक्रमाच्या शेवटी अलिबाग येथील विधी स्वयंसेवक पुनम रांजणकर यांनी आभार प्रदर्शन केले.



## रायगडातील निसर्ग सौंदर्याने नटलेले ‘इमेज कॅलेंडर’

**रायगड :** इमेज कॅलेंडर आयोजित छायाचित्र स्पर्धेचे यंदाचे आठवे वर्ष आहे. जिल्ह्यातील हौशी आणि व्यावसायिक छायाचित्रकारांच्या कलेला वाव देण्यासाठीची परंपरा इमेज कॅलेंडरने कायम ठेवली आहे. यंदाही २०२६ च्या वार्षिक कॅलेंडरसाठी रायगड जिल्ह्यातील निसर्गाने नटलेली पुरातन मंदिरे, निसर्ग सौंदर्य, पारंपरिक सण, गड किल्ल्यांच्या छायाचित्रांनाही स्पर्धेत संधी देण्यात आली होती. जिल्ह्यातून सादर झालेल्या शेकडो छायाचित्रांमधून १२ छायाचित्रांची निवड मान्यवर परीक्षकांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या स्पर्धेला जिल्ह्यातून शेकडो छायाचित्रकारांचा सहभाग लाभला होता. यामुळे २०२६ च्या इमेज कॅलेंडरच्या दिनदर्शिकेमध्ये रायगड जिल्ह्यातील निसर्गाने नटलेली पुरातन मंदिर यांची छबी अवतरलेली पहावयास मिळणार आहे. या स्पर्धेत दीक्षित कांबळे, महाड, वैभव शिंदे, श्रीबाग, महेंद्र महाडिक, अलिबाग, शुभम सुंकले, थळ, डॉ. गणेश गवळी, अलिबाग, निलेश दुदम, गोंधळपाडा, भारत रांजणकर, मुरुड, सनीश म्हात्रे, मिळकतखार, जयंत ठाकूर, पेण, कल्पेश पाटील, महाड, मोनिका औचटकर, बेलोशी, सुनील ठोकळ, अलिबाग यांच्या छायाचित्राची निवड करण्यात आली आहे.स्पर्धेसाठी सादर करण्यात आलेल्या शेकडो छायाचित्रांमधून कॅलेंडरसाठीच्या बारा पानांसाठी निवड करणे जिकरीचे होते. यासाठी इमेज कॅलेंडर संस्थेने अलिबाग येथील ज्येष्ठ पत्रकार, दैनिक पुढारीचे रायगड आवृत्ती प्रमुख जयंत धुळप यांची निवड केली होती. त्यांच्या परीक्षणानंतर बारा छायाचित्रणाची निवड करण्यात आली आहे. क्रमांकानुसार कॅलेंडरच्या पहिल्या पानावरुन छायाचित्रकारांची छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती इमेज कॅलेंडरचे संस्थापक जितू शिगवण, रमेश कांबळे आणि समीर मालोदे यांनी दिली आहे.

---

## पोलादपूर नगरपंचायतीची घरपट्टीवाढीबाबत गुपचूप जनसुनावणी?

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

नगरपंचायत पोलादपूरच्या अन्याय्य घरपट्टीवाढीविरोधातील मोर्चेकरी नागरिकांना मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी दिलेल्या पत्राला त्यांनी स्वत:चे केराची टोपली दाखवित घरपट्टीवाढीबाबतच्या हरकती घेणाऱ्या काही मोजक्याच मालमत्ताधारकांच्या मुलाखती घेऊन गुपचूप जनसुनावणी सुरू असल्याची माहिती मिळताच पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाच्या कार्यकर्त्यांनी नगरपंचायत कार्यालयात धाव घेऊन नगररचनाकारांसह मुख्याधिकारी तसेच नगराध्यक्षा यांच्या उपस्थित सुरू असलेल्या जनसुनावणीच्या कामकाजाबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली.

नगरपंचायतीने लादलेल्या वाढीव घरपट्टीसंदर्भातील आंदोलनानंतर मोर्चेकऱ्यांना मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी लेखी पत्राद्वारे कलम १०७ द्वारे

**■ मुख्याधिकाऱ्यांनी मोर्चेकऱ्यांना दिलेल्या लेखी पत्राला स्वत:हूनच दाखवली केराची टोपली?**

नवीन नगराध्यक्षा पदावर बसताच जनरल मिटींगचा ठराव घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविण्याचे आश्वासित केले होते. मात्र, अशाप्रकारचा ठराव करण्यात आला आहे अथवा कसे, याबाबतची माहिती कार्यकर्ते दर्पण दरेकर यांच्या अर्जानंतर देण्यात आली नाही. बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी काही निवडक हरकती घेणाऱ्यांच्या हरकतींवर नगररचनाकारांच्याप्रमुखउपस्थितीत गुपचूप जनसुनावणी घेण्यात आली. मात्र, याबाबत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी तसेच नगरपंचायतीच्या सुचना फलकावर नोटीस लावण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. तथापि, ९९ टक्के पोलादपूरकरांना या जनसुनावणीची माहिती पोहोचविण्यात आली नसल्याचे यावेळी निदर्शनास आणून देण्यासाठी पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाच्या कार्यकर्त्यांनी नगरपंचायत कार्यालयात धाव घेतली.

सर्वोच्च न्यायालयाच्या स्थानिक प्राण्यांपासून नागरिकांना सुरक्षितपणे जगण्याच्या अधिकाराला बाधा निर्माण होत असल्याबद्दल नगरपंचायतीचे न्यायालयाचा अवमान होण्याइतपत अक्षम्य दूर्लक्ष झाल्याचे मुख्याधिकारी शिपाई यांच्यासह नगररचनाकारांच्या निदर्शनास आणून दिले. त्याकडे विशेष लक्ष देण्याऐवजी मुख्याधिकारी आणि नगरपंचायत नागरिकांच्या सुरक्षिततेपेक्षा घरपट्टीवाढीच्या जुलमी कराबाबत आग्रही असल्याच्या लोककल्याणविरोधी भूमिकेचा उहापोह करण्यात आला.

## केळघर रस्त्याची दुरवस्था

**कोर्लई :** रस्त्याच्या दुतर्फा झाडी झुडपे वाढलेल्या फांद्या यामुळे मुरुड तालुक्यातील दुर्गम भागातील केळघर एसटी सेवा बंद झाल्याने विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असून संबंधित बांधकाम खात्याच्या दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. मुरुड केळघर मार्गे रोहा रस्त्यावर मुरुडपासून अंदाजे पंधरा कि.मी. अंतरावर असलेल्या केळघर रस्त्यावर दुतर्फा झाडी झुडपे आणि वाढलेल्या झाडांच्या फांद्या एसटी व अवजड वाहनांची डोकेदुखी ठरत असून फांद्या लागून काही गाड्यांच्या काचा फुटल्या असल्याचे बोलले जात आहे.त्यामुळे या मार्गावर एसटी सेवा बंद झाल्याने शालेय विद्यार्थी ज्येष्ठ नागरिक व प्रवासी वर्गाला त्रास सहन करावा लागतो आहे. बांधकाम खात्याने यात उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

## रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांच्या प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्यादित, अलिबाग यांच्यावतीने लोणावळा येथील बॅसिलिका हॉटेल येथे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सदर प्रशिक्षण शिबिरासाठी कार्पोरेट को-ऑपरेटिव्ह कन्सल्टंट, कोच, ट्रेनर व लेखक संदीप पाटील यांनी मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण शिबिरात जिल्हा महासंघाच्या १५ सभासद पतसंस्थांचे एकूण ५८ प्रतिनिधी सहभागी झाले होते. यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, अधिकारी व कर्मचारी वर्गाचा समावेश असून अलिबाग, मुरुड, उरण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव व महाड तालुक्यातून प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन ॲड. जे. टी. पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान वसुली व्यवस्थापन आर्थिक शिस्त संस्थात्मक स्थैर्य आणि सहकारातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक कौशल्यांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

सदर शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महासंघाचे सचिव योगेश मगर, महासंघ संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले. प्रशिक्षणार्थींनी शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले.

---

## प्रचार समाप्तीनंतर सर्व प्रसारमाध्यमांतील निवडणूकविषयक जाहिरातींना बंदी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या जाहीर प्रचाराची मुदत १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपणार असल्याने, इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांसह अन्य कुठल्याही प्रसारमाध्यमांद्वारे निवडणुकविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज येथे दिली.

राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची महानगरपालिकेच्या निवडणुकांसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. अधिनियम ातील तरतुदींनुसार मतदान सम ाप्तीच्या ४८ तास आधी म्हणजे १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता जाहीर प्रचाराची मुदत संपेल. त्यानंतर प्रसारमाध्यम ांतून कुठल्याही प्रकारची जाहिरात प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाही. त्यामुळे जाहीर प्रचाराच्या समाप्तीनंतर मुद्रित माध्यमांच्या जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनाचा किंवा परवानगीचा प्रश्न उद्भवत नाही. यासंदर्भातील सविस्तर बाबी राज्य निवडणूक आयोगाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ मध्ये नमूद केल्या आहेत. काकाणी यांनी सांगितले की, इच्छूक उमेदवाराचे नाव संबंधित महानगरपालिकेच्या मतदार यादीत असणे आवश्यक आहे; परंतु सूचक आणि अनुमोदकाचे नाव मात्र उमेदवार निवडणूक लढवत असलेल्याच प्रभागात असणे आवश्यक असल्यांची त्यांनी सांगितले.

## टीबी फोरम समितीची बैठक

**रायगड :** जिल्ह्यात क्षयरोग निर्मूलनासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा टीबी फोरम तसेच टीबी कोमॉर्बिडीटी समन्वय समितीची जिल्हास्तरीय बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ. अक्षयराज राठोड, डॉ. नालंदा पवनारकर, डॉ. प्रसाद वाईगणकर, डॉ. प्रदीप पोतदार, डॉ. विकास पवार, संजय माने, रेश्मा संकपाळ यांच्यासह विविध सामाजिक संस्था व कॉर्पोरेट क्षेत्राचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत टीबी मुक्त ग्रामपंचायत उपक्रमाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

## उरणच्या कोळी बांधवांचा लढा देशभर गाजला

### रामदास जनार्दन कोळी यांचा दिल्लीत सत्कार

**। उरण । प्रतिनिधी ।**

दिल्ली उच्च न्यायालय बार असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेले फाईट फॉर जस्टीस अवॉर्ड २०२५ हे कार्यक्रम नवी दिल्ली येथे मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमात संपूर्ण देश विदेशात गाजलेल्या रामदास जनार्दन कोळी विरुद्ध जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, सिडको व ओएनजीसी यांच्या विरोधात लढल्या गेलेला हा लढा इतिहासात अजरामर झाला. त्याची नोंद ही दिल्ली येथे झाली.

२०१३ साली पारंपारिक मच्छिमार बचाव कृती समितीच्या वतीने दाखल करण्यात आलेली याचिका आणि याचिकाकर्ते रामदास जनार्दन कोळी यांचा यथोचित सत्कार व गौरव यावेळी करण्यात आला.

प्रकृतीच्या कारणास्तव ते या सोहोळ्यात उपस्थित नव्हते. याचिकाकर्ते रामदास जनार्दन कोळी यांचे प्रतिनिधी म्हणून सामाजिक कार्यकर्ते नंदकुमार पवार सत्कार सोहळ्यात सहभागी झाले होते.हा लढा अनेक अर्थांनी अपवादात्मक असा आहे.कुठल्याही धंदेवाईक वकिलांची मदत न घेताच मातृभाषेत लढला गेलेला हा लढा ऐतिहासिक व प्रत्येक समाजासाठी आदर्श व प्रेरणादायी असा होता.भांडवल फक्त सच्चाई आणि इमानदारी एवढीच होती.ज्याची दखल राष्ट्रीय हरित लवाद पुणे मुख्य न्यायाधीश किनगावकर व अजय देशपांडे यांनी घेत मच्छिमारांना नैसर्गिक न्याय मिळवून दिला. त्याचबरोबर वकील देण्याची तयारी देखील दर्शविली होती.यामुळे पैशाचा माज आणि अहंकार नतमस्तक झाला. न्यायालयीन व्यवस्थेवर विश्वास दृढ झाला कारण सत्याचा विजय झाला. महाराष्ट्र व संपूर्ण भारताच्या इतिहासात हे प्रथमच घडले.

यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणवादी नंदकुमार पवार म्हणाले कि आश्चर्य आणि खेद यासाठी व्यक्त करावासा वाटतो की या लढ्याची दखल हजारो कि.मी दूर दिल्ली येथे परराज्यात गांभीर्याने घेतली गेली परंतु, स्वतः च्या महाराष्ट्र राज्याने याची दखल कधी घेतली नाही.हे अतिशय दुर्दैवाने म्हणावे लागत आहे की, महाराष्ट्र राज्य सरकार यांनी फक्त आमच्या पारंपारिक मच्छिमार समाजाच्या संवैधानिक हक्काच्या खाजन जमिनी फुकटात लुटण्यात फक्त धन्यता मानत आहे. हे सर्व षडयंत्र उरण,पनवेल तालुक्यात सुरू आहे.

---

**स्थानिकांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर** | **वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपाय**

## कशेळे मार्गावरील अतिक्रमणांवर कारवाई

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

शहापूर-मुरबाड-कर्जत हा राष्ट्रीय महामार्ग कशेळे गावातून जातो. त्याचवेळी उरण-पनवेल- नेरळ- भीमाशंकर हा राज्यमार्गदेखील कशेळे गावातून जातो. त्याचवेळी कशेळे खांडस या प्रमुख जिल्हा मार्ग देखील गावातून जात असून या सर्व प्रमुख रस्त्यांवर अतिक्रमणे करून बांधकामे झाली आहेत. हि सर्व बांधकामे तोडण्यास सुरुवात झाली असून त्या निमित्ताने स्थानिकांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला आहे.



कशेळे गावातून जाणाऱ्या कशेळे-मुरबाड, कशेळे-कर्जत, कशेळे-नेरळ, कशेळे-कोठींबे आणि कशेळे-खांडस या सर्वच प्रमुख रस्त्यांवर वाढलेल्या अतिक्रमणामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. विक्रेते व दुकानदारांनी केलेल्या अतिक्रमणामुळे बस, जड वाहने तसेच नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. हि सर्व अतिक्रमणे काढण्यात यावी यासाठी कशेळे व्यापारी संघटना अनेक वर्षे मागणी करीत आहे.

शेवटी सार्वजनिक बांधकाम विभागाने हि सर्व अतिक्रमणे काढण्यास सुरुवात झाली असून कशेळे गावात या सर्व प्रमुख रस्त्यावर सुरु झाली आहे. पोलीस संरक्षणात अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. यावेळी ग्रामस्थ, कशेळे व्यापारी संघटनेचे पदाधिकारी तसेच पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कारवाईदरम्यान अतिक्रमण केलेल्या रस्त्याच्या भागांना रंगाने स्पष्टपणे चिन्हांकित करण्यात आले असून संबंधित विक्रेते व दुकानदारांना दोन दिवसांच्या आत अतिक्रमण स्वतःहून काढून टाकण्याची अंतिम मुदत देण्यात आली आहे. दिलेल्या मुदतीत अतिक्रमण न हटवल्यास थेट कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## ‘शेतकरी दिनी शेतकऱ्यांवर आक्रमक होण्याची वेळ’

**। नेरळ । प्रतिनिधी।**

कर्जत तालुक्यात किसान क्रांती संघटना शेतकऱ्यांच्या हिताचे कार्य करीत असल्याने या संस्थेच्या पाठीशी मोठ्या प्रमाणावर शेतकरी आहेत. मात्र शेतकऱ्यांना जगणे मुश्किल करणाऱ्या सरकारी धोरणामुळे शेतकरी दिन साजरा करून आपली उपस्थिती सरकारला दाखवावी लागत आहे, अशी टीका किसान क्रांती संघटनेचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष टी. एस.देशमुख यांनी केली.

कर्जत तालुका किसान क्रांती संघटनेच्या वतीने नेरळ येथे जिल्हास्तरीय शेतकरी दिनाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृह येथील आगरी समाज हॉलमध्ये किसान क्रांती संघटनेचे वतीने शेतकरी दिन आणि शेतकरी जोडप्याचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी संघटनेचे प्रदेश संस्थापक अध्यक्ष टी. एस. देशदुख, जिल्हा अध्यक्ष उत्तम शेळके, जिल्हा संपर्क प्रमुख रामदास माळी,तालुका अध्यक्ष भरत राणे आदी मान्यवर उपस्थित होते. कृषी विभागाचे उपविभागीय अधिकारी सुनील निंबाळकर, तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे, कल्याण तालुक्याचे कृषी अधिकारी अशोक गायकवाड, तालुका मंडळ कृषी अधिकारी दिनेश कुमार कोळी, कोल्हारे ग्रामपंचायत सरपंच महेश विरले आणि पोशीर ग्रामपंचायत माजी सरपंच हरिश्चंद्र निरगुडा आदी प्रमुख उपस्थित होते. संघटनेचे उपाध्यक्ष शरद तवळे यांनी प्रास्ताविक केले.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# माणसे पळवणारी टोळी

ठाकरे सेना व मनसे यांची युती जाहीर करताना राज ठाकरे यांनी बुधवारी मुले पळवणाऱ्या टोळीची आठवण करून दिली होती. युतीचे जागावाटप का जाहीर केले जात नाही या प्रश्नावर ते म्हणाले होते की, भाजपच्या रुपाने माणसे पळवणारी टोळी सध्या वावरत आहे. सगळा महाराष्ट्र सध्या या टोळीच्या भयानक कारवायांचा अनुभव घेत आहे. गुरुवारी नाशिकमध्ये तर याचा कहर आणि कडेलोट झाला. बुधवारी शिवसेना व मनसे युती झाली म्हणून नाशिकमध्ये दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी जाहीर आनंद व्यक्त केला, पेढे वाटले, नाचदेखील केला. यामध्ये पूर्ण वेळ हजेरी लावल्यानंतर ठाकरे सेनेचे माजी महापौर विनायक पांडे आणि यतीन वाघ तसेच मनसेच दिनकर पाटील यांनी दुसऱ्याच दिवशी म्हणजे गुरुवारी सदेह व सकार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश केला. विशेष म्हणजे त्यांच्या या प्रवेशाला खुद्द भाजपच्या कार्यकर्त्यांचा तीव्र विरोध होता. गोपीनाथ मुंडे यांच्या बरोबरीने वावरलेले ज्येष्ठ नेते ना. स. फरांदे यांच्या सूनबाई, भाजपच्या ज्येष्ठ आमदार देवयानी फरांदे यांनी तर या प्रवेशांना जाहीर विरोध केला व कार्यक्रमावर बहिष्कार घातला. मंत्री गिरीश महाजन यांनी तरीही हे प्रवेश रेटून नेल्याने फरांदेबाईंच्या डोळ्यात पाणी आले. आपल्याच लोकांच्या डोळ्यात पाणी काढणारा धन्य तो भाजप आणि धन्य त्याचे नेते. पण सध्या या पक्षाला अटकाव करणारे कोणीच नाही. त्यामुळे याचे नेते चौखूर उधळले आहेत. रवींद्र चव्हाण यांनी ठाणे, डोंबिवली, कल्याण, बदलापूर भागात अशीच फोडाफोडी केली आणि एकनाथ शिंदे यांना हादरा दिला. अर्थात, खुद्द शिंदे हेदेखील फुटीर असल्याने त्यांच्यावर अन्याय झाला असे कोणाला वाटण्यासारखे नाही. शिंदे यांनी अमित शाह यांच्याकडचे आपले वजन वापरून पुढची पळवापळवी थांबवली. पण तरीही बदलापूर आणि अंबरनाथ या पालिका त्यांच्या हातातून गेल्याच. पुण्यात भाजपवाल्यांनी अजितदादांच्या राष्ट्रवादीतून मोठी आयात केली आहे. मुंबईत येत्या काही दिवसात सेना व मनसेतून आणखी काही मोठ्या लोकांना फोडले जाईल अशी शक्यता आहे.

## निवडणुकीआधी उसनवारी

एकेकाळी ठाण्यात शिवसेनेशी गद्दारी केल्याच्या संशयावरून श्रीधर खोपकर यांचा खून झाला. त्या प्रकरणात आनंद दिघे तुरुंगात होते. त्यामुळे सेनेतून फुटणे हे सोपे नव्हते. छगन भुजबळ बाहेर पडले तेव्हा त्यांना बराच काळ खास पोलिस संरक्षण होते. आज त्याच शिवसेनेवर तोंड लपवत फिरण्याची वेळ भाजपने आणली आहे. जागावाटप आणि उमेदवार आधीच जाहीर केले तर असंतुष्ट लोक फुटून भाजपकडे जातील अशी भीती ठाकरे सेना आणि मनसेला वाटते आहे. वास्तविक दोन्ही ठाकरे एकत्र आल्याने वातावरण बदलायला हवे होते. कार्यकर्त्यांमध्ये नवा जोष भरला जायला हवा होता. पण तसे घडलेले नाही हे नाशिकमधल्या घटनेवरून दिसते. अर्थात, ठाकरे सेना व तिच्या मतदारांमध्ये निराशा निर्माण करण्यासाठी भाजप हे मुद्दाम घडवून आणत आहे. पैसा व सत्तेच्या जोरावर आपण कोणाचीही निष्ठा विकत घेऊ शकतो असा माज या पक्षाच्या नेत्यांना वाटू लागला आहे. मात्र असे करताना आपण नीतीमत्तेची किमान चाडही बाळगत नाही याची तमा त्यांना वाटत नाही. सत्तेचे राजकारण व राजकीय नेते हे आधीच बदनाम आहेत. पण कसलीही लाजलज्जा नसलेल्या स्वार्थी, विश्वासघातकी लोकांचे डावपेच आणि चढाया म्हणजेच राजकारण अशी व्याख्या रुढ करण्याचा चंग बांधलेला दिसतो. विरोधकांचे मनोबल खच्ची करणे, कार्यकर्त्यांच्या रुपाने असलेली त्यांची शक्ती खलास करणे आणि भाजप हाच एकमेव पर्याय आहे हे जनतेच्या मनावर ठसवणे यासाठी हे सर्व चालले आहे. यातून भाजपची दहशत दिसत असेल, त्याची सत्ता व पैसा दिसत असेल, पण भाजपबद्दलचे प्रेम नक्कीच दिसत नाही. एरवी मोदी ते फडणवीस सगळे जण विकासाच्या गप्पा मारतात. भारताची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर आहे असे सांगतात. मोदींची लोकप्रियता किती अफाट आहे याचे वर्णन करतात. हे सगळे खरे असेल तर भाजपला ऐन निवडणुकीच्या तोंडावर अशा उधारउसनवाऱ्या करण्याची वेळ का यावी हा खरा प्रश्न आहे.

## कार्यकर्त्यांच्या डोक्यावर पाय

महापालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची मुदत २३ रोजी सुरु झाली. पण दोन दिवसात मुंबई, नागपूर, पुणे, संभाजीनगर इत्यादी ठिकाणी जवळपास एकही अर्ज दाखल झालेला नाही. मुळात बहुसंख्य ठिकाणी अजून युती व आघाडी होणार का आणि कोणकोणते पक्ष एकत्र येणार हेच ठरलेले नाही. पुणे व इतर काही ठिकाणी अजित पवार व शरद पवार यांचा राष्ट्रवादी एकत्र येईल असे दिसते. पण एकीकडे हे चालू असतानाच अजूनही अजित पवार भाजपसोबत युती होईल का हे चाचपून पाहत आहेतच. कारण, तसे केले नाही तर आपल्या पक्षातल्या लोकांना भाजप फोडेल अशी त्यांना भीती वाटते. अमित शाह यांच्या धाकामुळे शिंदे गटातील माणसे फोडण्यावर सध्या बंदी आहे. अन्यथा, भाजपने तेथेही गळ टाकलेले होतेच. म्हणजेच विरोधकच नव्हे तर आपल्या मित्र पक्षांनाही खच्ची करण्याचे भाजपचे हे धोरण आहे. हे करताना आपल्याच कार्यकर्त्यांवर अन्याय होत आहे व ते नाराज होत चालले आहेत याचीही त्याला पर्वा नाही. नाशिकमध्ये काल जे घडले तेच दोन दिवसांआधी पुण्यात झाले. कोथरूड हा भाजपचा बालेकिल्ला आहे. तेथे ब्राह्मण समाज मोठ्या प्रमाणात राहतो. हा सर्व कट्टर मोदीसमर्थक आहे. त्यामुळे इथून संघाची पार्श्वभूमी असलेल्या व मूळच्या भाजपवाल्याला तिकिट मिळावे अशी अपेक्षा होती. पण तिथे आता ठाकरे सेनेचे पूर्वीचे नगरसेवक पृथ्वीराज सुतार यांना घेण्यात आले आहे. अजून तिकिटवाटप झालेले नसले तरी भाजपच्या उमेदवारावर अन्याय होणार हे सर्वजण गृहित धरून चालले आहेत. कोणत्याही स्थितीत निवडणूक जिंकायची हे आजवरचे धोरण होते. आता जिंकू शकणाऱ्या प्रत्येकावर भाजपचाच शिक्का असला पाहिजे हे नवे धोरण दिसते. दिल्ली आणि मुंबईतल्या सत्तेच्या दहशतीमुळे कार्यकर्ते व नेते यावर जास्त काही बोलत नाहीत. सुधीर मुनगंटीवार यांनी भाजपच्या नाराज कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आपण महाराष्ट्रभर दौरा करणार असे जाहीर केले होते. पण त्यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यालाही एका दिवसात हा दौरा रद्द करावा लागला. चंद्रपुरात आपल्याविरोधात गटबाजी करायला प्रोत्साहन दिले जाते अशी सुधीरभाऊंची तक्रार होती. पण तिच्याकडे शानदारपणे दुर्लक्ष करून चंद्रपूर महापालिकेचे निवडणूक प्रमुख म्हणून पुन्हा एकदा भाऊंचे विरोधक व भाजपचे आमदार किशोर जोरगेवार यांचीच नियुक्ती करण्यात आली आहे. एकेकाळी दिव्याच्या खांबाला काँग्रेसचे तिकिट दिले तरीही तो निवडून येईल असे म्हटले जात असे. आज भाजप त्याच अवस्थेला पोचला आहे असे भाजपच्या नेत्यांना वाटू लागले आहे. त्यामुळे, कार्यकर्त्यांच्या भावना, नीती-अनीती, तत्वे यांचा खून पाडू, तरीही आम्हीच विजयी होऊ अशी मस्ती तयार झाली आहे.

विचार

# महागाई आटोक्यात, गरिबी कायम

***एव्हाना जगाबरोबरच भारतालाही नव्या वर्षाचे वेध लागले आहेत. अर्थनगरी या नव्या वर्षातले नवे अर्थसंकेत जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचाच एक सांगावा म्हणजे पुढच्या वर्षीही महागाई कमी राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, कोल्हापुरी चपलेचा सातासमुद्रापार जाण्याचा प्रवास अलिकडेच स्पष्ट झाला. त्याच वेळी जीडीपी वाढाला, पण गरीबी कायम का आणि कशी राहिली याची चर्चा विस्ताराने ऐकायला मिळाली.***



**महेश देशपांडे**

एव्हाना जगाबरोबरच भारतालाही नव्या वर्षाचे वेध लागले आहेत. अर्थनगरी या नव्या वर्षातले नवे अर्थसंकेत जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचाच एक सांगावा म्हणजे पुढच्या वर्षीही महागाई कमी राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, कोल्हापुरी चपलेचा सातासमुद्रापार जाण्याचा प्रवास अलिकडेच स्पष्ट झाला. त्याच वेळी जीडीपी वाढाला, पण गरीबी कायम का आणि कशी राहिली याची चर्चा विस्ताराने ऐकायला मिळाली.

जीएसटी दरांमध्ये बदल झाल्यामुळे सप्टेंबर-नोव्हेंबरमध्ये किरकोळ महागाई सुमारे २५ बेसिस पॉइंट्सने कमी झाली आहे. त्यामुळे आता पुढच्या काळात महागाई कमी होणार की वाढणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. 'स्टेट बँक रिसर्च'च्या अहवालानुसार येणारे वर्ष काही प्रमाणात दिलासा देणारे ठरण्याची शक्यता आहे. २०२६ मध्ये देशातील किरकोळ महागाई ३५ बेसिस पॉइंटपर्यंत कमी होऊ शकते. 'स्टेट बँक रिसर्च'च्या अहवालानुसार, देशातील महागाई पुढील वर्षी कमी होईल. त्यात जीएसटी सुधारणा महत्त्वाची भूमिका बजावतील. अहवालात म्हटले आहे, की या परिणामात ई-कॉमर्स विक्रीवरील सवलतींचा समावेश नाही. जीएसटीमध्ये कपात केल्यामुळे ती आणखी वाढू शकते. या सुधारणांमुळे २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी 'सीपीआय'मध्ये अंदाजे ३५ 'बीपीएस'ची घट होऊ शकते. नोव्हेंबरमध्ये केरळमध्ये महागाई ८.२७ टक्के होती, ग्रामीण भागात ९.३४ टक्के तर शहरी भागात ६.३३ टक्के होती.

अहवालात म्हटले आहे, की राज्यात मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या सोने, चांदी आणि तेल आणि चरबीच्या किमतीत झालेली तीव्र वाढ हे याम ागील एक प्रमुख कारण असू शकते. अहवालानुसार, भारताच्या 'सीपीआय' चलनवाढीच्या मार्गात थोडासा बदल झाला आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये ०.२५ टक्के होता, तो नोव्हेंबर २०२५ मध्ये ०.७१ टक्क्यापर्यंत वाढला आहे. मार्च २०२५ पर्यंत तो २.७ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. रुपयाचे अवमूल्यन पाहता, भारतात महागाई आणखी वाढण्याची शक्यता आहे. आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या अखेरच्या टप्प्यामध्ये महागाई १.८ टक्के तर आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये ३.४ टक्के राहण्याचा अंदाज आहे. अहवालात नमूद केले आहे, की रिझर्व्ह बँक फेब्रुवारीच्या पतधोरण बैठकीपर्यंत व्याजदराच्या भूमिकेत बदल करण्याची शक्यता नाही. 'स्टँडर्ड चार्टर्ड ग्लोबल रिसर्च'ने पूर्वी अंदाज लावला होता, की जीएसटी दरांमध्ये कपात केल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेला (जीडीपी) ०.१ ते ०.१६ टक्के वाढ मिळू शकते आणि वार्षिक महागाई ४० ते ६० 'बीपीएस'ने कमी होऊ शकते. 'स्टँडर्ड चार्टर्ड'ने ताज्या अहवालात म्हटले आहे, की जीएसटी कपातीमुळे सरकारी महसुलात होणारे नुकसान मर्यादित असेल. त्यामुळे सरकारी खर्च आणि महसुलाबद्दलच्या चिंता कमी होतील. अहवालात असेही म्हटले आहे, की एकत्रित राजकोषीय तूट दबावाखाली राहील. ती जीडीपीच्या सुमारे ०.१५ ते ०.२० टक्के असेल. आता वळू या एका लक्षवेधी अर्थवार्तेकडे. जगप्रसिद्ध प्राडा कंपनीसह लिडकॉम आणि लिडकार यांच्यामध्ये मुंबईत कोल्हापुरी चप्पलसाठी सामंजस्य करार झाला. परिणामी २६ फेब्रुवारीनंतर प्राडाच्या ४० विक्री केंद्रांवर आता कोल्हापुरी चप्पलदेखील ग्राहकांसाठी दिमाखात उपलब्ध असणार आहे. भारताच्या पारंपारिक चर्मकला वारशाचा लौकीक सातासमुद्रापार पोहोचवण्यासाठी प्राडा हा आंतरराष्ट्रीय लक्झरी ब्रँड, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम लिडकॉम (संत रोहिदास चर्मउद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ) आणि कर्नाटक सरकारच्या लिडकार (डॉ. बाबू जगजीवनराम चर्मउद्योग विकास महामंडळ) यांच्यात एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाला. या उपक्रमाद्वारे पारंपारिक कोल्हापुरी चप्पलनिर्मिती आणि प्राडाचे आधुनिक, समकालीन डिझाइन्स यांचा संगम घडवून आणला जाणार आहे. दरम्यान, 'लिडकॉम'च्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार यांनी म्हटले आहे, की हा प्रकल्प सततच्या संवादाचा आणि पारंपारिक कलाकृतीचे जतन करणाऱ्या कारागिरांच्या पिढ्यांचा सन्मान करण्यासाठीच्या सामायिक वचनबद्धतेचा परिणाम आहे. 'प्राडा'सोबतचे सहकार्य नैतिक भागीदारीचे प्रतिबिंबित करते. येथे एक जागतिक ब्रँड महाराष्ट्र आणि कर्नाटकातील कारागिरांशी थेट काम करतो. त्यांच्या कौशल्याची ओळख करून देतो आणि त्यांना पूर्ण श्रेय देतो.

'लिडकार'च्या व्यवस्थापकीय संचालक डॉ. के.ए म. वसुंधरा यांनी या विषयी बोलताना जाहीर केले, की कोल्हापुरी चप्पलांचा वारसा हा कर्नाटक आणि महाराष्ट्रातील कारागिरांच्या पिढ्यांमधून शतकानुशतके चालत आलेला कुशल कारागिरीचा वारसा आहे. या जीआय-टॅग केलेल्या कलाकृतीचे जतन करणे आणि आमच्या कारागिरांचे कौतुक करणे हे या सांस्कृतिक, पारंपारिक आणि आर्थिक वारशाचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाचे आहे. प्राडासोबतचे आमचे सहकार्य कर्नाटकच्या कारागिरांसाठी लिडकारच्या माध्यमातून नवी जागतिक संधी निर्माण करते, परंपरेचे रक्षण करते आणि प्रशिक्षण, नोकरीच्या संधी आणि शाश्वत उपजीविकेद्वारे समुदायांना सक्षम बनवते. भारतीय कारागिरीला जागतिक व्यासपीठावर नेण्यासाठी प्राडासोबत हातमि ळवणी करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. हा उपक्रम 'मेड इन' प्रकल्पातील एक नवीन अध्याय आहे, जो 'प्राडा' यांनी दशकापूर्वी जागतिक स्तरावर कारागीर उत्कृष्टतेचा उत्सव साजरा करण्यासाठी सुरू केला होता. भौगोलिक सीमा ओलांडून गुणवत्तेचा एक अतुलनीय मानक असलेल्या समकालीन, नावीन्यपूर्ण डिझाइनवर मास्टर कारागिरांना ओळखणे आणि त्यांच्याशी सहयोग करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. २०१९ मध्ये, कोल्हापुरी चपलांना भौगोलिक संकेत (जीआय) टॅग देण्यात आला. त्यातून प्रामाणिकता जपली गेली आणि त्यांचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित झाले.

आता चर्चा अर्थक्षेत्रातील एका विचित्र समि करणाची. देशातील जीडीपीचा दर वाढूनही गरीबी किंवा गरिबांची संख्या कमी झालेली नाही. भारतातील गरीबीसंदर्भात समोर आलेल्या एका अहवालाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. कोलंबिया विद्यापीठाचे प्राध्यापक आणि सोळाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष अरविंद पनगढीया आणि अर्थशास्त्रज्ञ विशाल मोरे यांच्या अभ्यासानुसार भारताने गेल्या बारा वर्षांमध्ये गरिबी कमी करण्यात ऐतिहासिक यश मिळवले आहे. अहवालानुसार भारतात २०११-१२ ते २०२३-२४ या काळात अतिदारिद्र्य जवळपास संपुष्टात आणले. हिंदू आणि मुस्लीम समुदायांच्या गरिबीचे आकडे पाहिले तर त्यातील दरी दूर झाल्याचे दिसते. हा अहवाल पनगढीया आणि मोरे यांनी तयार केला आहे. अहवालानुसार हिंदू आणि मुसलमान दोन्ही धार्मिक समुदायांमध्ये अतिगरिबीचे अंतर जवळपास संपले आहे. आणि अनेक राज्यांमध्ये मुसलमानांच्या गरिबीचे प्रमाण हिंदूंपेक्षा कमी आढळले आहे. अहवालानुसार २०२२-२३ मध्ये मुसलमानांमध्ये अतिगरीबीचा दर चार टक्के होता. हिंदूमध्ये तो ४.८ टक्के होता. २०२३-२४ मध्ये मुसलमानांचा अत्यंत गरिबीचा दर घटून १.५ टक्के आणि हिंदूंमध्ये २.३ टक्के टक्के झाला.

जागतिक बँकेच्या मते अत्यंत गरिबीचा अर्थ कोणाही व्यक्तीला रोज तीन डॉलर (पीपीपी आधारावर) उत्पन्नावर जगावे लागणे. मोरे आणि अरविंद पनगढीया यांच्या विश्लेषणानुसार ही सीमा भारताच्या 'तेंडुलकर गरीबी रेखा'च्या बरोबर आहे. ती भारतातील गरीबी मोजण्यासाठी आधारभूत मानली जाते. डेटा जमा करण्यासाठी दोन मानकांचा वापर केला गेला. त्यात 'तेंडुलकर पॉवर्टी लाईन' आणि 'एचसीएफ 'एचसीईएस' सर्व्हेसारख्या मानकांचा वापर केला गेला. तेंडुलकर गरिबी रेखा या मानकाआधारे कोणत्याही व्यक्तीच्या कुटुंबाचा खर्च दारिद्र्यरेषेच्या वर आहे की खाली हे पाहिले जाते. भारतात याचा अधिकृतपणे वापर केला जातो. 'एचसीईएस' म्हणजे घरगुती वापर खर्च सर्वेक्षणामध्ये घरोघरी जाऊन लोकांच्या खर्चाशी संबंधित माहिती गोळा केली जाते. पनगढीया आणि मोरे यांच्या या रिपोर्टनुसार २०२२-२३ मध्ये मुसलमानांमध्ये अति दारिद्र्य चार टक्के होते, ते २०२३-२४ घटून दीड टक्का राहिले. हिंदूंमध्ये २०२२-२३ मध्ये हा दर ४.८ टक्के होता. तो २०२३-२४ मध्ये घटून २.३ टक्के झाला दोन्ही सुमदायांमध्ये गरिबी वेगाने घटली आहे आणि दोन्हीमधील फरक जवळपास समाप्त झाला आहे. अभ्यासानुसार २०११-१२ ते २०२३-२४ दरम्यान भारताने गरीबी कमी करण्यात ऐतिहासिक प्रगती केली आहे. गरीबीमध्ये केवळ घसरणीचा वेग जास्त राहिलाच, शिवाय प्रत्येक क्षेत्रात ती समान रितीने कमी झाली आहे.

# प्लास्टिक बंदीसाठी स्वयं:शिस्त महत्वाची

**वैभव पाटील**

पर्यावरणाचा समतोल राखणे आणि प्रदूषण रोखणे, या दृष्टिकोनातून राज्य सरकारने २०१८ मध्ये प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला आहे, पण त्याच्या कठोर अंमलबजावणीअभावी हा निर्णय फसला होता. जवळपास पाच वर्षांपासून प्लास्टिक वापरावर बंदी आहे, परंतु बहुतेक शहरातील छोट्या-मोठ्या विक्रेत्यांकडे पिशव्यांचा सर्रास वापर होत आहे. हल्ली आपल्या दैनंदिन जीवनात प्लास्टिक वापर हा न टाळता येणारा भाग बनला आहे. पिण्याच्या पाण्याच्या बाटलीपासून ते घरात आणावयाच्या भाजीपाल्याच्या पिशवीसाठी सुद्धा आपण प्लास्टिकचा वापर करतो. अगदी याला निसर्ग सुलभ पर्याय असताना सुद्धा. याशिवाय इतर अनेक ठिकाणी आपण प्लास्टिकचा वापर करतो. पण यापैकी जे प्लास्टिक कचऱ्यामध्ये टाकून दिले जाते ते पुन्हा वेचले जात नाही, ते विलग केले जात नाही. हा कचरा निसर्गासाठी म्हणजेच आपल्यासाठी भस्मासुर आहे. वातावरणातील प्रदूषण टाळायचे असेल तर सुज्ञ नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळावा. प्लास्टिक हे अविघटनशील असल्याने शेकडो वर्षे तसेच पडून राहते. प्लास्टिक जाळल्यास विषारी वायूने हवा प्रदूषण होते. तसेच प्लास्टिकच्या पिशव्यांमुळे गटारे तुंबल्याने पावसाळ्यात वसाहती जलमय होतात. प्लास्टिकचा वापर सामान्य झाला आहे आणि त्याच्या हलक्या, स्वस्त आणि बनवण्यास सोप्या गुणधर्मांमुळे ते घरगुती वापरातही आले आहे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच प्लास्टिकला पर्यायी वस्तूंचा वापर सामान्यांच्या जीवनात वाढविण्यासाठी चळवळीच्या माध्यमातून पुढाकार घेणे आवश्यक आहे. नवी व्यवस्था समाजात रूढ होण्यासाठी काही कालावधी जायला हवा. त्यानंतरच दंडात्मक कारवाई करून पुढील पाऊल उचलायला पाहिजे. तेव्हाच ही बंदी परिणामकारकरित्या लागू झाली असे म्हणावे लागेल. आजकाल खेड्यापाड्यात गेलं तरी गावाच्या वेशीवरच प्लास्टिकच्या पिशव्यांचा, बाटल्यांचा, वेगवेगळ्या वेष्टणांचा ढीग पडलेला असतो. तो वाऱ्यामार्फत कसाही विस्कटलेला असतो. ग्रामपंचायत किंवा नगरपरिषदेचे लोक गाडी घेऊन येतात. तो विस्कटलेला प्लास्टिक कचरा आणि कुजणारा इतर पालापाचोळा मिश्रण करून एकत्रच घेऊन जातात. याला काही सजग संस्था अपवाद आहेत. पण त्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. हा गाडीतून नेलेला कचरा कुठेतरी डम्पिंग ग्राउंडवरती टाकला जातो. तो बराचसा न कुजता तसाच पडतो. यामध्ये प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरलेला कुजणारा कचरा निसर्गाच्या सान्निध्यात न आल्याने तो तसाच खूप काळ पिशवीत राहतो. कुजत नाही, अत्यंत घाणेरडी अशी दुर्गंधी सुटते. अशी कित्येक उदाहरणे रोज पाहता येतात.

आता या क्षणापासूनच स्वतः पासून सुरुवात करावी. प्लास्टिक नको म्हणण्यासाठी नेहमी आपल्याजवळ एक छोटीशी घडी होईल अशी कापडी पिशवी ठेवावी म्हणजे कॅरीबॅग आणावी लागणार नाही. कितीतरी गोष्टी आपण प्लास्टिक पिशवीतून आणतोय. या प्लास्टिक पिशव्या वापरून झाल्यानंतर पुनर्प्रक्रिया प्रकल्पापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आपलीच आहे. त्यासाठी कचरा घरातून बाहेर ठेवताना निदान तो विलग करूनच ठेवा जसे की, कुजणारा आणि न कुजणारा. पाणी पिण्यासाठी स्वतःजवळ कायम एक बाटली ठेवावी. म्हणजे प्लास्टिक बाटलीमधील पाणी घ्यावे लागणार नाही. मोठमोठ्या संस्थांना आव्हान आहे की, त्यांनी सुद्धा आपल्या परिसरात नागरिकांसाठी पाण्याच्या बाटल्या भरण्याकरिता स्वच्छ आणि चांगल्या फिल्टरची व्यवस्था करावीच. म्हणजे खूपसे लोक प्लास्टिक बाटलीमधून पाणी खरेदी करण्याऐवजी स्वतः जवळच्या बाटलीत शुद्ध पाणी भरून घेतील. यातूनही जे लोक प्लास्टिकच्या बाटलीचाच वापर करणार आहेत त्यांनी रिकाम्या बाटल्या पुनर्प्रक्रियेसाठी जातील अशा ठिकाणीच टाकाव्यात. आपण सर्वांनी जाणूनबुजून आणि अजाणतेपणे या समस्येत योगदान दिले आहे आणि प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी आणि ते दूर करण्यासाठी काम केले पाहिजे. भारतात, प्लास्टिकच्या वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय धोक्यांना तोंड देण्यासाठी सरकारने प्लास्टिक बंदी ही राष्ट्रीय स्तरावरील मोहीम म्हणून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

म्हणून, प्लास्टिकच्या वापरावर बंदी घालण्याच्या प्रयत्नात सक्रियपणे योगदान देण्याची गरज आहे. शेवटी, या समस्येचा सामना करण्यासाठी सर्वांचा पाठिंबा आवश्यक असेल. हे केवळ सरकार, व्यवसाय आणि व्यक्तींच्या एकत्रित प्रयत्नांनीच शक्य होईल. प्लास्टिकबंदी ही गरज जरी असली तरी कोणाच्या सांगण्यावरून किंवा इतर राज्यांनी केली म्हणून केवळ दिखाव्यासाठी ही बंदी केल्याने ही बंदी यशस्वी होण्याची चिन्ह धूसरच आहे. राजकारणापलिकडे याला व्यापक जनमोहिमेचे रूप दिले तरच ही बंदी यशस्वी होईल, नाहीतर नेहमीप्रमाणे कागदी घोडे नाचवल्यासारखी ही बंदी आणि हा कायदा केवळ कागदावरच राहील.

## लोकसंसद

### भारतात एक लाखांहून अधिक पेट्रोल पंप!

केंद्र शासनाच्या पेट्रोलियम नियोजन आणि विश्लेषण कक्ष (पीपीएसी) च्या अहवालानुसार नोव्हेंबर अखेरपर्यंत देशातील पेट्रोल पंपांची संख्या १००२६६ वर पोहोचली आहे. जगातील सर्वात मोठे पेट्रोल पंप नेटवर्क अमेरिकेचे असून अमेरिकेतील किरकोळ पेट्रोल पंपांची संख्या १९६६४३ इतकी आहे. त्यानंतर चीनचा क्रमांक लागतो. चीनमध्ये पेट्रोल पंपांची संख्या ११५२२८ इतकी आहे. आता भारताने पेट्रोल पंपांचा एक लाखाचा टप्पा ओलांडल्याने भारत हा एक लाखांपेक्षा अधिक पेट्रोल पंप असणारा जगातील तिसरा देश ठरला आहे. त्यानंतर जपान ३०००० पेट्रोल पंप, इटली २१७५०, आणि जर्मनी १५००० यांचा क्रमांक लागतो. भारतातील ९० टक्के पेट्रोल पंप सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या मालकीचे असून सर्वाधिक ४१६६४ पेट्रोल पंप इंडियन ऑइल या कंपनीचे आहेत. त्यानंतर भारत पेट्रोलियमचे २४६०५ आणि हिंदुस्थान पेट्रोलियमचे २४४१८ पेट्रोल पंप देशभरात कार्यरत आहेत. मात्र भारतातील पेट्रोल पंपांनी एक लाखांचा टप्पा ओलांडला असला तरी येणाऱ्या काळात ही संख्या कमीच पडणार आहे. कारण २०२५ च्या अखेरीस भारतात दुचाकी, कार, जीप, टॅक्सी, ऑटो रिक्षा, ट्रक आणि बस अशी सर्व प्रकारची वाहने मिळून अंदाजे ४० कोटी नोंदणीकृत वाहने आहेत. त्यात दररोज ५०००० पेक्षा अधिक नवीन वाहनांची नोंदणी होऊन भर पडत आहे. या वाढत्या वाहन संख्येला इंधन पुरविण्यासाठी पेट्रोल पंपांची संख्याही त्या प्रमाणात वाढवावी लागणार आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

### सह्याद्री देवराई-अपघात की घातपात? संशय दूर व्हावा

नाशिकच्या तपोवन परिसरात कुंभमेळ्यासाठी होऊ घातलेल्या वृक्षतोडीविरोधात अभिनेता व पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदे यांनी अलिकडेच स्पष्ट भूमिका घेतली होती. धर्माच्या नावाखाली निसर्गाचा बळी देणे अयोग्य आहे, हा त्यांचा मुद्दा महत्त्वाचा होता. मात्र त्यानंतर काही दिवसांतच त्यांच्या 'सह्याद्री देवराई' या पर्यावरण प्रकल्पाला आग लागते, ही बाब अनेक प्रश्न उपस्थित करणारी आहे. सह्याद्री देवराई हा ओसाड डोंगर हिरवा करण्याचा दीर्घकालीन प्रयत्न आहे. अशा प्रकल्पाचे आगीत नुकसान होणे हे केवळ एका व्यक्तीचे नव्हे, तर समाजाचे नुकसान आहे. आगीचे कारण अद्याप स्पष्ट नसले तरी तपोवनातील वृक्षतोडीविरोधात आवाज उठवणाऱ्याच्याच प्रकल्पात अशी घटना घडते, यामुळे संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. ही घटना अपघात की घातपात, याचा निर्णय तपासाअंतीच होईल. मात्र या प्रकरणाचा सखोल व पारदर्शक तपास होऊन संशयाचे धुके दूर केले जावे, हीच अपेक्षा.

**दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# 'मालती पांडे-बव'-मराठी भावगीत गायिका

भावगीत गायनाच्या दृष्टीने तो काळ खूप वेगळा होता. विशेषकरून स्त्रियांसाठी. त्याकाळी स्त्रीभावनेची अनेक गाणी पुरुष गायकच गात असत. आणि सगळे पुरुष गायक ती गाणी उत्तम रित्या गात. त्यांचे भावपूर्ण गायन श्रोत्यांच्या हृदयापर्यंत पोहोचत असे. सोपे शब्द, उत्तम चाल आणि मधुर गायन यामुळे ती गाणी पुन:पुन्हा गाण्याची मैफलीत मागणी होत असे. गायन क्षेत्रात पुरुषी वर्चस्व असलेल्या अशा काळात मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलींनी गायन किंवा गायनात कारकीर्द करणे हे तसे तेव्हा कठीणच होते. तशात नुसते गायन शिकणे वेगळे आणि मोठमोठ्या मैफलींत गाणे सादर करणे त्याहून वेगळे. गायनविद्या शिकणे आणि त्यासाठी गुरुदक्षिणा अदा करणे हे त्या काळात अनाठायी खर्चाचे काम समजले जाई. घरखर्चाच्या पलिकडे असा अनाठायी खर्च करण्याचा विचारही कुणाच्या मनात येत नसे. मैफलीत गाण्यासाठी अनुभव आणि सराव हवा. त्याकरता आधी आपल्याकडे गोड गळा आणि उत्तम गाणे सादर करण्याची क्षमता आहे हे स्वत:ला कळणे आवश्यक असते. गायन शिकायला सुरुवात करणे आणि मग त्यात आपला ठसा उमटवून त्याच क्षेत्रात गायक म्हणून कारकीर्द करणे ही आणखीन वेगळी गोष्ट आहे. त्यासाठी योग्य वयात उत्तम गुरू लाभणे, त्यायोगे आपल्या गाण्याला योग्य ती दिशा लाभणे, गाण्याचा कसून रियाज करणे, शिकलेले गाणे आत्मसात होणे, शास्त्रकाटय़ाच्या कसोटीला ते उतरणे, गायनातील तंत्र-मंत्राचा अभ्यास अशा अनेक गोष्टींचा यात अंतर्भाव होतो. आजच्या काळातली लोकप्रिय संज्ञा- ङ्गगॉडफादर मिळणेफ ही त्याकाळी तरी अज्ञातच होती. त्यामुळे तुमच्यात गायक म्हणून तयार होण्याची क्षमता असेल तर त्या गाण्याचे इंद्रधनुष्य नक्की होईल, अशी खात्री असण्याचा तो काळ होता. अशा काळात भावगीताच्या दुनियेत मूळच्या विदर्भातील-वध्र्याच्या एका गायिकेने प्रवेश केला आणि आपल्या सुमधुर स्वरात पुढील काही वर्षे उत्तमोत्तम गाणी गायली आणि संगीतप्रेमींना अपार आनंद दिला. ही गायिका म्हणजे.. मालती पांडे-बर्वे. मराठी चित्रपट संगीत आणि भावगीत गायिका मालती पांडे बर्वे यांचा जन्म १९ एप्रिल १९३० रोजी झाला. मालती पांडे यांच्या घरात संगीताचे वातावरण होते. लहानपणापासूनच गाण्याच्या स्पर्धेत भाग घेणाऱ्या मालतीबाईंनी त्रिवेदी सर व नाशिकचे भास्करराव घोडके यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. किशोरवयातच त्या गाण्याच्या बैठकी करू लागल्या. महाविद्यालयात असताना घराबाहेर या नाटकातील त्यांच्या भूमिकेचे खूप कौतुक झाले. त्यामुळे प्रभातच्या आगे बढोसाठी सुधीर फडके यांनी मालती बाईना बोलावले. वेद मंत्राहून आम्हा वंद्य वन्दे मातरम, पुढचे पाउल पुढेच टाका, त्या तिथे पलीकडे ही त्यांची चित्रपटातील गीते खूप गाजली. कोलंबिया कंपनीने त्यांची पहिली ध्वनिमुद्रिका काढली. राजा बढे व संजीवनी मराठे यांचे काव्य तर संगीत होते गजाननराव वाटवे यांचे. ये पिकवू अपुले शेत मंजुळे आला स्वप्नांचा मधुमास अशी ती दोन गीते होती. गदिमा यांच्या या गाण्याने सगळ्यांना त्या वेळी वेड लावले होते. त्या गाण्यातील फुलुनी राहणे, चोरा तुझिया मनी चांदणे, चोर ही जाणे चंद्र ही जाणे, केली चोरी खपेल काय, ही कडवी मनाचा ठाव घेतात. लपविलेल्या हिरव्या चाफ्याचा गंध आजही मनामनात दरवळतो आहे. घरात संगीताचं वातावरण असलं की आपसूकच सुरांचे संस्कार मनावर होत असतात. संगीत वारसा घरातल्या किमान एकाकडे तरी येत असतो तसेच मालती पांडे यांच्या बाबतीत. गझल, नाट्यगीत, पार्श्वगायन, लावणी असे सगळेच संगीताचे प्रकार तिच्या आवडीचे आहेत. सिनेमा, मालिकांसोबतच प्रियांका बर्वे ने संगीत नाटकांमध्येही काम करते. राहुल देशपांडे यांच्यासोबत ती 'मानापमान', 'संशयकल्लोळ' या संगीत नाटकांसाठी ती काम करते. मालती पांडे यांचे २७ डिसेंबर १९९७ रोजी निधन झाले.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


# रायगडात पर्यटन हंगाम गजबजणार

## ।। २८ पर्यंत हॉटेल फुल्ल ।। वाहतूक कोंडीचे सावट मात्र कायम



। रायगड । प्रतिनिधी ।

**सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी रायगड किनारपट्टी सज्ज झाली आहे. नाताळची सुटी आणि इयर एंडच्या निमित्ताने समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांचा ओघ वाढला असून २८ डिसेंबरपर्यंत बहुतांश निवास व्यवस्था फुल्ल झाल्या आहेत. मुख्य हंगाम असलेल्या २९ डिसेंबर ते १ जानेवारी या काळातील हॉटेल बुकिंग अजूनही सुरु आहेत. मात्र, वाढत्या गर्दीसोबतच वाहतूक कोंडीचे संकटही गडद झाल्याने प्रशासकीय नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**

यावर्षीच्या पर्यटन हंगामाला निसर्गाच्या लहरीपणाचा मोठा फटका बसला. ऐन दिवाळीत झालेल्या मुसळधार पावसामुळे व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. मात्र, आता पडलेली गुलाबी थंडी आणि प्रदूषणमुक्त वातावरणामुळे पर्यटक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या प्रमाणात शालेय सहली येत असून याचा स्थानिक छोट्या व्यावसायिकांना मोठा आधार मिळाला आहे.

हा ओघ जानेवारी मध्यापर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. खासगी ट्रॅव्हल्सने येणाऱ्या पर्यटकांच्या गटांमध्ये मोठी वाढ झाल्याचे सुखद चित्र दिसत आहे. त्याचबरोबर एकल कुटुंबही छोट्या वाहनांमधून पर्यटनाचा आनंद लुटण्यास दाखल होत आहेत.

पर्यटकांची पावले प्रामुख्याने किल्ले जंजिरा, कुलाबा किल्ला, नागाव बीच आणि काशीद बीचकडे वळत आहेत. तसेच अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, वरसोली, किहिम या किनाऱ्यांवर पॅरासेलिंग आणि बनाना राईड यांसारख्या साहसी जलक्रीडांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. मात्र, वाढत्या गर्दीच्या तुलनेत स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आणि पार्किंग यांसारख्या मूलभूत सुविधा अपुऱ्या पडत आहेत.

पर्यटन हंगामात वाहतूक कोंडी ही समस्या कायमच भेडसावत असते. वारंवार यासंदर्भात प्रशासनाकडून योग्य नियोजनाची गरज व्यक्त केली जाते. मात्र, याकडे नेहमीप्रमाणे दुर्लक्षच होत असल्याचे दिसते. शहरात दाखल होणारे पर्यटक हे नागाव, काशीदकडे जात असल्याने या मार्गावर सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या भेडसावते.

यावेळी यात भर पडली आहे ती अलिबाग, मुरूड आणि रोहाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतल्याने हा मार्ग सध्या वाहतुकीसाठी अडथळा बनला आहे.

रिणामी येत्या पाच सहा दिवसाच्या या पर्यटन हंगामात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या भेडसावणार आहे. त्यामुळे याचे पोलीस प्रशासनाकडून योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

यंदा २८ आणि २९ डिसेंबरपर्यंत बुकिंग जोरात असले तरी ३१ डिसेंबर रोजी सफला एकादशी असल्याने ३० आणि ३१ तारखेचे बुकिंग काहीसे मंदावले आहे. तसेच शहरात कोणत्याही मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन नसल्याने व्यावसायिक चिंतेत आहेत. मात्र, जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा गर्दी वाढण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

## मंजुश्री खाडिलकर यांचे निधन



**पुणे** : सुप्रसिध्द नारदीय कीर्तनकार मंजुश्री खाडिलकर यांचे अल्पशा आजाराने पुणे येथे निधन झाले. त्यांचे वय ८६ होते. करवीर पिठाचे शंकराचार्य आणि धुंडा महाराज देगलूरकर यांनी त्यांना कीर्तन मंदाकिनी या उपाधीने सन्मानित केले होते.

युरोप, अमेरिका, कॅनडा या देशात मराठी हरीकीर्तनाची संस्कृती पोचवणाऱ्या त्या महाराष्ट्रातील पहिल्या कीर्तनकार होत्या.

त्यांच्या मागे सुप्रसिध्द गायक पुत्र त्यागराज, नटराज, कन्या अमृता नातू, सुना, जावई आणि नातवंडे आहेत.

## आवक वाढल्याने भाज्यांचे भाव घसरले

। पनवेल । प्रतिनिधी ।

घाऊक भाजीपाला बाजारात मागील काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर भाजीपाल्याची आवक होत असल्याने त्याचा थेट परिणाम बाजारभावावर दिसून येत आहे. शेतकऱ्यांकडून सातत्याने होत असलेली आवक, हवामान अनुकूल राहिल्याने उत्पादनात वाढ आणि मागणीच्या तुलनेत पुरवठा जास्त आहे.

नोव्हेंबरच्या तुलनेत डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात अनेक भाज्यांचे दर लक्षणीयरीत्या कमी झाले आहेत. टोमॅटो, फ्लॉवर, वाटाणा, घेवडा, कोंबी, दुधी भोपळी यांसारख्या भाज्यांचे भाव मोठ्या प्रमाणावर घसरल्याने किरकोळ बाजारातही ग्राहकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. घाऊक बाजरात टोमॅटोचे भाव पूर्वी ४६ ते ५० रुपये प्रतिकिलो असताना आता ते ३० ते ३५ रुपयांपर्यंत खाली आले आहेत. फ्लॉवरचे भाव १८ ते २४ वरून थेट आठ ते १२ रुपयांपर्यंत घसरले आहेत. वाटाण्याच्या दरातही मोठी घट झाली असून पूर्वी ७० ते ८० रुपये असलेले भाव आता २६ ते ३६ रुपयांपर्यंत आले आहेत. घेवड्याचे भाव ६६ रुपयांवरून ४० रुपये, तर कोंबीचे भाव १६ रुपयांपर्यंत खाली आले आहेत.

## बाळसई येथे रंगला हरिनामाचा गजर

### अखंड हरिनाम सप्ताह पालखी सोहळा उत्साहात संपन्न



। सुकेळी । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील नागोठणे परिसरात नावलौकिक असणाऱ्या बाळसई येथिल अखंड हरिनाम सप्ताह सोहळा सोमवार २२ ते २५ डिसेंबर या चार दिवसांमध्ये उत्साह व आनंदमय वातावरणात पार पडला. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी सकाळी नानाजी शिरसे यांचे काल्याचे किर्तन झाल्यानंतर ११.३० वाजता फुलांनी सजवलेल्या पालखीतून संपूर्ण बाळसई गावातुन श्रींची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

टाळ –मृंदुगांच्या तसेच ज्ञानोबा माऊलींच्या गजरात गावातील सर्व महिला मंडळ, तरुण मंडळ, अबालवृध्द मोठ्या उत्साहाने पालखी मिरवणूक सोहळ्यात वाचण्यात दंग झाले होते. गावातील सर्व महिलांनी आप आपल्या घरासमोरील अंगणात काढलेल्या आकर्षक रांगोळ्या हे सर्वांचेच खास आकर्षण ठरत होते. यावेळी या पालखी सोहळ्यात सर्व भाविक हरिनामाच्या गजरात दंग होऊन गेले होते. त्यानंतर दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास पालखी सोहळा मंदिरात आल्यानंतर आरती घेण्यात आली.

# निवडक

## थंडीची चाहूल वाढताच गुळाला मागणी

**पनवेल** : हिवाळ्याची चाहूल लागताच गुळाच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली आहे. थंडीच्या दिवसांत शरीराला उष्णता देणारा व आरोग्यास फायदेशीर मानला जाणारा गूळ नागरिकांच्या पसंतीस उतरला असून, बाजारपेठांमध्ये गुळाची विक्री चांगलीच वाढली आहे. विशेषतः पातळ पोळी, भाजी, तीळगूळ, चहा व औषधी उपयोगासाठी गुळाचा वापर वाढल्याने किरकोळ व घाऊक बाजारात उलाढाल वाढली आहे. सध्या सेंद्रिय व देशी गुळाला अधिक मागणी असून, दर्जेदार गुळासाठी ग्राहक थोडी जास्त किंमत मोजण्यासही तयार आहेत..व्यापाऱ्यांच्या मते, मागणी वाढल्याने गुळाच्या भावात सौम्य वाढ झाली असली तरी पुढील काही आठवड्यांत भाव स्थिर राहण्याची शक्यता आहे. ऊस गाळप हंगाम सुरू झाल्याने बाजारात नव्या गुळाची आवक वाढत असून, त्यामुळे ग्राहकांना ताजा गूळ उपलब्ध होत आहे. एकूणच, आरोग्याबाबत वाढलेली जागरूकता आणि हिवाळी पदार्थांची मागणी यामुळे यंदा गुळाचा बाजार तेजीत असल्याचे चित्र दिसत आहे. पुढच्या महिन्यात मकर संक्रात असल्याने आणखीन गुळाच्या मागणीत वाढ होणार असल्याचे व्यापारीवर्गाकडून सांगण्यात आले. .एपीएमसी घाऊक बाजारात चांगल्या प्रतीचा गूळ ५० ते ५८ रुपये भावाने विकला जातो, तर कमी प्रतीचा गूळ ४३ ते ४४ रुपये प्रति किलो विकला जातो. सातारा, सांगली, तसेच कोल्हापूर या जिल्ह्यातून बाजारात येणारा गूळ येतो. गुळाचे भाव वाढले नसून मागणी अधिक वाढली असल्याचे घाऊक व्यापारी प्रशांत मेहता यांनी सांगितले.मधुमेह असणाऱ्यांना तर गुळाचे पदार्थ आरोग्यासाठी वरदान ठरले जातात. साखर शरीरासाठी घातक असल्याने बहुतांशी साखरेचे पदार्थ वर्ज्य केले जातात. त्यामुळे गुळाची मागणी आहे.

## उपाहारगृहांची होणार तपासणी

**रायगड** : नाताळ आणि नववर्षाचे आगमनाच्या पार्श्वभूमीवर हॉटेल्स, उपाहारगृहे व खाद्य आस्थापनांमध्ये तयार होणारे अन्न स्वच्छ, सुरक्षित व निर्भेळ असणे आवश्यक आहे. यासाठी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि खाद्य आस्थापनांची सखोल तपासणी करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन विभागाने दिले आहेत.

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हॉटेलमधील स्वच्छतेला विशेष महत्त्व असून, यासंदर्भात हॉटेल व्यावसायिकांमध्ये जनजागृती व प्रबोधन करावे. तपासणीदरम्यान मुदतबाह्य कच्च्या मालाचा वापर, अन्नपदार्थांमध्ये खाद्य व अखाद्य रंगांचा वापर, तसेच स्वच्छतेच्या निकषांचे पालन होत आहे की नाही, याची काटेकोर तपासणी करावी. यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर मोठी मोहीम हाती घेतली आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांच्या संकल्पनेतून स्वागत नववर्षाचं, संकल्प हॉटेल स्वच्छतेचा हा विशेष उपक्रम २६ डिसेंबर ते १५ जानेवारी या कालावधीत राज्यभर राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा सविस्तर अहवाल मंत्री कार्यालयात सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. उत्तम स्वच्छता व अन्न सुरक्षा मानकांचे पालन करणाऱ्या हॉटेल आस्थापनांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा व राज्य स्तरावर उत्कृष्ट हॉटेल्सना पुरस्कार देण्यात येणार आहेत. जिल्हा स्तरावरील पुरस्कार २६ जानेवारी २०२६ रोजी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील, तर राज्य स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या हॉटेल्सचा सन्मान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

## शहीद हिराजी पाटील स्मृतिदिनानिमित्त स्पर्धा



। कोर्लई । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील मानिवली या गावचे आगरी समाजातील ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीत लढणारे पहिले शहिद हिराजी पाटील यांचा शुक्रवार २ जानेवारी रोजी स्मृतिदिनानिमित्त त्याच्या कार्याची ओळख आगरी समाजातील तरुण, तरुणी, शालेय विद्यार्थी समाज बांधवांना व्हावी. यासाठी रायगडचा युवक फाऊंडेशनने निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. शुक्रवार २ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजता आदर्श पतसंस्थेच्या अलिबागेतील मुख्य कार्यालयाच्या सभागृहात मान्यवरांकडून स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिस वितरण व मार्गदर्शन होणार आहे.

यामधे अलिबाग तालुक्यातील इयत्ता ५वी ते ७वी, ८वी ते १०वी, ११वी ते १५ वी गट, व खुल्या गटात सर्वाना भाग घेण्यास आवाहन केले होते, यात शहिद हिराजी पाटील यांचे जीवन चरित्रावर २ पूर्ण ताव म राठीत पाठवावा.असे प्रसिद्ध केले होते. यामधे गटास प्रथम क्रमांक रु.५०१, द्वितीय क्रमांक रु.३००, तृतीय रु.२०० व प्रमाणपत्र असे बक्षीस आहे. या पहिल्याच स्पर्धेत आर.सी.एफ. माध्यमिक विद्यालय कुरुळ ,जनरल अरुण कुमार वैद्य माध्यमिक विद्यालय, जे.एस.एम.कॉलेज येथून ५० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. त्यांना मान्यवरांकडून बक्षिस वितरण व मार्गदर्शन होणार असून सहभागी विद्यार्थी-पालकांनी उपस्थित रहावे.सहभाग घेणाऱ्यांना समारंभात बक्षीस, प्रमाणपत्र, त्वरित देण्यात येणार असून नंतर मिळणार नाही, याची नोंद घ्यावी, असे प्रा.डॉ. जयपाल पाटील यांनी कळविले आहे.

## गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य तस्करीवर कारवाई

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभाग यांनी गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य तस्करीवर धडक कारवाई केली. यावेळी ६६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

२४ डिसेंबर रोजी निखिल अशोक तामघाडे हा इसम मडगाव छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल तेजस एक्सप्रेसने गोवा राज्य निर्मित आणि विक्रीसाठी असलेल्या दारुने भरलेली बॅग घेऊन विक्रीच्या उद्देशाने उतरणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क पनवेल यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी सापळा रचला. मात्र आरोपीला चाहूल लागल्याने त्याने ती बॅग प्लॅटफॉर्मवर टाकली आणि रेल्वेमध्ये पुन्हा चढून रेल्वे बरोबर पुढे निघून गेला. या कारवाईमध्ये ६६ हजार ३२५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## चौघांविरोधात गुन्हा दाखल

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

न रीस येथे हेरंब गुरुकृपा कॉम्प्लेक्स येथे बेकायदेशीर फ्लॅट बांधून त्या फ्लॅटची विक्री केली आणि ३३ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

संजय घाडी यांनी २०१८ मध्ये हेरंब सोसायटी, रीस या ठिकाणी फ्लॅट घेतला. २०२० मध्ये सोसायटी स्थापन झाली. जुलै २०२२ मध्ये डी विंगच्या कॉलम आणि पिल्लर याला क्रॅक गेल्याने इमारत कोसळण्याचा धोका निर्माण झाला. त्यानंतर बिल्डरने कॉलम आणि पिलर याला जॅकेटिंग करून चॅनलचा सपोर्ट दिला. पुन्हा २०२५ मध्ये कॉलमला तडा गेल्याचे दिसून आले. बिल्डिंगचे बांधकाम निकृष्ट असल्याने घाडी यांनी फ्लॅट विक्री करण्याचा निर्णय घेतला. फसवणूक झाल्यानंतर दीपक जोशी, अतुल दिघे, सत्विंदर पाबला, प्रशांत गायकवाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील एका आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

## आदर्श माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन



। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

तांबे एज्युकेशन सोसायटी मुंबई संचालित आदर्श माध्यमिक विद्यालय आंबिवली, सफळेवाडी, नारायणगाव, कुडलीचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि रौप्य महोत्सव सोहळा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पाडला.

तांबे एज्युकेशन सोसायटी मुंबईचे संस्थापक प्रिन्सिपॉल एल आर तांबे, मुख्य विश्वस्थ अभय तांबे त्याचप्रमाणे तांबे एज्युकेशन सोसायटी मुंबईचे सर्व विश्वस्त, आदर्श माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मुंडे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष प्रवीण पोळेकर, सचिव विजय कामतेकर, खजिनदार नामदेव शेपूंडे, रौप्य महोत्सवी कमिटीचे सर्व पदाधिकारी, माजी शिक्षक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांचे ढोल ताशांच्या गजरात, लेझीम पथकाने स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते द्रीप प्रज्वलन केल्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे माजी विद्यार्थ्यांकडून त्याचप्रमाणे शाळेच्या वतीने भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारचे करमणुकीचे आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करून पाहुण्यांचे व प्रेक्षकांचे मने जिंकली. सहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## महाडच्या राजकारणातील नवे वादळ 'विकासशेठ'

महाड नगरपालिकेवर २५ वर्षानंतर युवानेते विकास गोगावले यांच्या हस्ते शिवसेनेचा भगवा झेंडा अभिमानाने फडकविण्यात आला. महाडच्या राजकारणात भरतशेठ गोगावले यांच्या रूपाने सर्वसामान्य माणसाला आधार देणारे नेतृत्व लाभले. ग्रामीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून जनतेशी थेट संपर्क राखत, जमिनीवर पाय ठेवून राजकारण करणारे भरतशेठ आजही जनसामान्यांचे आधारवड म्हणून ओळखले जातात. ज्यांच्या विश्वासामुळे आपण आमदार झालो, त्या जनतेप्रती कृतज्ञता ठेवून काम करणाऱ्या भरतशेठ गोगावले यांचे पुत्र विकास शेठ गोगावले हे आज आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत महाडच्या राजकारणात नवे वादळ ठरत आहेत. राजकारणाच्या माध्यमातूनच माझा गोगावले कुटुंबाशी परिचय झाला.



मोठे शेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भरतशेठ यांच्या मायेच्या छायेखाली युवा कार्यकर्ता म्हणून काम करताना अनेक राजकीय धडे शिकता आले. याच काळात विकास शेठ गोगावले यांच्या कार्यशैलीचा जवळून अनुभव घेण्याची संधी मिळाली. युवा सेनेच्या माध्यमातून त्यांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला आणि अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण केली. शिवसेनेच्या युवा सेनेची जबाबदारी सांभाळताना विकास शेठ यांनी संपूर्ण रायगड जिल्ह्यात युवकांचा झंझावात उभा केला. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बाळासाहेबांच्या शिवसेनेत ते आज दक्षिण रायगडमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. शिवसेना आणि युवासेनेच्या माध्यमातून त्यांनी पक्षवाढीसाठी आणि संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आतापर्यंत झालेल्या अनेक निवडणुकांमध्ये वडिलांनी दिलेल्या जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर आणि संयमी नेतृत्वशैलीमुळे विकास शेठ यांनी युवकांचे मोठे पाठबळ मिळवले आहे. आज महाड, पोलादपूरसह माणगाव, गोरेगाव, म्हसळा, श्रीवर्धन या तालुक्यांमध्ये त्यांचा मोठा चाहता वर्ग तयार झाला आहे. सहकाऱ्यांशी प्रेमाने वागणे, कार्यकर्त्यांना आपलेसे करणे हे त्यांचे वैशिष्ट्य ठरत आहे. महाड तालुक्यावर कोणतेही संकट आले की, विकासशेठ युवा सेनेच्या माध्यमातून मदतीला धावून जातात. कोविड काळात त्यांनी गावोगावी जाऊन कष्टकरी, मजूर आणि गरजू नागरिकांना शिधा वाटप केले. रुग्णांना आधार देण्यासाठी त्यांनी भरतशेठ गोगावले यांच्या माध्यमातून सातत्याने मदतकार्य केले. महाड शहर व तालुक्यात आलेल्या महापुराच्या काळातही मदतकार्याचे योग्य नियोजन, आलेली मदत गरजूंपर्यंत पोहोचवणे आणि प्रशासनाला सतर्क करणे, हे काम त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. औद्योगिक क्षेत्रातही विकास शेठ गोगावले यांचे योगदान महत्त्वाचे आहे. कारखानदार चुकत असतील तर त्यांना चूक दाखवून देणे, मात्र जाणीवपूर्वक उद्योगांना त्रास देण्याचा प्रयत्न झाला तर कारखानदारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका त्यांनी अनेकदा घेतली आहे. त्यामुळे औद्योगिक वर्तुळातही त्यांची विश्वासार्हता वाढत आहे. दरम्यान, तब्बल २५ वर्षांनंतर महाड नगरपालिकेत शिवसेनेची सत्ता स्थापन होणे हा ऐतिहासिक क्षण ठरला. या विजयाचे साक्षीदार ठरत विकास शेठ गोगावले यांच्या हस्ते महाड नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा झेंडा फडकवण्यात आला. आज विकास शेठ गोगावले यांचा वाढदिवस हा आमच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांसाठी आनंदाचा दिवस आहे. वडिलांप्रमाणेच तेही सर्वसामान्यांचे आधारवड ठरत असून, राजकीय वाटचाल अशीच यशस्वी होवो आणि सर्वसामान्य माणसाची सेवा त्यांच्या हातून घडत राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

**शब्दांकन : इम्रान पठाण**

### नववर्षानिमित्त रेल्वे प्रशासनाची प्रवाशांना भेट | कोकणवासियांचा प्रवास होणार सुखकर

# दादर-तिरुनेलवेली एक्स्प्रेसच्या डब्यात वाढ



। पनवेल । प्रतिनिधी ।

कोकण रेल्वेवर धावणाऱ्या दादर तिरुनेलवेली एक्स्प्रेसला एक अतिरिक्त डबा कायमस्वरुपी जोडण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी विभाजित होण्यास मदत होईल. नववर्षानिमित्त रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना ही भेट दिली आहे.

दक्षिण रेल्वेतर्फे चालविण्यात येणाऱ्या गाडी क्रमांक २२६२९ /२२६३० तिरुनेलवेली दादर तिरुनेलवेली एक्स्प्रेसला (साप्ताहिक) एक तृतीय वातानुकूलित डबा जोडण्याचा निर्णय घेण्यात आला. पूर्वी ही द्वितीय आणि तृतीय वातानुकूलित प्रत्येकी एक-एक डबा, तृतीय इकॉनॉमी एक डबा, शयनयान ६ डबे, सामान्य ४ डबे, जनरेटर कार एक डबा, एसएलआर एक डबा अशी १५ एलएचबी डब्यांची रेल्वेगाडी होती. यात आता एक तृतीय वातानुकूलित डबा जोडण्यात आला आहे. उर्वरित सर्व डब्याची संख्या सारखी असेल. त्यामुळे ही रेल्वेगाडी १६ एलएचबी डब्यांची झाली आहे, अशी माहिती कोकण रेल्वेने दिली.

दादर तिरुनेलवेली अतिजलद एक्स्प्रेस ही आठवड्यातून एकदाच धावते. या रेल्वेगाडीची पहिली फेरी मे २०१३ रोजी धावली. ही रेल्वेगाडी देखभालीसाठी कधीकधी रद्द किंवा अंशतः रद्द केली जाते. महाराष्ट्रात या रेल्वेगाडीला दादर, ठाणे, पनवेल, रोहा, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली येथे थांबे आहेत.

नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची अतिरिक्त गर्दी विभाजित करण्यासाठी रेल्वेने यशवंतपूर कारवार विशेष एक्स्प्रेसला तात्पुरत्या स्वरूपात जादा डबे जोडण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक ०६२६७ यशवंतपूर कारवार आणि गाडी क्रमांक ०६२६८ कारवार यशवंतपूर रेल्वेगाडीला द्वितीय वातानुकूलित एक डबा, तृतीय वातानुकूलित ३ डबे, शयनयान १२ डबे, सामान्य ३ डबे, एसएलआर २ डबे असे एकूण २१ डबे असतात.

नववर्षानिमित्त गाडी क्रमांक ०६२६७ यशवंतपूर कारवार विशेष एक्स्प्रेसला २७ डिसेंबर रोजी आणि गाडी क्रमांक ०६२६८ कारवार यशवंतपूर विशेष एक्स्प्रेसला २८ डिसेंबर रोजी द्वितीय वातानुकूलित आणि सामान्य असा प्रत्येकी एक जादा डबा जोडला जाईल. त्यामुळे द्वितीय वातानुकूलित दोन डबे आणि सामान्य चार डबे असतील. तर, इतर रेल्वे डब्यांची संख्या तशीच असेल. एकूण २३ डबे या रेल्वेगाडीला असतील, अशी माहिती कोकण रेल्वेने दिली.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक रूस्तम कावसजी तारापूरवाला यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

| गाव | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे कशेळे तालुका कर्जत जि रायगड | ५/३ | ०-०८-९० | ०-०३ |
| मौजे कवठेवाडी तालुका कर्जत जि रायगड | १४/५ | ०-३४-०० | ०-०९ |
| मौजे कवठेवाडी तालुका कर्जत जि रायगड | १५/७/अ | ०-१५-०० | ०-०८ |
| मौजे कवठेवाडी तालुका कर्जत जि रायगड | १५/७/ब | ०-१४-०० | ०-०८ |
| मौजे कवठेवाडी तालुका कर्जत जि रायगड | १५/८ | ०-२७-०० | ०-०९ |
| मौजे कवठेवाडी तालुका कर्जत जि रायगड | १५/९ | ०-२९-०० | ०-१६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २७/१२/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता शॉप नं. २९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

ने.ता. १५/०१/२०२६ ॲड. रचना भोईर

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील दिवाणी न्यायाधीश(व.स्तर) पनवेल यांचे न्यायालयात (कोर्ट क्र. ०६)**

नियमीत दिवाणी दावा क्र.१३१/२०२०
नि. क्र. २२९/ड

गजानन भबला माळी व इतर — वादी
विरुद्ध
किसन सिताराम माळी व इतर — प्रतिवादी

गजानन माळी व इतर रा.मु.खैरणे, पो. देवीचा पाडा, ता.पनवेल, जि. रायगड वादी यांनी सदरील दावा किसन सिताराम माळी व इतर/प्रतिवादी क्र.७ नवाजुद्दीन अमीरुद्दीन शेख रा. शॉप नं.२०, अमन सोसायटी, सेक्टर ५ ई कळंबोली, ता.पनवेल, जि. रायगड तुमचे विरुद्ध पनवेल दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे न्यायालयात जाहीर उद्‌घोषणेकरीता, वाटपाकरीता निरंतरचे मनाई हुकूमाकरीता दावा दाखल केला आहे. वादीस ज्ञात असलेल्या पत्यावर तुम्हास कायदेशीर नोटीस काढण्यात आलेली होती. परंतु त्या पत्यावर तुम्ही मिळून येत नाही व वादी यांचे जवळ तुमच्या वरील पत्याव्यतिरिक्त दुसरा पत्ता नाही व सदरचा पत्ता नोंदणीकृत खरेदीखतात नमूद आहे. सबब तुमच्या विरुद्धची नोटीस ही दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करुन तुमचेवर नोटीस बजावणी करण्याचा मा.न्यायालयाने आदेश पारीत केलेला आहे. व त्याप्रमाणे तुमचेविरुद्धची नोटीस ही प्रकरणाच्या तारखेस म्हणजेच दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात येते की, सदर दि. १५/०१/२०२६ रोजी या न्यायालयात समक्ष स्वत: किंवा योग्य सुचना दिलेल्या वकीलामार्फत हजर होऊन तुमचे म्हणणे लेखी स्वरुपात मांडावे. दिनांक १५/०१/२०२६ रोजी तुमचे गैरहजर राहिल्यास तुम्हास या प्रकरणी काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरुन दाव्याची सुनावणी घेण्यास येऊन अंतिम निर्णय देण्यात येईल याची तुम्ही नोंद घ्यावी

सही/
लिपीक

कोर्टाचा शिक्का

हुकूमावरुन
सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमीन मालक १) श्री. आप्पा बाळाराम म्हात्रे, २) श्री दत्तगुरु अप्पा म्हात्रे यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे - सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १५ | ८ | ०-१२-९० पो.ख.<br>०-०६-६० एकुण<br>०-१९-५० क्षेत्र मिळकतीचे खरेदीखत | १-४५ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : २७/१२/२०२५

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम.एल.एल.बी.
पत्ता: दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी, ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## ॲडिशनल क्वालिफिकेशन प्रमाणपत्रक (PB.BSC Nursing) हरवला आहे

तमाम लोकांस कळविण्यात येते की, सौ. मृणाली अभिजीत केणी (पूर्वा.श्र. कु. मृणाली दिनेश पाटील) राहणार मु. ताड गल्ली, मारूती मंदिरासमोर आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड हिचे ॲडिशन क्वालिफिकेशन प्रमाणपत्र हे चोंढी ते नांदाईपाडा प्रवासदरम्यान कोठेतरी पडून गहाळ झाले असून याची तक्रार मांडवा पोलिस स्टेशनमध्ये कागदपत्र गहाळ मिसींग र.जि.नं. ०२५२/२०२५ दि. १९/१२/२०२५ कडे दाखल केली आहे.

सदर प्रमाणपत्राचा तपशील खालीलप्रमाणे ॲडिशनल क्वालिफिकेशन प्रमाणपत्र नं. १८२९८ व रजिस्टर नं. XXVIII-53186, कोणालाही सदर प्रमाणपत्र सापडल्यास कृपया खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क : ९६०४६३६१२१
दिनांक : २६/१२/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे पाझर ता.अलिबाग, जि.रायगड येथिल खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | ग.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| **मौजे पाझर** ता.अलिबाग | ४९ | ००.५५.६०<br>पो.ख.००.०९.४०<br>एकुण ००.६५.०० | १३.०९ |

(वर उल्लेखीत मिळकतीमधील सौ. धरती निलेश राउत व इतर सहमालक यांच्या ००.१९.०० हे. आर. इतक्या सामाईक क्षेत्रापैकी ताबा व मालकीहक्क असणार ००.०२.२५ हे. आर. इतका अविभक्त हिस्सा)

सदर वर उल्लेखीत ००.०२.२५ हे.आर. मिळकतीचे विद्यमान मालक सौ. धरती निलेश राउत यांनी वरील मिळकत निर्वेध असल्याबाबत हवाला दिला आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, दान गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहीवाट इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र व पुराव्यासहीत सादर कराव्यात.

मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तकार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक : २६/१२/२०२५

सही /-
**ॲड.अभिषेक महेश पिसाट**
१७. अलिबाग कमर्शिअल कॉम्प्लेक्स, बिग स्प्लॅश हॉटेल शेजारी, अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड
मो.९५९५०३२३२०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील वर्णन केलेली मिळकत खालील नमूद मिळकतीचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन :** जिल्हा-रायगड, तालुका-पेण, मौजे-महलमिऱ्या डोंगर येथील बिनशेती जमिन मिळकत.

| गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पद्धती | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार |
|---|---|---|---|
| ३६८ | भोगवटादार वर्ग-१ | ६०९.००.०० | ३०४.५० |

वर नमुद मिळकत ही मालक श्री.अनुज अजय देसाई रा. ७०२, जामनगर को.ऑ.हौ.सोसायटी, गुलमोहर रोड ११, जुहु विलेपार्ले, मुंबई यांच्या मालकीची व वहिवाटीची, निर्वेध प्रत्यक्ष ताबेकब्जातील अशी मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये प्लॉट पाडलेले असून पाडलेल्या प्लॉटमधील प्लॉट नं. १० ज्याचे एकुण क्षेत्र ०-४०-०० हे.आर.आणि प्लॉट नं. ११ ज्याचे एकूण क्षेत्र ०-४०-०० हे.आर. असे एकुण क्षेत्र ०-८०-०० हे.आर. एवढ्या क्षेत्राच्या मिळकतीचे विक्री करण्याबाबत आमच्या पक्षकाराबरोबर बोलणी झालेली आहे.

तरी या मिळकतीबाबत इतर कोणाचाही साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, ताबाकब्जा, हक्क, दान, गहाण, फरोक्त, बक्षिसपत्र, चार्ज, लिज, इतर कोणतेही करार अथवा हक्क हितसबंध असल्यास खालील ॲडव्होकेट यांचेकडे १५ दिवसांत लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील. मागावून येणारी हरकत आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २७/१२/२०२५

**ॲड. जितेंद्र द म्हात्रे**
बी.ए.एल्.एल्.एम्.
नोटरी (भारत सरकार)
कार्या-शॉप नं.४, डी विंग, समर्थ प्रसाद नगर, राजू पोटे मार्ग, ता.-पेण, जि.-रायगड.
फोन नं. ९४२२०९४७७४

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे बार्डी ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमुद विद्यमान मालक यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| प्रफुल्ल मनजीभाई कपपुरा | ५/१ | ३२-९०-०<br>पैकी स्वत:चे मालकीचे असलेले क्षेत्र<br>१०-९०-० चौ.मी. | ३९०.०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचीही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस, हक्क पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट, अथवा कोणत्याही स्वरुपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास त्यांनी तो हक्क सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन ब्लॉक नंबर १०१
ममदापूर रोड नेरळ ता. कर्जत जि.रायगड
मो.नं. ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे-पेण (देवआळी), ता. पेण, जि. रायगड येथील बिनशेती मिळकतीवर उभ्या असलेल्या इमारतीमधील निवासी सदनिकेचे मालक सौ.कांता शिवलाल शहा व श्री. शिवलाल हिराचंद शहा यांच्यासोबत आमचे अशिल श्री. फजल सिराज खान यांनी सदरची निवासी सदनिका खरेदी करण्याबाबत खरेदी व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास निवासी सदनिकेचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरहू निवासी सदनिकेच्या इमारतीखालील बिनशेती मिळकतीचे वर्णन-

| मौजे | सिटी सर्व्हे क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| पेण (देवआळी) | १०३ | १४७.२ |

**वरील मिळकतीवर उभ्या असलेल्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिकेचे क्षेत्र ५५०.०० चौ. फुट या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनाची निवासी सदनिका ही पूर्णत: हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू निवासी सदनिकेचाबाबत अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताजा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू निवासी सदनिका ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरील निवासी सदनिकेचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण-रायगड
दिनांक : २७/१२/२०२५

अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ.वैरागी**
ऑफिस ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. विजया विनोद बडेकर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

मौजे पोसरी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १६/२ ज्याचे क्षेत्रफळ ०.०३.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २७/१२/२०२५

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे तुडाळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रविंद्र मधुकर ठाकूर, रा. शितोळे आळी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेल्या भातशेती मिळकतीपैकी ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकी हक्कातील मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| तुडाळ ता.अलिबाग | २९/१/अ/१ | ०-३२-१०<br>पो.ख.०-०२-००<br>एकूण ०-३४-१० | ९.२५ |

या भातशेती मिळकतीपैकी श्री. रविंद्र मधुकर ठाकूर यांचे हिश्श्याचे व ताबेकब्जा वहिवाटीतील क्षेत्र ०-२७-०७ हे. आर. मिळकतीबाबत.

सबब सदरहू भातशेती मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू भातशेती मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१२/२०२५

सही / -
**ॲड.मच्छिंद्र एस.म्हात्रे**
गाळा नं.२, दुय्यम निबंधक कार्यालय अलिबाग समोर, अलिबाग-रायगड

सही/-
श्री. रविंद्र मधुकर ठाकूर

## अलिबाग नगरपरिषद
## ई-निविदा सूचना सन २०२५-२६

अलिबाग नगरपरिषद क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे व रेबीज लस टोचणे कामाबाबतची ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई-निविदा सूचना शासनाच्या https://www.maha-tenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २६/१२/२०२५ पासून उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

| गाव व मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे कशेळे तालुका कर्जत जि रायगड<br>लिलाधर गणपत नाईक व कितीकुमार चंद्रकांत नाईक | ३/१ | १-४०-०० | १-०७ |
| मौजे कवठेवाडी तालुका कर्जत जि रायगड<br>लिलाधर गणपत नाईक | १९/२ | ०-११-९० | ०-५९ |
| मौजे कवठेवाडी तालुका कर्जत जि रायगड<br>लिलाधर गणपत नाईक | १९/३ | ०-१९-०० | ०-८७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २७/१२/२०२५

खरेदीदारातर्फे वकील **ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील **ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता शॉप नं.२९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-
मौजे-नागांव, ता.अलिबाग, जि. रायगड हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.

| मौजे | गट नं. | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| नागांव | १५८७ | ०.४६.०० | ७.२५ |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत व त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशी मिळकत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती वंदना चंद्रकांत भोईर, मु.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून निर्वेध असल्याचा भरवसा दिला आहे. माझे आशिल यांनी श्रीमती वंदना चंद्रकांत भोईर यांचे सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, वहीवाटीचे हक्क, कब्जा, लिन, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : २६.१२.२०२५

**(ॲड.एस.वाय.बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलानी मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील, भूमापन क्रमांक व उपविभाग ९४/१/३, खराब्यासह एकुण क्षेत्र ०-९३-४२ (हे.आर.पॉ.) आकार १८.६२ (रू.पै.) या मिळकतीपैकी काशिनाथ सदू पाटील व इतर ८ यांचे सातबारा सदरी दाखल असलेल्या खराब्यासह एकुण क्षेत्र ०-४१-४२ (हे.आर.पॉ.) आकार ८.२६ (रू.पै.) या मिळकतीपैकी काशिनाथ सदू पाटील, मंदाकिनी मधुकर पाटील, महेश मधुकर पाटील, प्रेमनाथ मधुकर पाटील, संजय मधुकर पाटील व मोहिनी मोहन भगत यांच्या संपूर्ण अविभक्त हिश्श्याची मिळकत, काशिनाथ सदू पाटील, मंदाकिनी मधुकर पाटील, महेश मधुकर पाटील, प्रेमनाथ मधुकर पाटील, संजय मधुकर पाटील व मोहिनी मोहन भगत यांचेकडून कायम विकत घेण्याविषयी ठरविले आहे व त्या अनुषंगाने त्यांचेबरोबर व्यवहाराची बोलणी सुरू आहेत.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबत तसेच प्रत्यक्ष ताबे कब्जात असलेबाबत वर नमुद विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, जाण्यायेण्याचा हक्क, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही, अथवा असल्यास त्यांनी तो आमचे लाभात सोडून दिलेला आहे व मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून, आमचे अशिल, काशिनाथ सदू पाटील, मंदाकिनी मधुकर पाटील, महेश मधुकर पाटील, प्रेमनाथ मधुकर पाटील, संजय मधुकर पाटील व मोहिनी मोहन भगत यांच्या वर नमुद मिळकतीतील संपूर्ण अविभक्त हिश्श्याची मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २७/१२/२०२५

**(ॲड.महेश एकनाथ घरत)**
'गुरूकृपा' मु.पो. खंडाळे,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९८२२६३५५१२

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, मौजे कोंठीबे, ता- कर्जत, जि-रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक गुलाम हुसेन अब्दुल मुतलीब मुल्ला रा-पनवेल ता-पनवेल, जि-रायगड यांची खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ९३ | २ | एकुण क्षेत्र ०.४२.५० आर.चौ.मी | ४२५.०० |
| ९३ | ५/अ | एकुण क्षेत्रफळ-०.०९.०० आर.चौ.मी | ९९.०० |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक गुलाम हुसेन अब्दुल मुतलीब मुल्ला यांनी सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने आमचे आशिलास विकत देण्याचे ठरवलेले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक २७/१२/२०२५

**ॲड. भारत अंकुश सावंत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता-मु.पो. मोठे वेणगाव
ता-कर्जत जि-रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे-शेणे, ता.पेण, जि.रायगड येथील शेत जमिन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत सदरहू शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालकांसोबत आमचे अशिल यांची बोलणी सुरू आहेत.

सदरहू शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शेणे | ४८/१/अ | ०.६६.४०<br>पो.ख.०.००.००<br>एकूण ०.६६.४० | १.७५ |

**वरील शेत जमिन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ०.६६.४० हे.आर.चौ.मी. यापैकी ०.१६.०० हे.आर.चौ.मी. (१६ गुंठे) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनाची शेत जमीन मिळकत पूर्णत: हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू शेतजमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरील शेत मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमिन मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड
दिनांक २७/१२/२०२५

अशिलांचे वकील
**ॲड.श्री.जयंत घ.वैरागी**
ऑफिस : ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे तळाशेत ता. अलिबाग, जि. रायगड यांनी येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक विनया रविंद्र धोंडकर, रा. स्वास्तिक अपार्टमेंट, प्लॉट नं. ७६, रूम नं. १, सेक्टर ५, सानपाडा गाव, नवी मुंबई, तुर्भे, ठाणे ४०० ७०५ यांच्या नांवे असलेल्या मालकी हक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बयाणा पावती विद्यमान मालकांबरोबर केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| तळाशेत ता.अलिबाग | १००/१/ब | ०-६०-०० | ६.०१ |

या मिळकतीपैकी रजनी लक्ष्मण पाटील व विनया रविंद्र धोंडकर यांच्या मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-२०-०० हे.आर., आकार रु. २.०० पैसे या मिळकतीमध्ये विनया रविंद्र धोंडकर यांचा असलेला अविभक्त हिस्सा:

सबब सदरहू जागा, जमिन व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहीत धरून आमचे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत.

दिनांक : २६/१२/२०२५

सही/-
**शेखर विष्णू मगर**
पत्ता :- दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड.

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
## जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक हक्कनोंद अपील क्र. ३३६/२०२५

१ श्रीम. मंदा बारक्या पाटील
२ राधाबाई बारक्या पाटील मयत
३ श्री.गडल्या बारक्या पाटील — अपिलार्थी
४ श्रीम. नागूबाई बारक्या पाटील
सर्व रा.पेठली, ता.सुधागड, जि.रायगड

विरुद्ध

१ श्री.सुनिल लडकू पाटील
२ श्री.अरुण अर्जुन पाटील
३ श्री.महादेव कचरू पाटील
४ श्री.चाहू कचरू पाटील
५ श्री.यशवंत कचरू पाटील
६ श्री.मोहनदास कचरू पाटील
७ श्री.राम नारायण पाटील
८ श्री.शिवाजी अप्पासाहेब बानकर
९ श्री.सुरेश राम पाटील
१० श्री.दत्तात्रेय किसन गावडे
११ श्री.एकनाथ दत्तू म्हात्रे
१२ श्री.सुभाष दगडू डिडवळ
१३ श्री.नाथू गोसावी पाटील
१४ श्री.सचिन चाहू पाटील
१५ श्री.किरण यशवंत पाटील
१६ श्री.मनिष महादेव पाटील — उत्तरार्थी
१७ श्री.लडकू नारायण पाटील
१८ श्री.हरी नारायण पाटील
१९ श्री.कठोर नारायण पाटील
२० श्री.शंकर नारायण पाटील
२१ श्रीम.शेवंताबाई धोंडू पाटील
२२ श्रीम.मंदाबाई एकनाथ पाटील
२३ श्रीम.विमल दिलीप पाटील
२४ श्री.अभिमन्यू अर्जुन पाटील
२५ श्री.सुभाष अर्जुन पाटील
२६ श्रीम रेवती विष्णू भगत
२७ श्रीम.कुंदा वसंत मुकादम
२८ आर पी एम फॅमेली ट्रस्ट तर्फे श्री. हरी प्रकाश मालपानी
२९ आर पी एम फॅमेली ट्रस्ट तर्फे श्री. राम प्रकाश मालपानी
३० श्री.आत्माराम नाथू पाटील
सर्व रा.आडीवली ता.पनवेल, जि.रायगड

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे आडीवली ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. ११/१/१ क्षेत्र ०-७६-५० हे. आर. आकार १३.८३, ११/१/३ क्षेत्र ०-३४-०० हे. आर. आकार ६.६८, ११/१/६ क्षेत्र ०-८९-४० हे. आर आकार १७.५४ ११/१/७ क्षेत्र ०-१८-७० हे.आर. आकार ३.६६ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील आरटीएस अपिल क्र. २१०/२०२४, दि. १७/०६/२०२५ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. ०२/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २६/१२/२०२५

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग करीता**




## राशीभविष्य

- **मेष** : शुभग्रहांचं उत्तम पाठबळ राहील. खेळाडू, कलाकारांना उत्तम संधी लाभतील. प्रवासात काळजी घ्या.
- **वृषभ** : प्रकृतीविषयक तक्रारी राहतील. नोकरी-व्यवसायात मनाजोग्या घटना घडतील. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन** : नोकरीत बढती वा वेतनवाढीचा विचार होईल. उच्च शिक्षणाच्या संधी लाभतील. दुखापत संभवते.
- **कर्क** : धनचिंता दूर करता येईल. ओळखी-मध्यस्थीतून प्रश्न सुटतील. ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल.
- **सिंह** : नैराश्यावर मात करू शकाल. शिक्षण क्षेत्रात उत्तम संधी लाभतील. सरकारी कामं विलंबानं होतील.
- **कन्या** : नोकरीच्या प्रयत्नात समाधान मिळेल. माता-पित्याची चिंता राहील. आर्थिक फसवणूक संभवते.
- **तूळ** : व्यवसायातील येणी वसूल होतील. कोर्ट प्रकरणात समाधान लाभेल. मित्रांशी विसंवाद टाळायला हवा.
- **वृश्चिक** : फसवणुकीबाबत सावध रहावं. प्रेम प्रकरणात अनुकुलता राहील. विवाहाचे प्रश्न मार्गी लागतील.
- **धनु** : स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. व्यवसायात उत्तम लाभ होईल. सामाजिक क्षेत्रात विचारानं रहावं.
- **मकर** : साडेसातीचा त्रास वाढू लागेल. होणारी कामं अचानक रखडतील. जुने विकार पुन्हा बळावू शकतात.
- **कुंभ** : थोरामोठ्यांच्या गाठीभेटी होतील. कायदेशीर बाबतीत सावध रहावं. मुलांच्या उत्कर्षाला वाव मिळेल.
- **मीन** : मनासारख्या घटना घडतील. व्यवसायात कर्जफेडीला चालना मिळेल. कुसंगती त्रासाची ठरेल.

## २७ डिसेंबर
**दिनविशेष**

**१९३६** : फैजपूर येथे भारतीय काँग्रेस पक्षाचे पहिलं अधिवेशन भरलं. काँग्रेस पक्षाची सुरूवात झाली.
**१९४८** : 'भाला'कार भोपटकर यांचं निधन.
**१९६५** : हिंदी चित्रपट अभिनेता सलमान खान याचा जन्म.
**२००७** : पाकिस्तानच्या माजी पंतप्रधान बेनझीर भूट्टो यांची हत्या.
**२०१२** : आशियाई चँपियन्स करंडक हॉकी स्पर्धेत भारत पाककडून पराभूत.
**२०१५** : एअर इंडियाच्या विमानांमध्ये मांसाहार बंद.

## आरोग्यरक्षणासाठी...
**आरोग्यमंत्र**

आहारात विविध भाज्या आणि फळांचा समावेश आरोग्यवर्धक सिद्ध होतो. याविषयी सविस्तर माहिती घेऊ या.

✲ मध्य प्रदेशमधील पाताळकोट येथील आदिवासी शेवग्याच्या झाडाच्या पानांची चटणी करून खातात. शेवग्याच्या शेंगा आणि पानांमध्ये व्हिटॅमिन 'ए' भरपूर प्रमाणात असते. शेवग्यामध्ये दुधापेक्षा चार पट अधिक कॅल्शिअम आणि दोन पट अधिक प्रथिनं ही पोषकद्रव्य असतात. त्यामुळे शेवग्याच्या सेवनाने पचनक्रियेशी संबंधित आजार नष्ट होतात. दस्त, कावीळ या आजारांमध्ये शेवग्याच्या पानांचा ताज रस, एक चमचा मध आणि नारळ पाणी एकत्र करून प्यायल्यास आराम मिळतो. शेवग्याच्या पानांचे चूर्ण कॅन्सर आणि हृदय रुग्णांसाठी उपयुक्त औषध आहे. शेवग्याच्या सेवनाने ब्लडप्रेशर नियंत्रणात राहते. शेवग्याचा उपयोग पोटातील अल्सरवरील उपचारामध्ये योग्य ठरतो. शेवग्याच्या सेवनाने शरीरातील उर्जेचा स्तर वाढतो.



✲ बीटमधील अँटीऑक्सिडेंट तत्त्व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. नैसर्गिक शर्करा मिळण्याचा हा एक उत्तम स्रोत आहे. यात सोडियम, पोटॅशियम, फॉस्फोरस, क्लोरिन, आयोडीन आणि अन्य महत्त्वाची जीवनसत्वे असतात. बीटमध्ये किडनी आणि पित्ताशय स्वच्छ ठेवण्याची शक्ती आहे. म्हणूनच रात्री झोपण्यापूर्वी बीट ज्युस अवश्य घ्या. किडनी आणि पित्ताशय विकारांमध्ये बीट ज्युस आणि गाजर ज्युस एकत्रित करून पिणे आरोग्यदायी ठरते. ताप आणि थंडीतही हा रस उपयुक्त आहे.

## ट्रेंडी लिनन साडी
**फॅशन पॅशन**

* त्या कोणत्याही ऋतूत चालून जातात. उन्हाळ्यात तर लिनन साड्या मस्ट हॅव आहेत. तर थंडीत ब्लॅक, ब्राउन, नेव्ही ब्लू अशा गडद रंगाच्या साड्या नेसता येतील.

* या साड्यांवर फार नक्षीकाम नसल्याने ब्लाउजच्या फॅशनला भरपूर वाव मिळतो. ट्रेंडी ब्लाउजने लिनन साडीचा लूक खुलवता येतो. ऑफ शोल्डर, बोट नेक क्रॉप टॉप यावर शोभून दिसेल. कलमकारी, ब्लॉक प्रिंटेड, हाल नेक, कॉलर, बेल स्लीव्हज, लाँग स्लीव्हज, स्लीव्हलेस यापैकी कोणतंही ब्लाउज आणि प्रिंट चालून जाईल. कॉन्स्ट्रास्ट रंगाचे ब्लाउज उठून दिसतील.

* लिनन साड्यांसोबत बोहेमियन किंवा अँटिक सिल्व्हर ज्वेलरी कॅरी करा. जर्मन सिल्व्हर झुमका, अफगाणी स्टाईल, मिरर वर्कवाली कानातली, सिल्व्हरचा लाँग नेकलेस कॅरी करण्यासाठी लिनन साडी बेस्ट ऑप्शन आहे. या साडीवर चोकरही छान दिसेल. पण अती करू नका. स्टेटमेंट नेकपीस असेल तर कानातली घालू नका. तर मोठी कानातली घातली तर गळ्यात छोटी चेन घाला किंवा गळा चक्क मोकळा ठेवा.

## कंबाला आणि थोडा
**गेम टाईम**

र्नाटकमधल्या गावांमध्ये बफेलो रेसचं आयोजन केलं जातं. या शर्यतीला 'कंबाला' म्हणतात. हिरवीगार शेतं आणि चिखलाने माखलेल्या रस्त्यांवरून म्हशी आणि रेडे धावतात. नोव्हेंबर ते मार्च या काळात कर्नाटकच्या किनापट्टीजवळच्या गावांमध्ये कंबालाचं आयोजन होतं. इथे जवळपास ४५ पेक्षा जास्त शर्यती होतात. शेतकरी आपल्या सर्वात वेगवान म्हशी किंवा रेड्यांच्या जोडीसह शर्यतीत उतरतात. पूर्वीच्या काळात म्हशी सुरक्षित ठेवल्याबद्दल देवाचे आभार मानण्यासाठी एक विधी होत असे. आता त्याची जागा स्पर्धेने घेतली आहे.

'थोडा' हे हिमाचल प्रदेशातलं मार्शल आर्ट. यात स्पर्धकांची दोन गटांमध्ये विभागणी केली जाते. हे दोन गट कौरव आणि पांडवांचं प्रतिनिधित्त्व करतात. त्यांना साथी आणि पाशी असं म्हटलं जातं. या खेळात स्पर्धक दुसऱ्या संघातल्या खेळाडूंच्या पायांवर बाण मारतात. बाणाच्या पुढच्या बाजूला लाकडी तुकडा बसवण्यात आल्याने इजा होत नाही. या तुकड्याला थोडा म्हटलं जातं. बाण गुडघ्यांखाली मारला जातो. स्पर्धा सुरू असताना संगीतही वाजवलं जातं. त्यामुळे या तालावर लोक नृत्यही करतात.

## पंचांग

**शनिवार, २७ डिसेंबर २०२२**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष शु. ७, चंद्रराशी : मीन,
नक्षत्र : पू. भाद्रपदा, योग : व्यतिपात,
सूर्योदय ७.१२, सूर्यास्त १८.०८

## फॉरवर्डस

**आग़ लगानें के बाद धुँए की शिक़ायत...**

**शायद इसी क़ो दुनियादारी कहतें हैं...!**

## वेगळ्या वाटा

* लिखाणाचा सराव करत रहा. सरावामुळे तुमची कौशल्यं विकसित होतात. या छंदाचं व्यवसायात रूपांतर करायचं असेल तर सतत लिहायला हवं. या क्षेत्रात बरीच स्पर्धा आहे. बराच संघर्षही करावा लागतो. त्याची तयारी हवी.

* ऑनलाईन अस्तित्व दाखवायला सुरूवात करा. वेबसाईटच्या माध्यमातून लेखन लोकांपर्यंत पोहोचवता येईल. विक्ससारखी अनेक माध्यमं स्वत:ची वेबसाईट तयार करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतात. त्यांचा वापर करा. **(क्रमश:)**

## उद्योगविश्वातील भरारीसाठी...
**करिअरवाटा**

सद्यस्थितीत नोकरीपेक्षा स्वतंत्र व्यवसायाकडे तरूणाईचा कल वाढताना दिसत आहे. स्टार्ट अप्सना मिळणारं यश तरुणांना उद्योजक बनण्यासाठी प्रोत्साहित करतं. मात्र उद्योजक व्हायचं तर स्वत:वर विश्वास हवा. आत्मविश्वासाचा अभाव पुढे घेऊन जाऊ शकत नाही. त्यादृष्टीने यशस्वी उद्योजकासाठी नेमकं काय करता येईल, याची माहिती असायलाच हवी.




✲ स्वत:वरचा अविश्वास एका टप्प्यानंतर दूर होईल, हा समज चुकीचा आहे. हा अविश्वास दूर करण्यासाठी तुम्हालाच प्रयत्न करायला हवेत. अविश्वास दाखवण्याची सवय नेहमीच टिकून रहाणार आहे. मात्र या सवयीकडे नकारात्मक दृष्टीने बघू नका. स्वत:वर अविश्वास दाखवण्याला सर्वसाधारण बाब समजा. ✲ मनात स्वत:विषयी संशय उत्पन्न झाला की आधी केलेली चांगली कामं, मिळवलेलं यश यांचा विचार करा. आजवर मिळालेल्या यशाची स्वत:ला आठवण करून देत रहा. तुम्ही बऱ्याच अशक्य गोष्टी केल्या असतील. त्या आठवत राहिल्याने स्वत:वरचा अविश्वास दूर होईल. ✲ उद्योगक्षेत्रात यशस्वी झालेल्या लोकांना भेटा. त्यांच्याकडून टिप्स घ्या. तुम्हाला प्रोत्साहन देणारे बरेच लोक असतील. त्यांच्या सानिध्यात रहा. तुम्हाला बरं वाटेल. एकदा का आत्मविश्वास निर्माण झाला की उद्योगविश्वात भरारी घेऊ शकता.

## उपबॉयफ्रेंड
**खेचाखेची**

**मी:-** हाय!

**ती:-** आय हॅव अ बॉयफ्रेंड!

**मी:-** काही हरकत नाही.. उपराष्ट्रपती, उपपंतप्रधान, उपमुख्यमंत्री असतो तसे मला
.
.
.
उपबॉयफ्रेंड बनव!

## वेगळं काही

सायबेरियातलं याकुत्स सर्वात जास्त थंड शहर असल्याचं अनेकांना वाटतं. पण प्रत्यक्षात थंडीत इथे उणे ४१ अंश सेल्सियस तापमान असतं. तसंच उन्हाळ्यातही इथलं तापमान नॉरिल्स्कपेक्षा जास्त असतं. नॉरिल्स्कमध्ये दर तीन दिवसांनी बर्फाची वादळं येतात. मॉस्कोपासून हे शहर २९०० किलोमीटर अंतरावर आहे. या ठिकाणी विमान किंवा नौकेने जाता येतं. थंडीमुळे हे शहर रशियापासून तुटल्यासारखंच आहे. असं असलं तरी शहरात सर्व अत्याधुनिक सेवा सुविधा उपलब्ध आहेत. पण नॉरिल्स्क जगातल्या प्रदुषित शहरांपैकीही एक आहे. इथल्या हवेत सल्फर डाय ऑक्साइडचं प्रमाणही बरंच जास्त असल्याने लोकांना काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## तिला विश्वासात घ्यावं
**समुपदेशन**

बारावीत शिकणारी माझी मुलगी हुशार आहे. सगळे छंद, खेळ सांभाळूनही ८० टक्क्यांच्या आसपास गुण मिळवते. मात्र परीक्षा जवळ येत असताना अचानक अभ्यासातून तिचं लक्ष उडालं आहे. खूप आरडाओरडा केल्यानंतर कसंबसं क्लासला जाते. त्यातही तिने बरेचदा क्लास बुडवल्याचं मैत्रिणीकडून समजलं. तिची अशी बदललेली वागणूक काळजीत पाडत आहे. ती आमच्याशी फटकून वागते. तिला कसं समजवायचं तेच समजत नाही.



– मुलांच्या वागणुकीत अचानक बदल दिसू लागला की धोक्याचा संकेत लक्षात घ्यावा. इतकी हरहुन्नरी मुलगी अचानक अभ्यासापासून लांब जाणं, महत्त्वपूर्ण वर्ष असताना अभ्यास टाळणं काळजी वाढवणारं आहे. त्यामुळे सध्या अभ्यासापेक्षा तिच्या बिथरलेल्या मनस्थितीकडे लक्ष द्यावं. शाळेत अथवा क्लासमध्ये कोणी तिच्याशी गैरवर्तन करत आहे का, तिला ब्लॅकमेल करत आहे का, तिचं कोणाशी अफेअर आहे का, शिक्षकांकडून त्रास दिला जातो का, या शक्यता तपासून पहाव्या. तिला विश्वासात घेणं, तिच्याशी मनमोकळा संवाद साधणं, यासाठी एखाद्या चांगल्या समुपदेशकाची मदत घेता येईल. आधी तिचं मन स्थिर, शांत व्हायला हवं. त्यानंतर अभ्यास तसंच परीक्षेचं बघता येईल.

## सुडोकू ४६


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ८ | | २ | ९ | १ | ७ | ३ | |
| | १ | | | | ३ | | | |
| ३ | | ९ | | ५ | | १ | ८ | |
| | | | | | | ४ | | ७ |
| | | २ | | | | ५ | | |
| ६ | | ८ | | | | | | |
| | २ | ४ | | ८ | | ६ | | ३ |
| | | | ९ | | | | ४ | |
| | ३ | ५ | ६ | २ | ४ | | १ | |

टीप -
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ४५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ५ | ७ | ९ | ४ | ८ | १ |
| ९ | ५ | ८ | ३ | ४ | १ | ६ | ७ | २ |
| ७ | ४ | १ | ६ | २ | ८ | ९ | ३ | ५ |
| १ | ८ | ४ | ९ | ५ | २ | ७ | ६ | ३ |
| ५ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | १ | ९ |
| ६ | १ | ७ | ८ | १ | ३ | २ | ५ | ४ |
| ३ | ६ | २ | १ | ८ | ४ | ५ | ९ | ७ |
| ८ | ७ | ९ | २ | ३ | ५ | १ | ४ | ६ |
| ४ | १ | ५ | ७ | ९ | ६ | ३ | २ | ८ |

# शब्दकोडे क्रमांक ४६



**आडवे शब्द :-**
१) देऊळ
४) गावठी
७) साखरेचा पाक अधिक आवळा यांचा पौष्टिक पदार्थ
९) गावजेवण
११) डुक्कर
१३) चुलता
१४) हस्त
१५) विश्रांती
१६) औदार्य
१८) सोमवल्ली पासून तयार केलेली दारु
१९) ज्वारीची वाळलेली खुंट, गुरांचे एक खाद्य
२०) खवा, एक दुग्धजन्य पदार्थ
२१) नमुना, चुणूक
२३) नवरा
२५) प्रत्येक, महादेव
२७)बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दोर
२८) नको असलेला
२९) छोटा
३०) रमापती
३२) समतल
३५) खरबरीत, झोंबणारे
३७) बारीकसारीक
४०) विड्याच्या पानाची वल्लरी
४१) गावातील जुनी वस्ती
४३) उपयोग
४४) मिठी
४६) रडणारा
५०) आजूबाजूला
५१) पत्रातील थोडक्यात साष्टांग नमस्कार
५३) अभिप्राय
५४) सोनचाफा
५७)वागण्याची पद्धत
५९) कलंकाचा ठिपका
६०) चांदी
६२) कागदाचा ओला गोळा
६३) एक पालेभाजी, सांभाळणारा
६४) मनाची घालमेल.

**उभे शब्द :-**
१) सं. तुकारामांचे गाव
२) मोठ्या आवाजात पुकारणे
३) कुबेराचा सेवक
४) एक रंगीत कंदमूळ
५) अरण्य
६) पतीपत्नी
७) आसक्ती
८) वस्त्र, कापड
१०) छिद्र
१२) सीतापती
१३) कार्य, काज
१५) विहीर
१६) जंगलात लागलेली आग
१७) सर्वस्व
१८) उदाहरणासह
१९) विद्या, शास्त्र
२०) आईचा भाऊ
२१) महिना
२२) गणितातील मध्यम प्रमाण
२४) ज्या प्रमाणे
२६) लक्ष्मीचे एक नाव
२७) संध्याकाळ
२८) अभिनेता
३१) सोने
३३) पाप
३४) चणचण
३६) अस्थिर, हलणारी (संपत्ती)
३७) धूर्त, फसविणारा, लुच्चा
३८) बेचव, पचपचीत
३९) पराजय
४०)एक चतुर्थांश भाग
४२)पातळसर
४४) टाळ्यांचा प्रचंड आवाज
४५) कापडी बैठक
४७) बांगड्यांचा व्यवसाय करणारा
४८) वार्ताहर
४९) कावळा
५०) पाणी (सं)
५२) जुनेच्या विरुद्ध
५५) पर्वत
५६) अस्थिर मनाचा
५८) अखंड
६१) वजनदार

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

# अभिजात अभिनेत्री स्मिता पाटील

श्रीराम शेटये





सक्षम अभिनेत्री म्हणून स्मिता पाटील हिचं चित्रपटसृष्टीच्या इतिहासात वेगळं स्थान आहे. १३ डिसेंबर १९८६ ला अल्पायुषी ठरलेल्या स्मिता पाटील यांनी अखेरचा श्वास घेतला. स्मिता पाटील यांनी विविध व्यक्तिरेखांच्या संवेदना व त्यांचं व्यक्तिमत्त्व इतक्या प्रभावीपणे आणि सूक्ष्म बारकाव्यांसह अभिव्यक्त केलं की त्यामुळे पडद्यावरील सौंदर्याच्या रुढ संकल्पना दुय्यम ठरल्या.

स्मिता पाटील ह्यांचा जन्म १७ ऑक्टोबर १९५५ साली पुणे इथे झाला. भारतीय सामाजिक कार्यकर्ते आणि राजकारणी शिवाजीराव गिरधर पाटील आणि परिचारिका व प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ता विद्याताई पाटील यांच्या कुटुंबात जन्म घेतलेल्या स्मिता पाटील यांनी पुण्यातील रेणुका स्वरुप मेमोरियल माध्यमिक शाळेत शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी पुणे येथील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामधून (एफ. टी. आय. आय.) पदवी प्राप्त केली. राष्ट्रसेवादलाच्या सांस्कृतिक कार्यात सक्रिय असलेल्या स्मिता यांच्या अभिनयाचा प्रवास महाविद्यालयीन काळात सुरू झाला होता. स्थानिक नाट्यसृष्टीत सक्रियपणे सहभागी होत्या.

एफटीआयआयमधून पदवी घेतल्यावर स्मिता पाटील यांनी १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला मुंबई दूरदर्शनवर दूरचित्रवाणी बातमी वाचक म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. अरुण खोपकर दिग्दर्शित एफ. टी. आय. आय. च्या विद्यार्थी चित्रपट 'तेवर मध्यम' मध्ये त्यांची पहिली रुपेरी पडद्यावरील भूमिका होती, या भूमिकेमुळे त्या प्रसिद्ध चित्रपट निर्माते श्याम बेनेगल यांच्या दृष्टीस पडल्या. त्यांनी स्मिता यांना हबीब तन्वीर यांच्या नाटकावर आधारित १९७५ च्या चित्रपट 'चरणदास चोर' मध्ये घेतले, विजयदान देथा यांच्या राजस्थानी लोककथेवर आधारित हा चित्रपट होता. या चित्रपटातून स्मिता पाटील यांनी श्याम बेनेगल यांच्या चरणदास चोर (१९७५) या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत रुपेरी पडद्यावर पदार्पण केले. या भूमिकेकरिता स्मिता यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

त्याच वर्षी तिने जब्बार पटेल दिग्दर्शित आणि प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर लिखित 'सामना'या चित्रपटातून त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर श्याम बेनेगल यांचा 'निशांत' हा चित्रपट आला. दोन्ही चित्रपटांमध्ये तिने सहाय्यक भूमिका साकारल्या. 'मंथन' (१९७६) या चित्रपटामध्ये स्मिता यांना पहिल्या मोठ्या मुख्य भूमिकेसाठी तिची निवड झाली. या चित्रपटात त्यांनी गुजरातमधील आनंद येथे दूध सहकारी संस्थांची स्थापना करणाऱ्या वर्गीस कुरियन यांच्या श्वेत क्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या ग्रामीण महिलेची भूमिका साकारली. 'मंथन' मधून स्मिताने सहकारी चळवळीत सक्रिय झालेल्या हरिजन स्त्रीच्या व्यक्तिरेखे मधील सळसळते चैतन्य, आक्रमकता आणि सचोटी याचा सशक्त आविष्कार केला.

हंसा वाडकर यांच्या 'सांगत्ये ऐका' या आत्मचरित्रावर आधारित असलेला श्याम बेनेगल यांच्या 'भूमिका' (१९७७) या चित्रपटातील कसदार अभिनयामुळे स्मिताला कलात्मक चित्रपट सृष्टीत मान्यता मि ळा- लीच आणि राष्ट्रीय पुरस्कारही प्राप्त झाला. या चित्रपटात, स्मिता पाटील यांनी हंसा वाडकर यांची आव्हानात्मक भूमिका साकारली, त्याचप्रमाणे हंसा वाडकर या अभिनेत्रीच्या आत्मकथेवर आधारित 'भूमिका' मधून तिने पुरुषप्रधान संस्कृतीत शोषित ठरणाऱ्या स्त्रीच्या संवेदना प्रभावीपणे अभिव्यक्त केल्या. या अभिनयासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा होता. त्याच वर्षी त्यांना जब्बार पटेल यांच्या 'जैत रे जैत' मधील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट मराठी अभिनेत्रीचा फिल्मफेअर पुरस्कारही मिळाला.

१९७८ मध्ये, स्मिता पाटील यांनी श्याम बेनेगल यांच्या तेलुगू/हिंदी द्विभाषिक 'अनुग्रह/कोंडुरा' (१९७७) मध्ये अभिनय साकारला. त्यानंतर मुझफ्फर अली यांच्या 'गमन' मध्ये फारुख शेख आणि नाना पाटेकर यांच्यासोबत अभिनय साकारला. केवळ एका दशकापेक्षा जास्त काळ चाललेल्या कारकिर्दीत, स्मिता यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर एक अमिट छाप सोडली, त्यामुळे त्या भारतीय चित्रपटसृष्टीतील न्यू वेव्ह चळवळीच्या प्रमुख बनल्या.

वास्तविक हिंदी चित्रपटांमधून प्रामुख्याने पारंपारिक स्त्री प्रतिमाच चितारल्या गेल्या. तरीही स्मिता पाटीलच्या उदयापूर्वी वहिदा रेहमान, नुतन, सुचित्रा सेन यांनी या चाकोरी पलीकडल्या काही प्रतिमा उभ्या केल्या. स्मिता पाटीलने ही धारा आपल्या अभिनय सामर्थ्याने दृढ केली आणि पुढेही नेली. दलित, शोषित स्त्रियांच्या, बंडखोर स्त्रियांच्या, आंतरिक बळ असलेल्या स्त्रियांच्या प्रतिमा परिणामकारकतेने साकार केल्या. याबाबतीत शबाना आझमी या तिच्या समकालीन अभिनेत्रीनेही योगदान केलं आहे. या अभिनेत्रींनी चित्रपटातील प्रेयसीच्या रुढ झालेल्या प्रतिमांना पर्यायी अशा प्रतिमा सक्षमतेने आविष्कृत केल्या. वेगळया मूल्यचौकटी व निष्ठा घेऊन जगणाऱ्या अशा व्यक्तिरेखांना या अभिनेत्रींनी एका अर्थाने मान्यताच मिळवून दिली.

त्यानंतर स्मिता यांनी ख्वाजा अहमद अब्बास यांच्या 'द नक्सलाईट्स' (१९८०), गोविंद निहलानी यांच्या 'आक्रोश' (१९८०), सईद अख्तर मिर्झा यांच्या 'अल्बर्ट पिंटो को गुसा क्यों आता है' (१९८०), सत्यजित रे यांच्या प्रेमचंद यांच्या 'सद्‌गती' (१९८१) या लघुकथेचे रूपांतर असलेल्या केतन मेहता यांच्या 'भवई भवानी' (१९८१), महेश भट्ट यांच्या 'अर्थ' (१९८२), जब्बार पटेल यांच्या 'उंबरठा' (१९८२), गोविंद निहलानी यांच्या 'अर्धसत्य' (१९८२), टी. एस. नागाभरण यांच्या 'अन्वेषण' (१९८३), 'चटपटी' (१९८३), जी. अरविंदन यांच्या 'चिदंबरम' (मल्याळम १९८५) या चित्रपटातून त्यांची अभिनय कारकिर्द बहरत राहिली.

स्मिता यांनी स्त्रीप्रधान भूमिका करून वेगवेगळ्या विषयांकडे प्रेक्षकांचे लक्ष वेधले. त्यामुळे 'मिर्च मसाला' मधील सोनबाई, 'अर्थ'मधील कविता सान्याल महिलांना आपलीशी वाटली. मराठीतील 'उंबरठा' चित्रपटातील सुलभा महाजन म्हणजे जणूकाही आपल्या मनातली एक भावना आहे, असे त्याकाळी अनेक महिलांना वाटलं. समांतर चित्रपटांनंतर त्यांनी काही व्यावसायिक चित्रपटही केले. 'शक्ती', 'नमकहलाल' हे त्यांचे व्यावसायिक चित्रपटही सुपरहिट झाले. श्याम बेनेगल, रमेश सिप्पी, बी आर चोप्रा अशा प्रतिष्ठीत दिग्दर्शकांना स्मिता या आवडत्या अभिनेत्री होत्या.

१९८० मध्ये, मृणाल सेन यांनी इंडो-बांगलादेश सह-निर्मिती, 'अकाल संधाने' मध्ये स्मिता यांना घेतले. ३१ व्या बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात रौप्य बिअर विशेष ज्युरी पुरस्कार जिंकला. 'चक्र' (१९८१) हा स्मिता पाटील यांच्या कारकिर्दीतील आणखी एक मैलाचा दगड होता. या चित्रपटात त्यांनी शहरी दारिद्र्याच्या कठोर वास्तवात जगण्यासाठी लढणाऱ्या झोपडपट्टीत राहणाऱ्या महिलेची भूमिका साकारली होती. या भूमिकेसाठी त्यांना दुसरा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा तिचा पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. स्मिता पाटील यांची कारकीर्द बहरत गेली.

पण ऐन बहरात असताना स्मिता पाटील यांनी वयाच्या ३१ व्या वर्षी २८ नोव्हेंबर १९८६ रोजी प्रतीक या मुलाला जन्म दिला. प्रसूतीच्या वेळी स्मिता पाटील यांना ताप आल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना विषाणूजन्य एन्सेफलायटीस झाला. काही तासांतच स्मिता या कोमात गेल्या होत्या. १३ डिसेंबर १९८६ रोजी प्रतीक च्या जन्माच्या अवघ्या १५ दिवसाने वयाच्या अवघ्या ३१ व्या वर्षी स्मिता पाटील यांच निधन झालं. पण मृत्यूनंतरही मॉस्को, न्यूयॉर्क, फ्रान्समधील चित्रपट महोत्सवांमध्ये त्यांच्या चित्रपटांचे 'सिंहावलोकन' झाले. आंतरराष्ट्रीय स्तरावर रसिक व समीक्षकांकडून इतकी मान्यता मिळणाऱ्या त्या पहिल्याच भारतीय अभिनेत्री ठरल्या. **

## बाप-लेकाचं नातं हळुवारपणे उलगडणारं शीर्षक गीत

# बाप आभाळाचा निवारा









प्रतिनिधी

बाप-लेक यांच्या नात्यातील मायेचा ओलावा हळुवारपणे उलगडणारं एक व्हिडीओ अल्बम गीत नुकतंच प्रदर्शित झालं आहे. 'बाप आभाळाचा निवारा' हे शीर्षक असलेलं गीत वडील व मुलगा यांच्यातील संवेदनशील नात्याचं सादरीकरण करतं. एक अतिशय चांगल्या कथेची सांगड या गीताद्वारे सादर करण्यात आली आहे.

अलिबाग येथील बालरोगतज्ज्ञ डॉ. राजेंद्र चांदोरकर व स्त्रीरोग तसेच प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ डॉ. राजश्री चांदोरकर या दाम्पत्यांनी निर्मिती केलेल्या या व्हिडीओ अल्बममध्ये 'आमच्या पप्पांनी गणपती आणला' फेम साईराज गणेश केंद्रे याने मुलाची भूमिका साकारली आहे. 'अप्पी आमची कलेक्टर' या झी मराठी टीव्हीवरील मालिकेत साईराजला 'सर्वोत्तम बालकलाकार २०२५' हे पारितोषिक मिळालं आहे. बाप ही व्यक्तीरेखा डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी सादर केली आहे. प्रमुख भूमिकेत दोघांनीही सुंदर व दिलखेचक अभिनय केला आहे.

सहकलाकार म्हणून गुरुजींच्या भूमिकेत अनिल म्हात्रे व सावकाराच्या भूमिकेत महेश साळसकर यांनी त्यांना उत्तम साथ दिली आहे. शाळेतील सहलीस किल्ले रायगड येथे मुलाला जाता यावे म्हणून गरीब पित्याने केलेली मेहनत, खटपट व त्याग तसेच आई हयात नसताना मुलावर केलेल्या प्रेमाचा ओलावा या कथेत दिसून येतो. सहलीस मुकलेल्या मुलाला कर्जबाजारी असलेला बाप ढोरमेहनत करुन स्वतः आपल्या बैलगाडीतून किल्ले रायगड येथे नेतो व त्याचे स्वप्न पूर्ण करतो, असे या गीतात शेवटी दाखवण्यात आले आहे.

या व्हिडीओ अल्बमची उत्तम संकल्पना तसेच दिग्दर्शन सचिन कांबळे यांचे आहे. आशिष बनाटे हे प्रोजेक्ट हेड आहेत. अनिल म्हात्रे यांनी सह-दिग्दर्शनाची, तर समीर गायकवाड यांनी असिस्टंट डायरेक्टरची जबाबदारी सांभाळली आहे. मेकअपची धुरा मृणालिनी कांबळे यांनी सांभाळली आहे. व्हिडीओच्या सुरुवातीचे संवाद व शेवटचा मेसेज अनिल पवार यांनी लिहिला आहे. मेसेजचं व्हॉइस ओव्हर मंगेश सातपुते यांच्या आवाजात आहे. मनीष अनसुरकर हे या गीताचे गीतकार व संगीतकार आहेत. सुनील म्हात्रे यांनी या गीताचे संगीत संयोजन व ध्वनी मिश्रण केले आहे, तर गीत गायलंय पद्मानाभ गायकवाड यांनी. सुनीत गुरव यांनी छायाचित्रण व संकलन केलेलं हे व्हिडीओ अल्बम गीत डॉ. राजेंद्र चांदोरकर यांच्या या यूट्यूब चॅनेलवर शुक्रवारी (दि. २६) प्रदर्शित झालं आहे.एक सुंदरसा मेसेज देणारा हा व्हिडीओ अल्बम आवडल्यास तो तळागाळापर्यंत पोहचवण्यास सर्वांनी मदत करावी, असे आवाहन डॉ. राज प्रॉडक्शनतर्फे करण्यात आले आहे. **

# भरत जाधव

## विविधरंगी भूमिका करणारा अभिनेता!

रंगबहार

शरद कोरडे



मराठी रंगभूमी व चित्रपटसृष्टीतील आघाडीचा लोकप्रिय अभिनेता भरत जाधव याचा १२ डिसेंबर हा जन्मदिन नुकताच त्याच्या निवडक सहकलाकारांसह व मित्रांसह साजरा केला, तेव्हा अभिनेते अंकुश चौधरी यांनी त्याचे वर्णन 'सध्याच्या रंगभूमीवरील एक परिपूर्ण अभिनेता व चांगला मित्र, कोणतीही भूमिका करण्याची क्षमता असलेला, सशक्त अभिनेता भरत जाधव हा आमचा मित्र आहे याचा आम्हाला निश्चितच अभिमान आहे' असे उद्‌गार काढले. भरत जाधव यांनी आतापर्यंत सुमारे ८५ चित्रपटात कामे केली असून, आठ हजार पाचशे नाट्यप्रयोग केलेले आहेत. केदार शिंदे यांचा तो जवळचा मित्र आहे. लालबाग परळ मधील चाळीत राहणाऱ्या भरतचे वडील गिरणी कामगार होते तसेच ते रिक्षाही चालवित असत. आपल्या मित्रांसोबत प्रथम भरत जाधव ने शाहीर साबळे यांच्या लोकनाट्यात छोट्या छोट्या भूमिका केल्या. त्यांतील 'बापाचा बाप' या लोकनाट्यांतील त्यांची भूमिका खूप गाजली होती. त्यावेळी शाहीर साबळे यांचा नातू असलेल्या केदार शिंदे सोबत त्यांची मैत्री झाली. त्यानंतर 'महाराष्ट्राची लोकधारा' या कार्यक्रमांतूनही त्यांनी भूमिका केल्या. त्यानंतर देवेंद्र पेम यांच्या 'ऑल दि बेस्ट' या एकांकिकेचे दोन अंकी नाटक तयार केल्यावर चंद्रलेखाच्या मोहन वाघ यांनी त्या नाटकाची निर्मिती केली. या नाटकांत एक आंधळा, एक बहिरा व एक मुका अशा तीन मित्रांच्या मैत्रीची कथा सांगण्यात आली होती व हे तिघे एकाच मैत्रिणीवर प्रेम करत होते. त्यातून उडणारा गोंधळ व गंभीर शेवट या नाटकात विनोदी पद्धतीने मांडण्यात आला होता. या नाटकात अंकुश जाधव (आंधळा), संजय नार्वेकर (बहिरा) व भरत जाधव (मुका) व त्यांची मैत्रीण म्हणून संपदा जोगळेकर यांनी भूमिका केल्या होत्या. आपल्या या मैत्रिणीवर हे तिघेही मित्र प्रेम करीत असतात. अशा आगळ्या विषयावरील हे नाटक तुफान यशस्वी झाले व भरत जाधव, अंकुश चौधरी, संजय नार्वेकर व संपदा जोगळेकर या चौघांनाही या नाटकाने अमाप प्रसिद्धी लोकप्रियता व यश मिळवून दिले. पुढे भरत जाधव यांनी केदार शिंदे यांच्यासह त्यांनीच लिहिलेल्या व दिग्दर्शन केलेल्या 'आमच्या सारखे आम्हीच!', 'लोच्या झाला रे', 'श्रीमंत दामोदर पंत', 'तू तू मी मी', 'बॉम्बे मेरी जान' आदि नाटकांत त्यांनी विविध रंगी भूमिका केल्या. 'सही रे सही' या विनोदी नाटकात तर त्यांनी चार भूमिका केल्या. या भूमिकांनी भरत जाधव यांना भारतभर प्रसिद्धी मिळवून दिलीच पण विदेशातही या नाटकाचे प्रयोग झाले. 'सहि रे सही' या नाटकाचे हिंदी रूपांतरीत 'राजू राजाराम और मै' या नाटकांत जावेद जाफरी यांनी काम केले, तर 'आमी लाई गया तमे राही गया' या गुजराती नाटकांत शर्मन जोशी यांनी भूमिका केली होती. या दोन्ही भाषेतील नाटकांचे अनेक प्रयोग झाले व त्यांना भारतभर लोकप्रियता मिळाली.





केदार शिंदे दिग्दर्शित जत्रा.(२००४), 'माझा नवरा तुझी बायको' (२००७), 'बकुळा नामदेव घोटाळे' (२००८), 'श्रीमंत दामोदर पंत' (२०१३), आदी चित्रपटांतून भरत जाधव यांनी भूमिका केल्या.





भरत जाधव यांनी केलेल्या 'सही रे सही' या नाटकाचे एका वर्षांत ५६५ प्रयोग झाले होते व त्याची नोंद गिनीज बुकात झाली होती. या नाटकाचे गुजराती मधील रूपांतराचे वीस महिन्यात ३५० प्रयोग झाले होते, व इतके प्रयोग होणारे गुजराती मधील हे पहिलेच नाटक होते.

याशिवाय भरत जाधव यांनी 'अधांतर', 'मोरूची मावशी', 'ढ्याँण ढ्याँण', 'वास्तव' अशा नाटकांतून भूमिका केल्या. भरत जाधव यांनी भूमिका केलेल्या नाटकांचे एकूण प्रयोग ८५०० पेक्षा अधिक झाले आहेत. त्यांनी केलेल्या चित्रपटांमध्ये खतरनाक, पछाडलेला, सालीन केला घोटाळा, 'शिक्षणाच्या आईचा घोव', 'तुम्ही फक्त लढ म्हणा' 'रिंगा रिंगा', 'बकुळा नाम देव घोटाळे', बंजारा, दशावतार, मी शिवाजीराजे भोसले बोलतोय, आता थांबायचं नाही, लंडन मिसळ, 'धोंडी चंप्या- एक प्रेम कथा', 'तमाशा लाईव्ह, आप्पा आणि बाप्पा, उंच भरारी, आता माझी हाटली, लाडीगोडी, एक कुटुंब तीन मिनार, शासन, चिंतामणी, अनुदिनी, धामधूम, खो खो, भुताचा हनिमून, नो एन्ट्री, येड्यांची जत्रा आदी चित्रपटांचा समावेश आहे. भरत जाधव यांनी दूरदर्शन वरील काही मोजक्याच दूरदर्शन मालिकांमध्ये भूमिका केल्या, त्यात हसा चकट फू, साहेब बीबी आणि मी, आली लहर केला कहर, अशा काही निवडक मालिकांमधून कामे केली. तसेच काही वेब सिरीज मधूनही कामे केली. भरत जाधव यांनी 'भरत जाधव एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड' ही निर्मिती संस्था २०१३ मध्ये स्थापन केली व त्यानंतर त्याने 'मोरूची मावशी' या प्र. के. अत्रे यांच्या नाटकाची निर्मिती करून त्यातील मावशीची भूमिका त्यांनी स्वतः केली व इतर नाटकांचीही निर्मिती केली. पुढे 'सही रे सही', 'श्रीमंत दामोदर पंत' व 'सौजन्याची ऐशी तैशी' या नाटकांचीही त्याने निर्मिती केली.

भरत जाधव यांनी काही चित्रपटांच्या निर्मितीतही सहभाग घेतला होता. मराठी चित्रपट 'जत्रा' २२००६, 'खबरदार' २००५, 'नवऱ्याची कमाल बायकोची धमाल', '२००४, 'खतरनाक' व 'गोंद्या मारतय तंगडी' २०००, या चित्रपटांची निर्मिती केली, तर गजेंद्र अहिरे यांच्या 'अनुदिनी' या चित्रपटात त्यांनी भूमिका केली व निर्मितीतही सहाय्य केले. त्यांनी मराठी नाटके, चित्रपट, दूरदर्शन मालिका व वेब सिरीज मधून सातत्याने सातत्याने विविधरंगी भूमिका केल्या. प्रथम विनोदी भूमिका करणारा अभिनेता हा शिक्का त्याच्यावर बसला होता, पण पुढे संजय जाधव दिग्दर्शित 'रिंगा रिंगा' व 'फक्त लढ म्हणा' या चित्रपटातून त्यांनी वेगळ्या प्रकारच्या व प्रसंगी खलनायकी भूमिका ही केल्या. सुबोध खानोलकर यांच्या दशावतार या चित्रपटात त्यांनी लक्ष्मण वाडेकर या फॉरेस्ट ऑफिसरची खलनायकी भूमिका ही केली. गजेंद्र अहिरे यांच्या 'अनुदिनी' या चित्रपटात त्यांनी मध्यमवर्गीय बँक कर्मचाऱ्यांचे काम अतिशय सुंदर रित्या केले. तरीही त्यांचे पाय कायम जमिनीवरच राहिले, यशाने त्यांच्या डोक्यात हवा गेली नाही. शांत स्वभाव, सकारात्मक वृत्ती, सर्वांमध्ये खेळीमेळीने मिसळणे व दुसऱ्यांना अडचणीत मदत करणे, या त्यांच्या स्वभावाचे नेहमीच कौतुक होते. अशा परिपूर्ण अभिनेत्यास त्याच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा! **

## जाणून घ्या कोणतीही भाषा

**ज**गभरात अनेक भाषा बोलल्या जातात. विविध भाषांच्या माध्यमातून संदेश दिले जातात. आता सगळ्या भाषा येणं काही शक्य नाही. पण ही अडचण दूर करायची असेल तर ही ॲप्स डाउनलोड करता येतील. या ॲपमुळे कोणत्याही भाषेचं हिंदी भाषांतर होऊ शकतं.

✻ 'गुगल ट्रान्सलेट' हे अनोखं ॲप आहे. या ॲपमध्ये आता ऑफलाईन फीचरही ॲड झालं आहे. या ॲपच्या मदतीने १३० भाषांचा अनुवाद करता येईल. ॲप स्टोअरमधून हे ॲप डाउनलोड करता येईल.




✻ 'ट्रान्सलेट: टेक्स्ट ॲंड व्हॉईस ट्रान्सलेटर'च्या मदतीने १०० भाषांचं हिंदीमध्ये भाषांतर होऊ शकतं. एखादं वाक्य बोलून दाखवलं तरी त्याचं भाषांतर होऊशकतं.

✻ 'हिंदी-इंग्लिश ट्रान्सलेटर' हे ॲप इंग्रजीचा हिंदीत आणि हिंदीचा इंग्रजीत अनुवाद करायला मदत करतं.

**ॲप वर्ल्ड**

✻ 'इंग्लिश टू हिंदी ट्रान्सलेटर' हे ॲप ऑफलाईन वापरता येतं. या ॲपमध्ये हिंदी की बोर्ड देण्यात आला आहे. यात शब्दकोशही आहे.

✻ 'हिंदी-इंग्रजी डिक्शनरी'च्या मदतीने तुम्ही इंग्रजीतल्या वाक्यांचा हिंदीत अनुवाद करू शकता. इंग्रजी शिकण्यासाठी यात काही गेम्सही आहेत.

## मौल्यवान सोने

**सो**ने हा पृथ्वीवरील सर्वात सुंदर आणि मौल्यवान धातू मानला जातो. सोने पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या अनेक मीटर खाली आढळते. सोने जमिनीतून काढण्यासाठी आधी खडक फोडावे लागतात. त्या खडकात सोन्याचे अगदी छोटे कण असतात. खडकाची पावडर करून त्यावर पाणी सोडतात. सोने जड असल्यामुळे खाली बसते. याला 'पॅनिंग' किंवा धुण्याची पद्धत म्हणतात. मोठ्या खाणींमध्ये मशीनने खडक वेगळे करतात आणि रसायनांच्या मदतीने सोन्याचे कण वेगळे केले जातात. मिळालेले सोने पूर्ण शुद्ध नसते. त्यात चांदीसह अनेक इतर धातू मिसळलेले असतात. मिलमध्ये मोठे खडक आधी चिरडले जातात आणि नंतर पुन्हा पुन्हा फोडून बारीक पूड केली जाते. त्यात पाणी आणि सायनाईड मिसळून त्याचे



**माहिती खनिजांची**

एक पातळ मिश्रण तयार केले जाते. हे मिश्रण मोठ्या टाक्यांमध्ये सोडले जाते. या चिखलातील जड कण खाली बसतात आणि द्रवापासून वेगळे केले जातात. ही द्रव सामग्री बाहेर काढली जाते आणि फिरणाऱ्या गोलाकार सिलिंडरवर सोडली जाते. मिश्रण पसरून हळूहळू बाष्पीभवन होते. त्यानंतर रसायनांच्या मदतीने अशुद्धता काढली जाते. शुद्ध सोने मिळवण्यासाठी ते अत्यंत उच्च तापमानावर तापवावे लागते. या सगळ्या प्रक्रियेनंतर उरलेले चमकदार सोने त्यापासून बार, नाणे किंवा दागिने बनवण्यासाठी वापरता येते. चांगल्या सोन्याच्या खाणीमधल्या १,००० किलो खडकाच्या पावडरमधून साधारण ६.५ ग्रॅम सोने मिळू शकते. भारतामध्ये सोने प्रामुख्याने कर्नाटक, आंध्र प्रदेश, झारखंड आणि राजस्थान या ठिकाणी मिळते. कर्नाटकातील कोलारमध्ये सध्या उत्खनन थांबले आहे. तसेच हिमालयाच्या काही भागात नद्यांमध्येही सोन्याचे लहान कण आढळतात.सोने खूप टिकाऊ असते. हवा, पाणी किंवा वेळ यामुळे त्याला गंज किंवा डाग लागत नाहीत.

## सांताक्लॉजची नवी गाडी

**डे**न्मार्कमधील क्रॅनॅक नावाच्या छोट्या बर्फाच्या शहरात एक दयाळू आजोबा राहत होते. ख्रिसमसच्या दिवशी सगळ्या शहाण्या मुलांना खाऊ आणि खेळणी नेऊन द्यायचे काम देवाने त्यांच्याकडे दिले होते. लोक त्यांना सांता म्हणत. एका ख्रिसमसच्या रात्री सांताने आपली जादूची थैली भरली आणि ते निघाले. सांता गाडीत बसले. गाडीच्या घंट्या टुणटुण वाजल्या. पण गाडी हललीच नाही. सांता आजोबांनी खूप प्रयत्न केला. पण गाडी हलेना. आता सगळे काम कसे पूर्ण होणार याची त्यांना काळजी वाटू लागली. तेवढ्यात बर्फातून एक लहानसा निळा ढग खाली उतरला. त्याला दोन चमकदार डोळे आणि छोट्या पंखासारखी वाऱ्याची



पिसे होती. ढग म्हणाला, 'मी आहे विंडी. जादूचा ढग. माझ्या जादूच्या शक्तीने मी तुमची गाडी बदलून देतो!' विंडीने हळूच गाडीवर फुंकर मारली. सांतासमोर नवी जादूची गाडी उभी राहिली. या गाडीला घंटी नव्हती. पण तिच्या हँडलवर एक स्नोबनचा हसरा चेहरा होता. आकाशातले ढगांचे खड्डे आले की तो स्नोबन खुदुखुदू हसायचा. सांता म्हणाले, 'मला जगभर फिरायचे आहे आणि ते देखील एका रात्रीत.' विंडीने लहान लहान आठ चांदण्या घेतल्या. त्यांच्यावर हळूच फुंकर मारली. त्यांचे आठ रेनडिअर तयार झाले. 'हे आहेत जादूचे रेनडिअर. डॅशर, डान्सर, प्रान्सर, व्हिक्सन, कॉमेट, क्युपिड, डॉन्नर आणि ब्लिट्झन. हे आकाशात उडू शकतात आणि जमिनीवर पण धावू शकतात. हे वाऱ्या सारखे वेगवान आहेत. मुलांना खाऊ आणि खेळणी वाटायचे तुमचे काम आता लगेच पूर्ण होईल. 'सांताने गाडी सुरू केली. रेनडिअर्सनी आकाशात झेप घेतली. गाडी आकाशात उडायला लागली. स्नो बन हसू लागला. सांता आपली गाडी त्या घराच्या छपरावर ठेवत. तिथल्या धुराड्यातून हळूच खाली उतरत. मुलांच्या उशापाशी लटकावलेल्या मोज्यात सांता खाऊ आणि खेळणी ठेवत आणि आले तसेच गुपचुप बाहेर पडत. नव्या गाडीमुळे सांताचे काम चंद्र मावळायच्या आधीच पूर्ण झाले. तेव्हापासून सांता त्याच्या नव्या गमतीदार गाडीतून सगळीकडे फिरु लागले.

**डेन्मार्कची लोककथा**

## सेफ्टी मॅनेजमेंटमधील संधी

**दो**स्तांनो, आपलं आयुष्य खूप धोक्याचं आणि असुरक्षित झालं आहे. घर असो रस्ता असो किंवा मग कामाचं ठिकाण, आपल्याला अनेक धोक्यांचा सामना करावा लागतो. त्यातच औद्योगिक क्षेत्रात अनेक अपघात होतात. हे अपघात टाळण्यासाठी सरकारने औद्योगिक क्षेत्रासाठी काही नियम आणि कायदे केले आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा अधिकारी नेमणं बंधनकारक आहे. म्हणूनच सेफ्टी मॅनेजमेंट हे उत्तम करीअर होऊ शकतं. बारावी किंवा पदवीनंतर सेफ्टी मॅनेजमेंट विषयक अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. आरोग्य विज्ञान, औद्योगिक सुरक्षाविषयक नियम, अपघात थांबवण्यासाठीच्या उपाययोजना असे विषय




या अभ्यासक्रमाअंतर्गत शिकवले जातात. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी मेहनतीची तयारी, संवादकौशल्य, धैर्य, संयम, निर्णयक्षमता, प्रसंगावधान अशा कौशल्यांची गरज असते. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खाजगी तसंच सरकारी क्षेत्रात करीअर करता येतं. या पदाला खूप मान असतो. उद्योग, कारखान्याच्या सुरक्षेची जबाबदारी या अधिकाऱ्यावर असते. बीएससी इन सेफ्टी मॅनेजमेंट, सर्टिफिकेट कोर्स इन फायर ॲंड सेफ्टी मॅनेजमेंट, सर्टिफिकेट कोर्स इन फायर टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम तुम्ही निवडू शकता. अंगात धाडस असेल तर करीअरचा हा मार्ग स्वीकारायला हरकत नाही.

**कोण होणार?**

## रॉकी पर्वतरांगा

**रॉ**की पर्वतरांग ही कॅनडा आणि अमेरिका या दोन देशांत पसरलेली सर्वात प्रसिद्ध आणि विशाल पर्वतरांग आहे. ती साधारण ४८०० किलोमीटर लांबीची आहे. कॅनडामध्ये ती अल्बर्टा आणि ब्रिटीश कोलंबिया या प्रांतांतून तर अमेरिकेत कोलोराडो, वायोमिंग, मॉन्टाना, आयडाहो आणि न्यू मेक्सिको या राज्यांतून ही रांग पुढे पसरते.

इथली उंच शिखरे खूपच प्रसिद्ध आहेत. त्यात अमेरिकेतील माउंट एल्बर्ट, कॅनडातील माउंट रॉबसन, लोंग्स पीक, पाइक्स पीक अशी अनेक उंच शिखरे येतात. येथील हवामान उंचीप्रमाणे बदलते. वरच्या उंच भागात बर्फ आणि खाली हिरवीगार अरण्ये आढळतात.

रॉकी पर्वतरांगेत अनेक सुंदर नद्या उगम पावतात. त्यात कोलोराडो नदी, कोलंबिया नदी, रिओ ग्रांदे, स्नेक नदी, मिसूरी नदी या अत्यंत महत्त्वाच्या नद्या येतात. तसेच रॉकी माउंटन नॅशनल पार्कमधील बेअर लेक, कॅनडातील लेक लुईस आणि मोराइन लेक हे मोठे तलावही प्रसिद्ध आहेत. खालच्या भागात पाईन, फर, स्प्रूस, सिडार, ओक, ॲनस्पन अशी भरपूर झाडे आहेत. उंच भागात बर्फ सहन करणारी टोकदार पानांची झाडे आढळतात. उन्हाळ्यात ही अरण्ये हिरवीगार दिसतात आणि शरद ऋतूमध्ये ॲास्पनची पिवळी पाने संपूर्ण पर्वत सोनेरी करतात. रॉकी पर्वतरांगेत अनेक वन्य प्राणीही राहतात. ग्रिझली अस्वल, काळी अस्वले, मूस, एल्क, पर्वतीय शेळ्या, लांडगे, कोल्हे आणि गरुड इथे दिसतात. उंच भागात छोटे पिका नावाचे बर्फात राहणारे प्राणीही आढळतात.

**ओळख पर्वतांची**

प्राचीन काळापासून काही आदिवासी जमाती इथे राहतात. त्यात शायेन, ॲछपाची, ब्लॅकफूट, यूट, क्रो, नझ पर्स अशा जमातींचा समावेश होतो. ते निसर्गाशी जुळवून जीवन जगतात आणि पर्वत, नद्या व प्राण्यांना पवित्र मानतात.

## बनवा तुमची स्टिरिओ सिस्टिम

**तु**मच्या लहान बहिणीला तुम्हाला काहीतरी द्यायचंय. काही तरी स्पेशल. स्वत: बनवलेलं. पण काय द्यावं हे सुचत नाहीये. मग एक सोपी आणि मस्त आयडिया आहे. घरातल्याच काही वस्तू वापरून तुम्ही एक स्टिरिओ सिस्टीम तयार करू शकता. तुमच्या बहिणीच्या भातुकलीसाठी किंवा डॉलहाऊससाठी ही एक छान भेट ठरेल.

**साहित्य** : चार रिकाम्या काडेपेट्या, एक मोठ्या आकाराची रिकामी काडेपेटी किंवा पुठ्याचा खोका, काळं स्केच पेन, करड्या (ग्रे) रंगाचा चार्ट पेपर, ॲल्युमिनिअम फॉइल, कात्री आणि गम

**कृती** :

✻ चार छोट्या काडेपेट्यांच्या दोन दोनच्या जोड्या करून एकावर एक आडव्या चिकटवा. या काडेपेट्यांवर ग्रे कागद गुंडाळा. हे तुमच्या स्टिरिओ सिस्टीमचे स्पीकर्स असतील.


✻ मोठ्या काडेपेटीवरही ग्रे कागद गुंडाळा. हा तुमच्या स्टिरिओचा डेक असेल.

✻ स्पीकर्सच्या बाहेरच्या बाजूला उजव्या आणि डाव्या कोपऱ्यात काळ्या स्केच पेननी दोन छोटी वर्तुळं काढा. ✻ मग ॲल्युमिनिअम फॉइलवर एक छोटं आणि मोठं वर्तुळ काढा आणि तो भाग कापून घ्या. या दोन वर्तुळांपैकी छोटं वर्तुळ स्पीकरच्या वरच्या बाजूला आणि मोठं खालच्या बाजूला लावा. अशाप्रकारे दोन्ही स्पीकर्सना वर्तुळं चिकटवून घ्या. ✻ मोठी काडेपेटी हा तुमचा मुख्य डेक. त्यावर काळ्या स्केचपेनने रेडिओच्या खुणा करा. तसंच कॅसेट प्लेअरचं चित्र काढून घ्या. सीडी प्लेअरचं चित्रही तुम्ही काढू शकता. तुमच्या घरचा डेक बघून तुम्ही हा खेळण्यातला डेक तयार करू शकता. ✻शेवटी मुख्य डेकला स्पीकर्स चिकटवा. झाली तुमची स्टिरिओ सिस्टिम तयार. आता ही छानशी भेट तुमच्या छोट्या बहिणीला द्या.

**कार्यानुभव**



**ठिपके जुळवा**



## ऐटबाज हत्ती

**दो**स्तांनो, तुम्ही छानसा हत्ती घरच्या घरी तयार करू शकता.



**साहित्य** : पातळ पुठ्ठा, कपड्याला लावायच्या पाच पिना, पाईप क्लिनर्स, गम, सजावटीच्या वस्तू, रंग

**कृती** : पुठ्ठयावर हत्तीचा आकार काढा. तसंच बदामाचा मोठा आकार त्याच पुठ्ठयावर काढा. बदामाचा आकार म्हणजे हत्तीचे कान आहेत हे लक्षात घ्या. यासाठी घरातल्या पुठ्ठयाच्या बॉक्सचा वापर करता येईल. हत्ती आणि बदामाचा आकार कापून घ्या. बदामाच्या आकाराच्या मधोमध चीर द्या. या हत्तीच्या सोंडेच्या खालच्या बाजूला अशीच चीर द्या. आता हत्तीच्या शरीराला तुमच्या आवडीचा रंग द्या. कान तसंच चार पिनाही रंगवून घ्या. पाचव्या पिनेचा अर्धा भाग लाल रंगाने रंगवा तर अर्ध्या भागाचा रंग पिच असेल. हत्तीच्या पाठीवर झूल घाला. त्यासाठी एखादं कापड वापरता येईल. ग्लिटर पेन, खडे, स्टिकर्सचा वापर करून तुम्ही हत्ती सजवू शकता. तुमच्याकडे ज्या पिना आहेत त्यांच्यापासून हत्तीवर बसणारा राजा साकारायचा आहे. पिनांवर पाईक क्लिनर गुंडाळायचा आहे. राजाचे हात आणि पाय दिसतील अशा प्रकारे पाईप क्लिनर गुंडाळा. तसंच पिनेच्या वरच्या बाजूलाही पाईक क्लिनर गुंडाळा. हा पाईप क्लिनर म्हणजे राजाचा फेटा. हत्तीच्या शरीरावर आपण चीर दिली होती. तसंच बदामालाही चीर दिली होती. शरीराच्या चिरेत बदाम अडकवा. हे हत्तीचे कान आहेत. डोळ्यांचा आकार काढा किंवा गुगली आईज चिकटवता येतील. झाला तुमचा हत्ती तयार.

**करून तर पहा**



## 'एफ' कीजची कमाल

**मि**त्रांनो, तुम्ही कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप वापरत असाल. तुमच्या कॉम्प्युटरवर वरच्या बाजूला एफ १ ते एफ १२ या की असतात. हा कीज कशासाठी असतील, असा प्रश्न तुम्हाला पडत असेल. या एफ कीजचं नेमकं काम काय, याविषयी जाणून घेऊया...

✻ एखाद्या प्रोग्राममध्ये काम करत असताना मदत हवी असेल तर एफ १ ही की वापरता येईल. ही की दाबल्यावर 'हेल्प' विंडो ओपन होईल.

✻ एखाद्या फाईल किंवा फोल्डरचं नाव बदलायचं असेल तर ते सिलेक्ट करून एफ २ की दाबा. आता तुम्ही फाईलचं नाव बदलू शकता.

✻ कोणत्याही ॲपमध्ये सर्च ऑप्शन ओपन करण्यासाठी तुम्ही एफ ३ ही की वापरू शकता.

✻ एखादी विंडो बंद करायची असेल तर आल्ट प्लस एफ ४ ही की दाबा.

**स्मार्ट टिप्स**

✻ विंडो किंवा प्रोग्राम रिफ्रेश करण्यासाठी एफ ५ की दाबा.

✻ तुम्हाला इंटरनेट ब्राउजरच्या ॲड्रेस बारमध्ये कर्सर न्यायचा असेल तर एफ ६ ही की वापरा.

✻ वर्डमध्ये काम करत असताना स्पेलिंग तसंच व्याकरण तपासायचं असेल तर एफ ७ ही की वापरा. कॉम्प्युटर ऑन करताना 'बूट' मेनूमध्ये जायचं असेल तर एफ ८ ही की दाबा.

✻ वर्ड डॉक्युमेंट रिफ्रेश करण्यासाठी एफ ९ कीचा वापर करता येईल.

✻ ॲपमधला मेनू बार ओपन करण्यासाठी एफ १० की वापरा.

✻ ब्राउजर फुल स्क्रीन करण्यासाठी किंवा त्यातून बाहेर पडण्यासाठी एफ ११ या कीचा वापर करता येईल.

✻ वर्डमध्ये काम करत असताना सेव्ह ॲज डायलॉग बॉक्स ओपन करण्यासाठी एफ १२ की दाबा.




**पर्सनल केअर**

### कशी स्वच्छ करायची पाण्याची बाटली?

दोस्तांनो, आपल्या पाण्याच्या बाटलीत खूप बॅक्टेरिया असतात. बाटली नीट स्वच्छ केली नाही तर या बॅक्टेरियांमुळे आपण आजारी पडू शकतो. त्यामुळे शाळेत नेण्याची तुमची बाटली स्वच्छ असली पाहिजे. प्लास्टिकच्या बाटलीत सर्वात जास्त जंतू असतात. त्यामुळे ही बाटली आधी साबणाने स्वच्छ धुवून घ्यायला हवी. यामुळे बाटलीला येणारा वास निघून जाईल. वास गेला नाही तर चमचाभर ब्लीच आणि बेकिंग सोडा घालून बाटली स्वच्छ करा. ब्लीच आणि बेकिंग सोडा रात्रभर बाटलीत घालून ठेवा. त्यात पाणी भरा. सकाळी हलवून स्वच्छ करा.



**सेफ्टी टिप्स...**

### कसं राहायचं सुरक्षित?

सध्या लहान मुलांसोबत घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये खूप वाढ झाली आहे. त्यामुळे शाळेत किंवा घराबाहेर पडल्यावर विशेष काळजी घ्यायला हवी. लहान मुलांनी शक्यतो एकटं कुठेही जाऊनये. सोबत कोणाला तरी न्यायला हवं. अनोळखी माणसांशी बोलू नये. त्यांच्याकडून चॉकलेट, आईस्क्रीम किंवा कोणताही खाद्यपदार्थ घेऊनये. त्यांच्यासोबत कुठेही जाऊनये. शरीराला कोणी चुकीच्या पद्धतीने स्पर्श करत असेल तर आई-बाबांना लगेच सांगायला हवं. थोडी काळजी घेतली तर आपण नक्कीच सुरक्षित राहू शकू.



**बी ॲलर्ट**

### टॅटू काढण्याआधी...

मित्रांनो, आजकाल अनेक ठिकाणी टॅटू काढून मिळतात. टॅटू काढणारे रस्त्यांवरही असतात. पण टॅटू काढून घेताना सुरक्षेची काळजी घ्यायला हवी. टॅटूमुळे शरीरावर फोड किंवा ॲलर्जी होणार नाही हे पहायला हवं. इजिप्तमध्ये अशीच एक घटना घडली. एका सात वर्षांच्या मुलीने टॅटू काढून घेतला. पण हे प्रकरण तिला भलतंच महागात पडलं. तिच्या हातांवर पुरळ उठलं. फोड आले. टॅटू बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये घातक रसायनं असू शकतात. या रसायनांमुळे तुमच्या कोमल त्वचेला त्रास होऊ शकतो. त्यामुळे टॅटू काढण्याआधी सावध व्हा.



**खादाडी**

### फन फ्रूट कबाब्ज

मित्रांनो, नवरात्रीमध्ये अनेकांचे उपवास असतात. तुमच्या घरातही आई-बाबांचा उपवास असेल तर ही मस्त रेसिपी बनवता येईल. ही रेसिपी बनवण्यासाठी एक सफरचंद, एक केळं, लाल आणि हिरवी द्राक्षं, अननसाचे तुकडे, योगर्ट आणि किसलेलं सुकं खोबरं असं साहित्य घ्या. सगळी फळं नीट धुवून घ्या. त्यांचे छोटे चौकोन कापा. केळ्यांचे गोल आकार कापा. मोठ्या ताटलीत सगळी फळं ठेवा. किसलेलं खोबरं एका ताटलीत ठेवा. बारीक काठी घ्या. आईस्क्रीमच्या काड्या चालतील. या काडीत सगळी फळं अडकवा. तुमच्या कल्पनेप्रमाणे डिझाइन करा. आता काठीत अडकवलेली फळं योगर्टमध्ये बुडवा. आता ही फळं किसलेल्या खोबऱ्यावरून फिरवा. मस्तपैकी खा.



# राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा रंगतदार

## || ठाणे-पुणे-सांगलीचा किशोर गटात दबदबा || धाराशिव-सांगली-पुणे किशोरी गटात आघाडीवर





| मुंबई | प्रतिनिधी |

**महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने तसेच मुंबई खो-खो असोसिएशन व श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने ३९ वी किशोर व किशोरी (सब ज्युनिअर - १४ वर्षाखालील) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ, सहकारनगर, वडाळा, मुंबई येथे दणक्यात सुरु झाली असून किशोर गटात ठाणे, पुणे, सांगलीने दबदबा राखला तर किशोरी गटात धाराशिव-सांगली-पुणे आघाडीवर आहेत.**

किशोर गटातील सामन्यात ठाण्याने जळगाववर सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत ३९-१० असा स्पष्ट विजय मिळवला आणि एक डाव २९ गुणांनी सामना खिशात घातला. ठाणे संघाकडून साई धोंडकर, सचिन हुले, अरुण गरेल, अभय सावंत यांनी सलग प्रभावी कामगिरी करत विजय निश्चित केला.

पुण्याने लातूर विरुद्ध सर्वांगीण खेळाचे दर्शन घडवत ४४-०८ असा विजय नोंदवला आणि एक डाव ३६ गुणांनी सामना जिंकला. पुण्याकडून कर्तव्य गांडेकर, सोहम देशमुख, ओम वाघ, श्रीराज तांगडे, वेदांत गायकवाड यांनी आक्रमण व संरक्षणात सातत्य राखले. लातूर संघाकडून श्रीराम कदम याने चांगला प्रतिकार केला.

सांगलीने सिंधुदुर्ग विरुद्ध ५४-०४ असा दणदणीत विजय मिळवत एक डाव ५० गुणांनी सामन्यावर विजयी शिक्कामोर्तब केले. सांगलीकडून दक्ष जाधव, शुभम माने, समर्थ जाली यांनी उत्कृष्ट खेळ केला, तर सिंधुदुर्गकडून गौरांग मालंदकर याने एकाकी प्रयत्न केले.

किशोरी गटात सांगलीने लातूर विरुद्ध ३३-१४ असा विजय मिळवत एक डाव १९ गुणांनी सामना जिंकला. मध्यंतराला सांगलीकडे २६-०६ अशी आघाडी होती. सांगलीकडून वेदिका तामखडे, श्रावणी माने, आराध्या पाटील यांनी प्रभावी खेळ केला, तर लातूरकडून सायली देशमुख, संस्कृती शिंदे यांनी झुंज दिली.

धाराशिवने सिंधुदुर्ग विरुद्ध ५३-१० असा मोठा विजय मिळवत एक डाव ४३ गुणांनी सामन्यात वर्चस्व गाजवले. धाराशिवकडून मुग्धा सातपुते, भार्गवी बागल, राही पाटील, पियुषा पालमलकर यांनी दमदार कामगिरी केली, तर सिंधुदुर्गकडून ऋतिका परब हिने एकहाती लढत दिली.

पुण्याने जळगाव विरुद्ध ४०-१२ असा विजय मिळवत एक डाव २८ गुणांनी बाजी मारली. पुण्याकडून सई गरड, सुप्रिया करे, प्राप्ती देशमुख, अपर्णा वर्धे यांनी चमकदार कामगिरी केली, तर जळगावकडून सोनाली खेनगट हिने चांगले योगदान दिले.

किशोर गट : सातारा विरुद्ध हिंगोली-सातारा एक डाव २२ गुणांनी विजयी; नाशिक विरुद्ध धुळे-नाशिक एक डाव ०९ गुणांनी विजयी; छत्रपती संभाजीनगर विरुद्ध नांदेड- संभाजीनगर एक डाव ०२ गुणांनी विजयी; सोलापूर विरुद्ध परभणी-सोलापूर २० गुणांनी विजयी.

किशोरी गट : नाशिक विरुद्ध बीड-नाशिक एक डाव १६ गुणांनी विजयी; सातारा विरुद्ध हिंगोली- सातारा एक डाव ४२ गुणांनी विजयी; ठाणे विरुद्ध परभणी- ठाणे एक डाव १० गुणांनी विजयी; रत्नागिरी विरुद्ध नांदेड - नांदेड ०७ गुण व ३० सेकंद राखून विजयी; सोलापूर विरुद्ध रायगड-सोलापूर एक डाव ३० गुणांनी विजयी. पहिल्याच दिवशी बलाढ्य संघांच्या एकतर्फी विजयांमुळे पुढील फेऱ्यांत अत्यंत चुरशीचे, वेगवान आणि उत्कंठावर्धक सामने रंगणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले असून राज्य अजिंक्यपदाची लढत अधिकच रंगतदार होत चालली आहे.

# बागमळा गावच्या स्वस्तीचा सुवर्णपंच

## ■ राष्ट्रीय बाक्सिंग स्पर्धेत पटकावलं सुवर्णपदक

| अलिबाग | प्रतिनिधी |

सातारा येथे झालेल्या राष्ट्रीय लेवल बाक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करताना स्वती संदेश नाईक हिने नुकतेच सुवर्णपदक पटकाविले आहे. स्वती ही रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील बागमळा गावची रहिवासी आहे. वडिलांच्या नोकरीनिमित्त ती पुणे येथे वास्तव्यास आहे.

दरम्यान, पुणे-मावळ येथील जैन इंग्लिश स्कूलमध्ये स्वती इयत्ता सहावीमध्ये शिकत आहे. वयाच्या ११ व्या वर्षी तिने जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावर, स्कूल गेम, खेलो इंडिया खेलो अशा स्पर्धेत भाग घेऊन पाच सुवर्ण, सात रौप्य तर पाच कास्यंपदके पटकावली आहेत. स्वस्ती नाईक हिला यशवंत माने, संदीप माने, आथर्व कावरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



शालेय अभ्यासाबरोबरच स्वतीने बॉक्सिंगमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, पुढील वाटचालीसाठी तिला शुभेच्छा देण्यात येत आहेत. ऑलिंपिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करुन देशासाठी पदक मिळवायचे स्वप्न स्वतीने बोलून दाखवले. लेकीच्या यशाने आईवडिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. आईवडील, प्रशिक्षक आणि शाळेतील शिक्षकांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच हे यश मी मिळवू शकले, असे स्वतीने सांगितले. स्वती नाईक हिचे मूळ गाव असलेल्या अलिबाग तालुक्यातील बागमळा येथील ग्रामस्थांनीसुद्धा तिच्या नावाचे नाक्यावर मोठे बॅनर लावून फटाक्यांची आतषबाजी करीत जल्लोष साजरा केला. तसेच तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सफाळेत बेसबॉल स्पर्धेचे आयोजन

**विरार :** पालघर क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर पांडुरंग वामन अमृते शिक्षण संस्था, सफाळे येथे राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धा पार पडली. या बेसबॉल स्पर्धा २६, ते २८ डिसेंबर या कालावधीत सफाळे येथील शिक्षण संस्थेच्या मैदानावर पार पडणार आहेत. या स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलांचे आठ तर मुलींचे आठ १६ बेसबॉल संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेतून पालघर सारख्या ग्रामीण भागात खेळाची ओळख होईल आणि तरुणांना बेसबॉल खेळात रस निर्माण होऊन ग्रामीण भागात बेसबॉल खेळाचा प्रसार होण्यास मदत होईल, असा विश्वास जिल्हा क्रीडा अधिकारी व्हनमाने यांनी केले आहे.

# हंगामाचा शेवट विजयाने करण्याची सुवर्णसंधी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

या वर्षी खराब फॉर्ममुळे संघर्ष करत असलेल्या जागतिक विजेत्या डी. गुकेशला हंगामाचा शेवट विजयाने करण्याची सुवर्णसंधी आहे. तर कोनेरू हम्पी स्टार स्टड वर्ल्ड रॅपिड अँड ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत तिचे जेतेपद राखण्याचा प्रयत्न करेल. पाच वेळा विश्वविजेता मॅग्नस कार्लसन, अमेरिकेचा फैबियानो कारुआना आणि वेस्ली सो, रशियाचा ग्रँडमास्टर इयान नेपोम्नियाच्ची आणि भारताचा आर. प्रज्ञाननंदा, अर्जुन एरिगेसी आणि निहाल सरीन हे देखील हंगामाच्या अंतिम स्पर्धेत खुल्या गटात भाग घेतील. जागतिक जेतेपद जिंकणारा डी. गुकेश या वर्षी चांगली कामगिरी करू शकला नाही. त्याचा प्रज्ञनानधाकडून पराभव झाला होता. पुढील वर्षीच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी गुकेशला गमावलेला आत्मविश्वास परत मिळवण्याची ही शेवटची संधी आहे. गोल्यात होणाऱ्या फिडे विश्वचषकाद्वारे कैंडिडेट स्पर्धेत पात्रता मिळवण्यात अपयशी ठरल्यानंतर बावीस वर्षीय एरिगेसी देखील फॉर्म परत मिळवण्याचा प्रयत्न करेल.



# कोल्हापूरकरमध्ये रंगणार हॉकीचे सामने

| कोल्हापूर | वृत्तसंस्था |

कोल्हापूरच्या पराक्रमी मातीत कुस्तीला राजाश्रय मिळाला. याच मातीने लाल मातीच्या आखाड्यात ऑलिंपिक विजेता घडवला. आता भारताचा राष्ट्रीय खेळ असलेल्या हॉकीलाही अच्छे दिन येणार आहेत. कोल्हापूर शहरात मेजर ध्यानचंद यांच्या नावाने असलेल्या हॉकी स्टेडियवर आता आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय सामने भरवण्यासाठी मान्यता मिळाली असून ऑस्ट्रेलिया येथील फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल हॉकी असोसिएशनचे पत्र नुकतेच महापालिकेला प्राप्त झाले. यानंतर २५ वर्षांच्या संघर्षाची स्वप्नपूर्ती झाल्याच्या भावना हॉकीप्रेमी आणि खेळाडूंनी व्यक्त केल्या. भारत सरकारच्या युवा कार्यक्रम खेळ मंत्रालयाच्या खेलो इंडिया या राष्ट्रीय क्रीडा विकास योजनेंतर्गत मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम इथे ऍस्ट्रोटर्फयुक्त मैदान आणि पूरक



सुविधा विकसित करण्यासाठी ५ कोटी ५० लाखांच्या प्रकल्पाला केंद्र शासनाची मंजुरी मिळाली होती. प्रकल्पासाठी महापालिकेने १५ व्या वित्त आयोगातून आपला हिस्सा म्हणून १ कोटी ४६ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला. केंद्र सरकार आणि महापालिकेने ६ कोटी ९६ लाख इतका निधी या प्रकल्पासाठी खर्च केला आहे. यातून आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय सामन्यांसाठी ऍस्ट्रोटर्फ खेळाडूंसाठी मैदानात सोयीसुविधा उभारण्यात आल्या आहेत. मुंबई, पुणेनंतर कोल्हापुरात आंतरराष्ट्रीय हॉकी सामन्यांच्या आयोजनाचा मार्ग मोकळा झाला, असे हॉकी संघटक विजय साळुंखे सरदार यांनी सांगितले.

# श्रुती, पारुल, तन्वीची आगेकूच

| विजयवाडा | वृत्तसंस्था |

वरिष्ठ राष्ट्रीय बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये अनुभवी श्रुती मुंदडा, पारुल चौधरी आणि उदयोन्मुख खेळाडू तन्वी पत्री यांनी आपल्यापेक्षा सरस मानांकित प्रतिस्पर्ध्यांना पराभवाचा धक्का देत महिला एकेरीची उपउपांत्यपूर्व फेरी गाठली. श्रुतीने सातव्या मानांकित जिया रावतचा पराभव केला. दुसऱ्या चुरशीच्या लढतीत पारुलने मात करत पुढील फेरीत प्रवेश केला. त्याचप्रमाणे, तन्वीने बरुआचे आव्हान संपुष्टात आणले. याव्यतिरिक्त उन्नती हुडा, अनुपमा उपाध्याय, अनमोल खरब आणि तन्वी शर्मा यांनीही पुढची फेरी गाठली. पुरुष एकेरी, मिश्र दुहेरीत उलटफेरपुरुष एकेरीमध्ये आर्यमान टंडनने मोठी उलटफेर करत तिसऱ्या मानांकित एम. रघूचा असा पराभव केला.

### आरडीसीए आयोजित क्रिकेट स्पर्धेत

# पचौरी क्रिकेट अकॅडमी कामोठे विजयी

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सोळा वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत पचौरी क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाने अंतिम विजयी होण्याचा मान मिळवला आहे. अंतिम सामन्यात पचौरी क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाने रोशन क्रिकेट अकॅडमी संघाचा २२ धावांनी पराभव करत स्पर्धेची चॅम्पियनशिप पटकावली आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पचौरी क्रिकेट अकॅडमी संघाने ४० षटकांमध्ये ९ गडी बाद १८४ धावा काढल्या त्यामध्ये श्रेयस गोवारी यांनी सर्वाधिक ५७ आदित्य कांटे ४१ प्रज्वल गोवारी यांनी ३७ धावा केल्या तर रोशन क्रिकेट अकॅडमी कडून आयुष



धनावडे यांनी २ फलंदाजांना बाद केले. प्रतिउत्तर देताना रोशन क्रिकेट अकॅडमी संघाने ३७.१ षटकांमध्ये सर्व गडी गमावत १६२ धावा केल्या त्यामध्ये हर्षल पाटील यांनी ३१ निखिल अहिरवाल यांनी २५ धावांचे योगदान संघाला दिले.

पचौरी संघाकडून कर्णधार अनिश म्हात्रे व अंकित म्हात्रे यांनी प्रत्येकी ३ गडी बाद करून संघाला २२ धावांनी विजय मिळवून दिला. संपूर्ण स्पर्धेतील उत्कृष्ठ फलंदाज म्हणून श्रेय पाटील, प्रतीक क्रिकेट अकॅडमी, उत्कृष्ठ गोलंदाज व मालिकावीर अनिश म्हात्रे, पचौरी क्रिकेट अकॅडमी, उत्कृष्ठ क्षेत्ररकक्ष म्हणून मंथन पाटील जगदीश क्रिकेट अकॅडमी यांना जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सहसचिव जयंत नाईक, सदस्य प्रदिप खलाटे, मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी, अरुण शिंदे, वीरू पचौरी, रोशन अडे, सुरेश म्हात्रे, अभिजित वाडकर, आदेश नाईक यांच्या हस्ते चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

### महिलांमध्ये स्वराज्य स्पोर्ट्सची बाजी | पुरुष गटात संघर्ष क्रीडा मंडळ सरस

# अंकुश मोरे गौरव कबड्डी स्पर्धा उत्साहात

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबई उपनगरातील कबड्डी रसिकांसाठी पर्वणी ठरलेली अंकुश मोरे गौरव जिल्हास्तरीय पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा गोरेगाव येथील एनएनपी मृणाल गोरे उद्यानातील क्रीडांगणात मोठ्या उत्साहात पार पडली. ज्येष्ठ कबड्डी संघटक व आंतरराष्ट्रीय पंच अंकुश मोरे यांच्या एकसष्ठीनिमित्त अभिनव क्रीडा मंडळ, गोरेगाव आणि एकता क्रीडा मंडळ, वडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच मुंबई उपनगर कबड्डी संघटनेच्या मान्यतेने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



महिला गटातील अंतिम सामना अक्षरशः अटीतटीचा ठरला. कांजूरमार्गच्या स्वराज्य स्पोर्ट्स क्लबने गोरेगावच्या संघर्ष क्रीडा मंडळाचे कडवे आव्हान ३४-२५ असे ९ गुणांनी परतवून लावत जेतेपदाच्या चषकावर आपले नाव कोरले. दोन्ही संघांनी चढाई व पकडीचा सुरेख समन्वय दाखवत सामना रंगतदार केला, मात्र निर्णायक क्षणी स्वराज्य स्पोर्ट्सने अनुभवाच्या जोरावर बाजी मारली.

पुरुष गटातील अंतिम लढतही तितकीच रोमहर्षक ठरली. गोरेगावच्या संघर्ष क्रीडा मंडळाने सांताक्रूझच्या सागर क्रीडा मंडळाचा अवघ्या ३१-२९ अशा २ गुणांनी पराभव करीत जेतेपद पटकावले. शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या सामन्यात दोन्ही संघांनी जिगर दाखवली, मात्र निर्णायक चढायांमध्ये संघर्ष क्रीडा मंडळ सरस ठरले.

स्पर्धेतील पुरुष लीग कबड्डीमध्ये जोगेश्वरीच्या जॉली स्पोर्ट्स क्लबने गोरेगावच्या स्पर्श फाऊंडेशनवर ३७-२६ असा ९ गुणांनी विजय मिळवत विजेतेपदावर आपली मोहोर उमटवली. आक्रमक चढाया आणि भक्कम पकडी यांच्या जोरावर जॉली स्पोर्ट्सने संपूर्ण लीगमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी केली.

पारितोषिक वितरण सोहळ्यास 'द्रोणाचार्य' दिनेश लाड, शिक्षणतज्ज्ञ अरविंद वैद्य, प्रो-कबड्डीपटू निलेश शिंदे, राष्ट्रीय कबड्डीपटू सचिन सातार्डेकर, सुषमा सातार्डेकर, वडगाव बुद्रुक ग्रामसेवा संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोरे, सचिव पांडुरंग दळवी, मुंबई उपनगर कबड्डी संघटनेचे सचिव राजेश पडेलकर आणि संकल्प सहनिवास ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष शांताराम खामकर उपस्थित होते.

### देशी कबड्डीचा शानदार खेळ

**या स्पर्धेत देशी कबड्डीच्या पारंपरिक शैलीचे शानदार प्रदर्शन पाहायला मिळाले. वेगवान चढाया, अचूक पकडी आणि संघभावनेचा प्रत्यय देणाऱ्या खेळामुळे विभागातील कबड्डीशौकीन प्रेक्षक अत्यंत आनंदित झाले. स्पर्धेला स्पोर्टवोट यांचे पुरस्कर्ते म्हणून मोलाचे सहकार्य लाभले.**

## निवडक



# चिर्ले येथे चॅलेंजर ट्रॉफीचे आयोजन

**उरण :** उरण तालुक्यातील चिर्ले येथे चॅलेंजर ट्रॉफीचे आयोजन करण्यात आले आहे. प्रकाशझोतातील ट्रॉफीचे बुधवार (दि.२४) रोजी महेंद्र घरत यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी चॅलेंजर ट्रॉफीचे प्रमुख आयोजक समाधान माळी यांची उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी निवड करून त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले. याप्रसंगी मिलिंद पाडगावकर, अखलाक शिलोत्री, डॉ. मनीष पाटील, विनोद म्हात्रे, अलंकार परदेशी, वैभव पाटील, मुरलीधर ठाकूर, विनोद पाटील, घनश्याम पाटील, अविनाश ठाकूर, रमेश पाटील, अश्वित थळी, तसेच असंख्य काँग्रेस कार्यकर्ते आणि एमजी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. यावेळी भव्य कार रॅलीने रसिकांचे लक्ष्य वेधले होते. उरण तालुक्यातील चिर्ले ही क्रिकेटची पंढरी आहे. रायगड जिल्ह्यात सर्वप्रथम नाईट क्रिकेट स्पर्धा या चिर्लेच्या मैदानावर झाल्या होत्या, तो इतिहास चिर्लेच्या तरुणांनी आणि ग्रामस्थांनी आजपर्यंत जपला असे घरत यांनी सांगितले.



# पाली कबड्डी स्पर्धेत शिवंशभू पाटणेश्वर विजयी

**पाली/गोमाशी :** मॉर्निंग ग्रुप सामाजिक सांस्कृतिक क्रीडा मंडळ पाली सुधागड यांच्यावतीने जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवार (दि.२०) डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील नामवंत संघानी आपला प्रवेश नोंदविला होता. या कबड्डी स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमीनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. या स्पर्धेतील अंतिम लढत शिवशंभू पाटणेश्वर विरुद्ध पाडवादेवी रायवाडी या संघात झाली. पाटणेश्वर संघ अंतिम विजयी झाला या संघास रोख रक्कम ३० हजार व आकर्षक चषक तर द्वितीय क्रमांक रायवाडी या संघास २० हजार व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक श्री गणेश दिवलांग तर चतुर्थ क्रमांक जय हनुमान धेरंड या संघांना प्रत्येकी १० हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत पंचक्रोशी नांदगाव आणि शिवकन्या पाली या महिलांचा प्रेक्षणीय सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू यश पाटील, उत्कृष्ट चढाई समाधान मोरे, उत्कृष्ट पक्कड सुमित पाटील, पब्लिक हिरो पार्थ ठाकुर या सर्व खेळाडूंना मंडळातर्फे आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

# हॉकी स्टार हार्दिक सिंगला खेलरत्न

**नवी दिल्ली:** भारतीय पुरुष हॉकी संघाचा उपकर्णधार हार्दिक सिंगला मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारासाठी नामांकित करण्यात आले आहे. या पुरस्कारासाठी नामांकित झालेला एकमेव खेळाडू आहे. विशेष म्हणजे यावर्षी राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांसाठी कोणत्याही क्रिकेटपटूची निवड झालेली नाही; २०२३ मध्ये हा सन्मान मिळवणारा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी हा शेवटचा क्रिकेटपटू होता. भारतीय क्रीडा इतिहासात पहिल्यांदाच मयोगासनफ या खेळाचा अर्जुन पुरस्कार यादीत समावेश करण्यात आला आहे. क्रीडा मंत्रालयाकडून औपचारिक मान्यता मिळाल्यानंतर पाच वर्षांनी, राष्ट्रीय आणि आशियाई विजेती आरती पालला अर्जुन पुरस्कारासाठी नामांकन देण्यात आले आहे. हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे कारण २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत योगासनाचा मप्रदर्शन खेळफ म्हणून समावेश केला जाईल. योगासनाला व्यावसायिक खेळ म्हणून स्थापित करण्यात आरतीच्या कामगिरीने मोठी भूमिका बजावली आहे. हार्दिक अनेक वर्षांपासून भारताच्या हॉकी मिडफील्डमध्ये एक महत्त्वाचा खेळाडू आहे, त्याने टोकियो २०२१ आणि पॅरिस २०२४ मध्ये भारताच्या ऑलिंपिक पदक जिंकणाऱ्या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या वर्षीच्या आशिया चषकात सुवर्णपदक जिंकणाऱ्या संघाचा तो भाग होता. खेलरत्न हा भारतातील सर्वोच्च क्रीडा पुरस्कार आहे. २.५ दशलक्ष रोख, एक पदक आणि प्रशस्तिपत्र देण्यात येणार आहे.





# 'बॉक्सिंग डे' कसोटीने रचला इतिहास

**नवी दिल्ली :** मेलबर्नच्या ऐतिहासिक मैदानावर सुरू असलेल्या ॲशेस सिरीजच्या चौथ्या मॅचमध्ये पहिल्याच दिवशी खेळाचा कसोटी क्रिकेटचा थरार पाहायला मिळाला. दोन्ही देशांच्या दिग्गज खेळाडूंनी मैदानावर हजेरी लावली असताना, बॅटरसाठी हा दिवस अत्यंत कठीण ठरला. एकाच दिवसात तब्बल २० विकेट्स पडल्याने प्रेक्षकही अवाक् झाले असून, मॅचमध्ये आता कमालीची चुरस निर्माण झाली आहे. ॲशेसमध्ये नवा इतिहास देखील रचला आहे. इंग्लंडने टॉस जिंकून प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला, जो बॉलर्सच्या दृष्टीने पूर्णपणे सार्थ ठरला. मॅचच्या सुरुवातीला इंग्लंडने टॉस जिंकून प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला, जो सार्थ ठरला. ऑस्ट्रेलियाची पहिली इनिंग ४५.२ ओव्हरमध्ये १५२ रन्सवर आटोपली. सलामीवीर ख्वाजाने २९ रन्स केले, तर स्मिथ केवळ ९ रन्सवर जोशच्या बॉलवर बोल्ड झाला. या बॉलवर स्मिथ पूर्णपणे गोंधळलेला दिसला. ऑस्ट्रेलियाचे तीन विकेट्स तर एकही रन न जोडता पडले. इंग्लंडच्या टंगने ५ विकेट्स घेतल्या, तर गस टकिन्सनने २ दोन महत्त्वाच्या विकेट्स नावावर केल्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)